## नागपुरातील जागा वाटपावरून काँग्रेस नेत्यांची उद्धव ठाकरेंशी चर्चा

**नागपूर, २९ :** सध्या सर्वच पक्षांची विधानसभेच्या निवडणुकीची तयारी सुरू आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीने जागा वाटपावार चर्चा सुरू केली आहे. दोघांसाठीही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची ठरणारी आहे. नेत्यांचे विभागवार दौरे सुरू आहे. नागपुरात भाजपच नेते व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकतीच बैठक झाली. ठाकरे–पवारांना रोखा, असा संदेश त्यांनी भाजप कार्यकर्त्यांना दिला. त्यापूर्वी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी नागपुरात पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेतली होती. रविवारी शिवसेना बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचा नागपूर दौरा होता.


Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी वृत्तपत्रास फक्त 4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक १७४ * * नागपूर * | सोमवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२४ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


अग्रलेख **खरीखरी...**

# पवारांचा प्रश्न

भारतीय जनता पक्षाच्या सध्याच्या युती सरकारात मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने भाजप श्रेष्ठी आणि अजित पवार यांनी प्रेमपूर्वक हातमिळवणी केली. ही हातमिळवणी केल्यावर भारतीय जनता पक्षाचे १०३, शिंदे सरकारचे अपक्षांसहित ५० आणि अजितदादांचे ३८ अशा जवळपास २०० च्या आसपास आमदारांचा पाठिंबा असणाऱ्या सरकारची वेगाने घोडदौड सुरू आहे. या घोडदौडीमुळे भारतीय जनता पक्षाचा किती फायदा झाला, अजित पवार यांचा किती फायदा झाला आणि शरद पवार व काँग्रेस यांचा किती फायदा झाला. यांचा हिशेब केला तर एकनाथ शिंदे यांना पास होण्यापूरते गुण मिळतात. मात्र भाजप व अजितदादा गट यांना जेमतेम पास होण्यापूरतेही गुण मिळत नाहीत. काँग्रेस आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष सध्या पहिल्या वर्गात नक्कीच आहेत. उद्धवरावांच्या शिवसेनेचे दोन खासदार जास्त निवडून आले. तरी शिंदे सरकार चांगलेच फार्मात दिसत आहे. अशी या युती सरकारची सध्याची एकूण परिस्थिती आहे. पण भाजपमधील अनेक नेते आणि आमदार अजित पवारांना घेणे म्हणजे तत्त्वचुती आहे, असे उघडपणे म्हणतात. आपल्या सर्वोच्च नेत्याने भोपाळ मध्ये अजित पवार यांच्याविरुद्ध ८० हजार कोटींचे आरोप केले आणि तिसऱ्याच दिवशी अजित पवार महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री झाले. हे प्रकरण झाल्याबरोबर शिंदे यांच्या शिवसेनेमधील मंत्री पदाचे इच्छुक उमेदवार ज्यांनी महागडे कोट शिवून ठेवले होते. ते बिचारे हिरमुसून हिरमुसून गेले. आता निवडणुकीला महिना, दीड महिना राहिला आहे. तेव्हा कुणाला महामंडळ, कुणाला अध्यक्षपद वगैरे प्रकार सुरू आहेत. विशेष म्हणजे अजित पवार यांचा सरकार मधील प्रवेश ओरिजनल भाजपवाल्यांनाही रुचला नाही आणि निवडणूक आयोगाने मंजूर केलेल्या मूळ शिवसेनेलाही रुचला नाही. आता अजित पवार यांचा पक्ष म्हणजे धरलं तर चावतंय आणि सोडलं तर पळतंय, अशी परिस्थिती आहे. अजित पवार यांचा पक्ष सध्या चिकटपट्टीप्रमाणे युतीला घट्ट चिकटलेला आहे. आजच माजलगावचे मोहन जगताप यांनी आपल्याच पक्षाला अजित पवार यांचा किती ताप आहे, हे जगाला ओरडून ओरडून सांगितले. असे अनेक जगताप भाजपात ठाईठाई पसरलेले आहेत. अजित पवार युतीमध्ये आहेत. म्हणजे त्यांच्यासाठी काही जागा सोडणे क्रमप्राप्त आहे. अजित पवारांच्या विरुद्ध वर्षानुवर्षे संघर्ष करणाऱ्या ठिकठिकाणच्या भाजपच्या मतदारांना अजित पवार यांना मत द्या, असे सांगणे म्हणजे पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे आहे. असे अनेक एकसंघ भाजपनिष्ठांना वाटते. सध्या भाजपचेही काँग्रेसीकरण झालेले आहे. त्यामुळे आधीच भाजप निष्ठांच्या मांदियाळीत अजित पवार यांची अळी पडली. तर ते मिश्रण आपल्या गळ्याच्या नळीतून कसे उतरवावे? असा मोठा गहन प्रश्न कमळापुढे उभा आहे. या कमळाला ताजेतवाने ठेवण्यासाठी आता काहीच करता येत नाही. ही या पक्षातील अनेकांची खंत आहे. प्रश्न असा आहे की, हा निर्णय घेणारे दिल्लीश्वर आहेत. निर्णय घेतला तेव्हा हे दिल्लीश्वर एका नजरेच्या कटाक्षाने एकेकाला गारद करू शकत होते. पण आता लोकसभेत काही जागा कमी पडल्याने, टेकूवर उभ्या असलेल्या सरकारला त्यांचे अनेक निर्णय नाईलाजाने परत घ्यावे लागले आहेत. तसेच त्यावेळी ज्या अनेकांची बोलती बंद होती त्यांनाही आता कंठ फुटला आहे. हरियाणा आणि जम्मू काश्मीर यांच्या बातम्या भाजपा करीता सुखदायक नाहीत. पण महाराष्ट्र तरी हाती रहावा. यासाठी दिल्लीश्वरांपासून मुंबईकरांपर्यंत सगळेच सुसाट प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी लाडका भाऊ, लाडकी बहीण, लाडका शेतकरी आणि अनेक लाडके सध्या मजा मारत आहेत. मुख्य मुद्दा आहे तो उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा, तेव्हा हे लोढणे आपल्या गळ्यातून काढता येत नाही. ते तसेच मिरवावे लागेल. याची पक्की निरगाठ बांधूनच ही विधानसभा लढवावी लागेल. एवढाच याचा अर्थ आहे. छोट्या पवारांच्या प्रश्नाचे मोठे उत्तर सध्यातरी कुणाकडेही नाही.



nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# पंतप्रधान नरेंद्र मोदींचा काँग्रेसला अप्रत्यक्ष टोला

## २००८ मधील सरकारच्या काळात मेट्रोचा एक पिलरही उभारला गेला नाही

### मागील सरकार ८ वर्षांत एक खांब उभारू शकले नाही

मोदी पुढे म्हणाले की, पुण्यात मेट्रो आणण्याबाबत २००८ मध्ये बोलले होते. मात्र २०१६ मध्ये आमच्या सरकारने अडचणी बाजूला सारुन वेगाने निर्णय घेण्यास सुरुवात केल्यानंतर त्याचे भूमिपूजन झाले. आज पुणे मेट्रोचा विस्तार होत आहे. २०१६ पासून आतापर्यंत पुणे मेट्रोचा झालेला विस्तार यातील कोणतेच काम जुने विचार आणि कार्यपद्धती असती तर पूर्ण झाले नसते. मागील सरकारच्या काळात सरकार ८ वर्षांत मेट्रोचा एक खांब देखील उभारू शकले नाही. त्याउलट आमच्या सरकारने पुण्यात मेट्रोचे आधुनिक नेटवर्क तयार केले आहे. राज्याच्या प्रगतीसाठी विकासाला प्राथमिकता देणाऱ्या सरकारची निरंतरता आवश्यकता असते. जेव्हा यामध्ये अडथळा येतो, तेव्हा महाराष्ट्राला मोठे नुकसान सहन करावे लागते.



**■ महासागर प्रतिनिधी**
**पुणे, २९ :**
२००८ मध्ये असलेल्या सरकारच्या काळात मेट्रोचा एक पिलरही ते सरकार उभा करू शकले नाही. ही विचार सरणी जर आज सत्तेत असती तर मेट्रोचे काम अजूनही होऊ शकले नसते असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तत्कालीन काँग्रेस सरकारवर निशाणा साधला आहे.

दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे बोलताना म्हणाले की, दोन दिवसांपूर्वी पुण्यातील कार्यक्रमास मी येऊ शकलो नाही, यात माझेच खूप मोठे नुकसान आहे. कारण पुण्यातील कणकणात राष्ट्रभक्ती आणि समाजभक्ती आहे. अशा पुण्यात येणे ऊर्जावान बनवते. त्यामुळे मी आज पुण्यात येऊ शकलो नाही यात माझे मोठे नुकसान आहे, अशी खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली. पुण्यातील जिल्हा न्यायालय ते स्वारगेट पर्यंतच्या मेट्रो कॉरिडोरच्या ऑनलाईन उद्घाटनाच्या सोहळ्यात ते बोलत होते.

**नेमके काय म्हणाले पंतप्रधान मोदी?**

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुण्यातील माझ्या लाडक्या बहिणी आणि भावांना माझा नमस्कार, असे मराठी भाषेत भाषणाला सुरुवात केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, दोन दिवसांपूर्वी मला अनेक कार्यक्रमांच्या उद्घाटन आणि लोकापर्णासाठी पुण्यात यायचे होते. मात्र पावसामुळे तो कार्यक्रम रद्द करावा लागला. त्यात माझेच नुकसान झाले. कारण पुण्यातील कणकणात राष्ट्रभक्ती आणि समाजभक्ती आहे. अशा पुण्यात येणे ऊर्जावान बनवते. त्यामुळे मी आज पुण्यात येऊ शकलो नाही यात माझे मोठे नुकसान आहे. पण आज तंत्रज्ञानाच्या सहायाने आपल्या सर्वांना भेटण्याचे सौभाग्य मिळाले आहे. आज पुणे महाराष्ट्रातील नवीन अध्यायाची साक्ष बनत आहे. आता जिल्हा न्यायालय ते स्वारगेटपर्यंतच्या सेक्शन मार्गाचे लोकार्पण झाले आहे. आता या मार्गावरही मेट्रो धावणार आहे. तसेच स्वारगेट ते कात्रजपर्यतच्या कामाचे आणि भिडे वाड्यातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मेमोरियलचे भूमिपूजन पार पडले.

**विठूरायांच्या भाविकांसाठी विमानतळ**

पीएम मोदी म्हणाले की, आज विठ्ठलाच्या आशिर्वादाने त्यांच्या भक्तांना उपहार भेटले आहे. सोलापूरला एअर कनेक्टीव्हीला जोडण्यासाठी विमानतळाला अद्यावत करण्याचे काम पूर्ण झाले आहे. याठिकाणी प्रवाशांसाठी विविध सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आता थेट सोलापूरला येता येणार आहे. यामुळे व्यवसाय आणि पर्यटनाला चालना मिळणार आहे. या विकासकामांसाठी मी महाराष्ट्रातील जनतेला शुभेच्छा देतो.

**महायुतीचे सरकार रात्रंदिवस काम करत आहे**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज महाराष्ट्राला नवीन संकल्पांसह मोठ्या उद्दिष्टांची गरज आहे. यासाठी पुणे सारख्या शहराला प्रगतीचे केंद्रबिंदू बनवण्याची आवश्यकता आहे. पुण्यातील वाढती जनसंख्या शहराची गती कमी करू नये, उलट त्याचे सामर्थ्य वाढवावे, यासाठी आपल्याला आतापासूनच पावले उचलण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे आज महायुतीचे सरकार रात्रदिवस काम करत आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

**जुन्या कार्यपद्धतीमुळे देशासह महाराष्ट्राला मोठे नुकसान**

पुण्याच्या आधुनिक गरजा लक्षात घेता, खूप आधीपासून मेट्रोसारखी सुविधा दळवळणाची सुविधा आणण्याची आवश्यकता होती. मात्र दुर्भाग्याने मागील काही दशकांपासून नियोजन आणि दृष्टीकोनाचा अभाव राहिला. एखादी योजना चर्चेत आल्यानंतर तिची फाईल अनेक वर्ष अडकून पडायची. एखादी योजना बनली तरी एक-एक्प्रकल्प अनेक दशकांपर्यंत लटकून पडायचा. त्या जुन्या कार्यपद्धतेचे मोठे नुकसान देश आणि महाराष्ट्रासह पुण्यालाही भोगावे लागले, असे म्हणत काँग्रेसवर हल्लाबोल केला.

## आरपीआयची भाजपकडे १२ जागांची मागणी

**रामदास आठवलेंचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंना पत्र**

आगामी विधानसभा निवडणुकीत आरपीआयला १२ जागा देण्यात याव्यात, अशी मागणी आरपीयआयचे नेते आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी भाजपकडे केली आहे. यासंदर्भात आठवले यांनी भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना एक पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी मुंबईतील काही जागांवर देखील दावा केला आहे. रामदास आठवले यांनी काही दिवसांपूर्वी आम्हाला किमान १०–१२ जागांवर निवडणूक लढवण्याची संधी दिली पाहिजे, असे वक्तव्य केले होते.






## महाविकास आघाडीची सत्ता आली तर मंत्री होतील

**भंडारा, दि.२९ :** अहमदनगर येथील जामखेड तालुक्यातील खर्डा येथे विविध विकास कामांच्या भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी शरद पवारांनी संवाद साधला. यावेळी बोलताना रोहित पवार हे मंत्री असतील, असे सूचक वक्तव्य शरद पवारांनी केले. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. तसेच यावर राष्ट्रवादीचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी देखील यावर मत व्यक्त केले आहे. भंडारा येथे सध्या अजित पवारांची जनसन्मान यात्रा सुरू आहे. यावेळी सभेत बोलताना प्रफुल्ल पटेल म्हणाले,

## महाविकास व महायुतीतल्या नेत्यांपुढे मोठे कोडे....


# एकाच घरात किती जणांना उमेदवारी देणार ?

**■ महासागर दिपक कैतके**
**मुंबई, दि.२९ :**
आगामी विधानसभा निवडणुकीची जय्यत तयारी सर्वच पक्षांनी सुरु केली असली तरी महाविकास असो की महायुती या दोन्ही ठिकाणच्या विविध पक्षांतील नेत्यांपुढे एकाच घरात किती जणांना उमेदवारी द्यायची हा यक्षप्रश्न डोकेदुखी ठरल्याचे व त्यामुळेच त्यांच्या त्यांच्या उमेदवारीच्या याद्यांना अद्याप मुहूर्त सापडत नसल्याची माहिती एका ज्येष्ठ राजकीय विश्लेषकाने आपले नाव न छापण्याच्या अटीवर बोलताना उघड केली. त्याने अधिक माहिती देताना स्पष्ट केले की, महाविकास आघाडीत सहभागी असलेल्या काँग्रेस,शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस,उध्दव ठाकरे यांची शिवसेना हे तीन प्रमुख पक्ष असले तरी उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेत फक्त आदेश चालत असल्याने उध्दव ठाकरे ज्यांना उमेदवारी देतील ते अंतिम. त्यामुळे तेथे हा प्रकार नसल्यात गणला जातो.मात्र उर्वरीत जे दोन प्रमुख पक्ष आहेत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांना लोकसभा निवडणूकीत अभूतपूर्व यश मिळाल्याने या दोन्ही पक्षातल्या मातब्बर नेत्यांनी स्वतःसह मुलगा,सून,पुतण्या यांना उमेदवारी देण्यासाठी आपापल्या नेत्यांवर दबाव आणत आहेत.काँग्रेस मध्ये तरं थेट दिल्लीच्या नेत्यांचेही उंबरठे झिजवायचे प्रकार तर वाढीस लागल्याने या पक्षाच्या राज्यातील नेत्यांनी अक्षरशः हात टेकले आहेत.त्यातूनच पक्षाचे राज्य प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्याही डोक्याचा ताप वाढला आहे.

तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये वर्षभरापूर्वी अजित पवार यांनी उभी फूट पाडल्याने त्यांना आता नवखे उमेदवार उभे शोधावे लागत असून त्यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस मधील नेत्यांसह त्यांच्या कुटुंबातील मुला मुलींना, सूनांना आपल्या गळी लावून त्यांना आपल्या पक्षातून उमेदवारी देण्याचा सपाटाच लावला आहे.कारण आगामी विधानसभेत शरद पवार यांनी कोणत्याही परिस्थितीत आपले अधिकाधिक आमदार निवडून आणण्याचा चंग बांधला आहे.याला कारणही त्यांना उमेदवारांचा मोठा तुटवडा जाणवत असला तरी खुद्द पवारांचीही डोकेदुखी वाढली आहे हे मात्र नक्की,अशी माहितीही या विष्लेशकाच्या बोलण्यातून उघड झाली. आता राहता राहिला महायुती तरं यातील सर्वात मोठा पक्ष भाजपच्या डोकेदुखीत याच प्रश्नाने वादळ ऊभे केले आहे.याचे खरे कारण भाजपचे विद्यमान मातब्बर खासदार व माजी केंद्रिय मंत्री नारायण राणे यांच्या संदर्भातली. ते स्वतः खासदार, एक मुलगा निलेश राणे हा कणकवली विधानसभेतून विद्यमान आमदार.आता त्यांच्याच घरात राणे यांचा मोठा मुलगा माजी खासदार निलेश राणे यांनीही अलीकडेच आमदारकी लढवण्या बाबत सूचक वक्तव्याची.त्यावेळी आपण आता विधानसभा निवडणूक लढवणार च असे वक्तव्य केले होते. मात्र नेमके कोणत्या मतदार संघातून लढणार त्याची वाच्यता केली न्हवती.मात्र त्यांचा डोळा हा कुडाळ–मालवण विधानसभा मतदार संघावर असून येथून त्यांनी वर्षभरापूर्वीच आपली तयारी करण्यास सुरूवात केली आहे.परंतु प्रत्यक्षात हा मतदारसंघ शिवसेनेचा आहे. त्यामुळे जागा वाटपात तो भाजपसाठी सुटेल की नाही हा खरा प्रश्न आहे. कारण अगोदरच लोकसभेला शिवसेना शिंदे गटाने आपल्या कोट्यातली जागा नारायण राणे यांच्यासाठी सोडली. त्यानंतर कुडाळ मालवणचीही जागा शिंदे राणेंसाठी सोडणार का ? यावर निलेश राणे यांचे भवितव्य अवलंबून आहे. त्यामुळे उमेदवारी देण्यावरून भाजपच्या राज्यातील नेत्यांच्या अडचणीत वाढ झाल्याचा दावा या विश्लेशकाने केला.असाच प्रकार भाजपतील काही वजनदार नेत्यांनाच्या बाबतींत घडत आहे.परंतू त्यांचे अंतिम उमेदवारी ही केंद्रिय गृहमंत्री अमित शहा हेच ठरवत असल्याने जर उमेदवारी मिळाली नाही तर पक्षात मोठया प्रमाणावर बंडखोरी वाढणार असे भाकीतही या विष्लेशकाने वर्तविले.

### आता निष्ठावंतांनाच संधी........

दरम्यान एकाच घरात उमेदवारी किती जणांना द्यायची हा प्रश्नही भाजप समोर असणार आहे.कारण घराणेशाही विरोधात नेहमीच भाजपमध्ये बोलले जाते.त्यातही ते या काळात पहिल्यांदाच भाजपचे आमदार मोठया संख्येने निवडून आल्याने मुख्यमंत्री पद भाजपकडे चालून आले. देवेंद्र फडणवीस यांनी सलग वर्ष उत्तमरीत्या मुख्यमंत्रीपद भूषविले. तेंव्हापासून पक्षातील निष्ठावान कार्यकर्त्यांच्या मुस्कटदाबी करण्याची खरी लागण पक्षाला लागली. कारण त्यांच्या पदरी विधान परिषद तर सोडाच पण साध्या एखाद्या महामंडळाच्या सदस्य पदासाठीही त्यांना डावलण्यात आले. उदाहरणच घ्यायचे झाले तर माजी आमदार राज पुरोहित,अतुल शहा कोकणातून बाळ माने, विनय नातू, अशी बरीच देता येतील इतक्या नावाची यादी वाढत जाईल.मात्र मागील दोन वर्षात तर या घुसमटीचा स्फोट होतो की काय इतपत अंतर्गत नाराजी वाढीला लागली.मात्र नुकत्याच झालेल्या लोकसभा निकालाचे पूर्ण सत्य अमित शहा यांना कळल्याने त्यांनी कठोर भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे.राज्यातील प्रमुख नेत्यांना आता निष्ठावंताची दखल घेण्याच्या सक्त आदेशच दिले असून महामंडळा वरील नियुक्त्या असो की राज्यपाल कोट्यातून विधानपरिषदेवर नियुक्त करायच्या आमदारांच्या नियुक्त्या यात सक्तीने निष्ठावंतांना स्थान द्यायलाच हवेत असे स्पष्टपणे स्थानिक नेत्यांना बजावण्यात आले आहे. कारण भर विधानसभा निवडणुकीत निष्ठावंताची नाराजी लोकसभेसारखी भोवणार नाही व पुन्हा राज्यात भाजप आपल्या मित्रपक्ष सोबत राज्यात सत्तेत येईल असा चंगच अमित शहा यांनीही मनाशी बांधल्याने त्यांनीही येत्या निवडणूकीत जोमाने कामाला लागण्याचे दिसत आहे, असा गौप्यस्फोटही विष्लेशकाने शेवटी बोलताना केला.

# बदलापूर, अंबरनाथला मिळणार अतिरिक्त पाणी उल्हास नदीतून आरक्षण मंजूर, योजना मार्गी लागणार

बदलापूर, दि. २९ : प्रतिनिधी

अंबरनाथ आणि बदलापूर शहरासाठी उल्हास नदीतून अतिरिक्त ७ दशलक्ष घनमीटर पाण्याचे आरक्षण मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे अंबरनाथमधील पाणी योजना मार्गी लागणार आहे. तर पाणी आरक्षणामुळे रखडलेली बदलापुरातील पाणी योजना मंजूर होणार आहे. दोन्ही शहरांच्या 256 पर्यंत वाढणाऱ्या लोकसंख्येला पुरेल इतका पाणीसाठा यामुळे पदरात पडला आहे. आता पाणी योजना मार्गे लागल्यास या वाढीव आरक्षण मिळालेल्या पाण्याचा वापर करता येईल.

बदलापूर आणि अंबरनाथ शहराची पाणीपुरवठा व्यवस्था महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून चालवली जाते. बदलापूर शहराला उल्हास नदीवर बांधण्यात आलेल्या बॅरेज बंधाऱ्यातून पाणी पुरवले जाते. अंबरनाथ शहरालाही याच पाण्यातून काही भाग दिला जातो. अंबरनाथ शहराची लोकसंख्या पाहता अंबरनाथ पालिकेचे चिखलोली धरण शहराला सहा दशलक्ष लिटर पाणी देते. तर २० दशलक्ष लिटर पाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून अंबरनाथ शहराला पुरवले जाते. बॅरेज बंधाऱ्याची क्षमता सुमारे १३० दशलक्ष लिटर इतकी आहे. त्यातील ७० दशलक्ष लिटर पाणी बदलापूर शहराला तर उर्वरित पाणी अंबरनाथ शहराला दिले जाते. मात्र दोन्ही शहरांची वाढती पाण्याची मागणी पाहता शासनाकडून २०५६ पर्यंत पुरेल इतक्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी अंबरनाथ आणि बदलापूर या दोन्ही शहरांसाठी वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली. यातील अंबरनाथ शहराच्या पाणीपुरवठा योजनेला गती मिळाली आहे. तर तांत्रिक बाबींमुळे बदलापूर शहरातील पाणी योजना रखडली होती.

यामध्ये नव्याने पाणी आरक्षण ही महत्त्वाची बाब होती. गेल्या आठवड्यात जलसंपदा विभागाने याबाबतचा शासन निर्णय जाहीर केला असून अंबरनाथ आणि बदलापूर शहरासह आयुध निर्माण कारखान्याला एकत्रितपणे सात दशलक्ष घनमीटर इतका वाढीव पाणीपुरवठा मंजूर केला आहे. बदलापूर शहरातील बॅरेज बंधाऱ्यातून बदलापूर शहरासाठी तर नाळिंबी येथील उल्हास नदीतून अंबरनाथ शहरासाठी ही पाणी उचल केली जाणार आहे. नव्याने मार्गी लागणाऱ्या पाणी योजनांमधून या पाण्याचा वापर करता येईल अशी माहिती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. या वाढीव पाणी आरक्षणामुळे बदलापूर आणि अंबरनाथ शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**यापूर्वीचे पाणी कुठे अडले ?**

बदलापूर शहरासाठी अतिरिक्त पाच दशलक्ष घनलिटर पाणी मंजूर करण्यात आले होते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून हे पाणी मिळणार होते. मात्र त्यातील अवघे दोन दशलक्ष लिटर पाणी सध्या मिळाले आहे. त्यामुळे उरलेले तीन दशलक्ष लिटर पाणी कुठे अडले असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

# नागलाबंदर खाडी किनारा सुशोभिकरण कामाला महिनाभरात सुरुवात, दोन वर्षात प्रकल्पाचे काम पूर्ण होणार

ठाणे, दि. २९ : प्रतिनिधी

घोडबंदर येथील गायमुख भागातील खाडी किनारी भागात चौपाटी विकसित करण्यात आली असतानाच, त्यापाठोपाठ आता या प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यात गायमुख ते नागलाबंदर खाडी किनारा विकसित करून आरामाराची प्रतिकृती उभारण्यात येणार आहे. या कामासाठी राज्य शासनाने १५० कोटी रुपये मंजूर केले असून ठाणे महापालिकेने या कामाच्या निविदा प्रक्रीया पुर्ण करत ठेकेदाराला कामाचा कार्यादेश दिल्याने प्रकल्प कामाला महिनाभरात सुरूवात होण्याची चिन्हे आहेत. येत्या दोन वर्षात प्रकल्पाचे काम पुर्ण करण्यात येणार आहे.

ठाणे शहराला ३२ किमीचा खाडी किनारा लाभला आहे. या परिसरात परदेशातून भारतात स्थलांतर करणाऱ्या फ्लेमिंगो पक्ष्यांसह इतर पक्षी-प्रजाती आढळतात. परंतु या भागातील पाणथळ जमिनीवर भुमाफियांकडून अतिक्रमण करण्याचे प्रकार गेल्या काही वर्षात वाढीस लागले होते. या प्रकारांमुळे खाडी किनारी भागाचे अस्तित्व धोक्यात आले होते. नेमकी ही बाब लक्षात घेऊन ठाणे महापालिकेने खाडी किनारा सुशोभीकरण प्रकल्पाची आखणी करत खाडी किनारा परिसर संरक्षित करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार कोपरी, कोलशेत, वाघबीळ आणि गायमुख भागात खाडी किनारा भागाचे सुशोभिकरण करण्यात आले आहे. गायमुख भागात पहिल्या टप्प्यात ५०० मीटर, दुसऱ्या टप्प्यात ८०० मीटर खाडी किनारी भागाचे सुशोभिकरण करण्यात आले. त्यापाठोपाठ आता तिसऱ्या टप्प्यात गायमुख ते नागलाबंदर असा ८०० मीटर लांबीचा खाडी परिसर सुशोभित करण्यात येणार आहे. त्याठिकाणी आरमाराची प्रतिकृती उभारण्यात येणार आहे. शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून पालिका प्रशासनाने यासंबंधीचा प्रस्ताव तयार करून त्यास मंजुरी दिली होती. या कामासाठी या कामासाठी



राज्य शासनाने १५० कोटी रुपयांना निधी मंजुर केला होता. या कामासाठी पालिकेने निविदा प्रक्रीया राबवून ठेकेदार निश्चित केला होता. हे काम सुरु करण्यासाठी आवश्यक पर्यावरण खात्याची, सीआरझेडची परवानगी महापालिकेला मिळाल्या आहेत. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या कामाचे काही दिवसांपुर्वी भुमीपुजन करण्यात आले होते. पालिके प्रशासनाने ठेकेदाराला कामाचा कार्यादेश दिला आहे. यामुळे महिनाभरात या प्रकल्पाच्या कामाला सुरूवात होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजाच्या आरमाराचे प्रमुख कान्होजी आंग्रे यांचा इतिहास देखील नागलाबंदर खाडी किनाऱ्याला असल्यामुळे या परिसराला ऐतिहासिक असे महत्व आहे. घोडबंदर गावात इतिहासाच्या अनेक पाऊलखुणा दिसतात. यामुळे खाडी किनारा विकसित होत असताना नागला बंदर येथे आरमार केंद्राची प्रतिकृती उभारली जाणार असून त्यात या संपूर्ण इतिहासाची माहिती नवीन पिढीला, इतिहासप्रेमींना करून दिली जाणार आहे. तसेच नागरिकांसाठी मोठा 'पाथ वे', विविध प्रकारचे आकर्षक गार्डन, विसर्जन घाट, लहान मुलांना खेळण्यासाठी जागा, बसण्यासाठी वेगवेगळ्या जागा तयार केल्या जातील. शिवाय दाट झाडांचे उद्यान, हिरवेगार लॉन, पार्किंगची सुविधा, वॉक वे, खेळण्यासाठी मोकळी जागा, ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी जागा, लहान मुलांसाठी मनोरंजन क्षेत्र, व्हॉली बॉल – फुटबॉल खेळता येईल अशी जागा, आकर्षक लायटिंग, सुसज्ज जेटी, दशक्रिया घाट अशी विविध कामे येथे केली जाणार आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रातील गायमुख तिसरा टप्पा ते नागला बंदर खाडी किनारा विकसित करून आरामाराची प्रतिकृती उभारण्याचे काम लवकरच म्हणजे पुढील महिन्यापासून सुरु होणार आहे. या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून ठेकेदाराला कार्यादेश देण्यात आला आहे. खाडी किनारा विकास करत असताना येथे 'वॉटर स्पोर्ट्स' सुरु करण्याचाही विचार आहे. पुढील २ वर्षात हा खाडी किनारा विकास पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे पर्यटनाला चालना मिळण्याबरोबरच स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे, अशी माहिती आमदार प्रताप सरनाईक यांनी दिली.

# माजी खासदार संजयकाका पाटील यांची घरात घुसून मारहाण

सांगली, दि. २९ : प्रतिनिधी

कवठेमहांकाळ येथील राष्ट्रवादीचे नेते माजी उपनगराध्यक्ष अय्याज मुल्ला यांना माजी खासदार संजय काका पाटील व त्यांच्या समर्थकांनी घरात घुसून मारहाण केली. यावेळी खासदार व त्यांच्या समर्थकांनी मुल्ला यांच्या घरातील इतर महिला व मुलांनाही मारहाण केली. यावेळी मुल्ला यांना वाचवायला आलेल्या त्यांच्या ७६ वर्षीय आईलाही स्वतः खासदारांनी ढकलून दिले. ही घटना आज सकाळी साडे सातच्या दरम्यान घडली.

सकाळी साडेसातच्या सुमारास अय्याज मुल्ला हे फेरफटका मारून घरासमोर बसले होते.यावेळी संजय काका पाटील यांचे पीए खंडू होवळे हे मुल्ला यांच्या घरी आले.व संजय काका भेटायला येणार असल्याचे सांगितले. यावेळी मुल्ला यांनी घरी चहा करायला सांगितला. तोपर्यंत दारात दोन-तीन गाडी येऊन थांबल्या. गाड्यांमधून माजी खासदार संजय पाटील यांच्यासह दहा-पंधरा जण उतरले. त्यांनी थेट घरात घुसून अय्याज मुल्ला यांना मारहाण करायला सुरुवात केली. त्यांना वाचवायला आलेले त्यांच्या घरातील महिला व मुलांनाही शिवीगाळ करत जबर मारहाण केली. या घटनेचा जाहीर निषेध सुरू झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे तालुक्यातील या गुंडगिरी विरुद्ध उद्या निषेध सभा आयोजित करण्यात येणार आहे.

# कराड दक्षिण येथील मुंबईवासियांचा 29 सप्टेंबरला वाशी येथे स्नेह मेळावा

कराड दि. २९ प्रतिनिधी

कराड दक्षिण मतदार संघातील विकासाची गंगा आणणारे, गावोगावी रस्ते, इतर सुविधा निर्माण करणारे विकासपुरुष, माजी मुख्यमंत्री व विद्यमान आमदार पृथ्वीराज चव्हाण

मुंबईस्थित बांधवांशी त्यांच्या कुटूंबातील व्यक्तींना भेटण्यासाठी रविवार दि २९ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता विष्णुदास भावे नाट्यगृह,वाशी,नवी मुंबई येथे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या सोबत रयत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन, जि. प.सदस्य,सातारा जिल्हा काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष ॲड.उदय दादा पाटील, यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहून आपल्या गावच्या उर्वरित समस्या जाणून घेणार आहेत. निवडणुका येतील आणि जातील परंतु जनतेशी जवळीक साधून त्यांच्या गावातील अडीअडचणी सोडवण्याची जबाबदारी कराड दक्षिणचे प्रथम नागरिक म्हणून आमदारांची असते, आणि ती जबाबदरी लक्षात घेऊन फक्त आपल्या कार्यकर्त्यांशी चर्चा न करता त्यांच्या कुटूंबासोबत चर्चा करण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन केले असल्याचे सांगितले आहे. मुंबई, ठाणे,नवी मुंबई येथे राहणारे कराड दक्षिण मधील सर्व काका-बाबा प्रेमी नागरिकांनी कुटूंबासोबत या कार्यक्रमाला उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्याच्या ऊर्जा पायाभूत सुविधांमध्ये वाढ होणार



मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी

महाराष्ट्र आणि इतर राज्यांमध्ये नाविन्यपूर्ण नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांसाठी सहकार्य करण्यासाठी महात्मा फुले रिन्युएबल एनर्जी अँड इन्फ्रास्ट्रक्चर टेक्नॉलॉजी लिमिटेड (महाप्रित) आणि एनटीपीसी ग्रीन एनर्जी लिमिटेड एनजीईएल (NGEL) यांच्यात मुंबई येथे संयुक्त उपक्रम करार झाला आहे. या धोरणात्मक भागीदारीचे उद्दिष्ट 10 गीगावॅट क्षमतेचे रिन्यूएबल एनर्जी पार्क आणि अक्षय ऊर्जा प्रकल्प राबविण्यात येतील. जेणेकरून राज्याच्या ऊर्जा पायाभूत सुविधांमध्ये वाढ होणार आहे.

या संयुक्त उपक्रमाचा एक भाग म्हणून महाप्रित आणि एनटीपीसी ग्रीन एनर्जी लिमिटेड विविध अक्षय ऊर्जा प्रकल्प जसे की ग्राउंड माउंटेड सोलर, फ्लोटिंग सोलर, बॅटरी एनर्जी स्टोरेज, हायब्रीड सोलर, ई-प्रकल्प विकसित करण्यासाठी एकत्र काम करतील आणि या अक्षय ऊर्जा प्रकल्पांमधून 40% वीज निर्मिती अपेक्षित आहे. ही भागीदारी महाराष्ट्राच्या 2030 च्या अक्षय ऊर्जा निर्मितीच्या ध्येयात लक्षणीय योगदान देईल, अशी अपेक्षा आहे. या संयुक्त उपक्रमामुळे राज्यात तांत्रिक आणि गैर-तांत्रिक रोजगाराच्या संधी निर्माण होतील. तसेच सुमारे 30 हजार एकर बिगरशेती आणि नापीक जमीन या प्रकल्पासाठी वापरात येईल जी स्थानिक शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आहे. त्यामुळे राज्यात मोठी आर्थिक गुंतवणूक येण्यास मदत होईल. यावेळी महाप्रितचे व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी यांनी एनजीईएल सोबतचे हे सहकार्य राज्यातील नवीकरणीय ऊर्जा पायाभूत सुविधा वाढविण्याच्या आमच्या प्रयत्नांमध्ये एक महत्त्वाचे पाऊल आहे असे सांगितले.

एनजीईएल चे सीईओ राजीव गुप्ता म्हणाले, एनजीईएल महाप्रितशी संलग्न होऊन ह्या अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांची अंमलबजावणी करतील. यावेळी महाप्रित आणि एनजीईएल चे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# देशाच्या संसदीय पेट्रोलियम व नैसर्गिक गॅस समितीच्या अध्यक्षपदी खासदार सुनिल तटकरे

मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी

देशाच्या संसदीय पेट्रोलियम व नैसर्गिक गॅस समितीच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांची निवड झाली असून याबाबत त्यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

देशात सर्वाधिक गतीने मागणी, पुरवठा आणि आर्थिक वृध्दीदर असलेल्या पेट्रोलियम व नैसर्गिक गॅस क्षेत्रात सुनिल तटकरे यांना सन्मानाचे पद मिळाले आहे. महाराष्ट्रासह रायगडसाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे.

राज्यसभा व लोकसभेतील ३१ खासदारांचा या समितीमध्ये समावेश असून रायगडचे खासदार सुनिल तटकरे हे या समितीचे अध्यक्ष झाले आहेत. सध्या देशातील सर्व क्षेत्रात पेट्रोलियम व नैसर्गिक गॅसच्या क्षेत्रात सर्वाधिक वाढ होत आहे. दरवर्षी साधारणतः ३ ते ५ टक्के इतका वृध्दीदर या क्षेत्राचा आहे. देशाच्या आर्थिक वृध्दीदरात या क्षेत्राचे सर्वाधिक योगदान आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापार, परस्पर संबंधाबाबत पेट्रोलियम व नैसर्गिक गॅस क्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे. आयात-निर्यात धोरण, पायाभूत सुविधा आणि औद्योगिक वृध्दीदरात या क्षेत्राचा अग्रकम आहे. त्यामुळे देशाच्या प्रगती व समृध्दीचा पाया म्हणून पेट्रोलियम व नैसर्गिक गॅस महत्वाचे आहे. पेट्रोलियम व नैसर्गिक गॅस या क्षेत्राला देशाच्या आर्थिक प्रगतीचे 'इंधन व इंजिन' मानले जाते. त्यामुळेच अनन्यसाधारण महत्व असलेल्या संसदीय समितीच्या अध्यक्षपदाची धुरा खासदार सुनिल तटकरे यांच्याकडे आल्याने हा महाराष्ट्राचा सन्मान असल्याचे बोलले जात आहे.

# बंदर व गोदी कामगारांना भरघोस पगारवाढीचा करार संपन्न

मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी

भारतातील प्रमुख बंदरामधील बंदर व गोदी कामगारांना १ जानेवारी २०२२ पासून लागू होणारा भरघोस पगारवाढीचा वेतन करार २७ सप्टेंबर २०२४ रोजी मुंबईत संपन्न झाला. इंडियन पोर्ट असोसिएशन व सहा मान्यताप्राप्त कामगार महासंघ यांच्यामध्ये २७ ऑगस्ट २०२४ रोजी दिल्लीमध्ये समझोता वेतन करार संपन्न झाला होता.इंडियन पोर्ट असोसिएशनचे व्यवस्थापकीय संचालक विकास नरवाल यांनी २७ सप्टेंबर २०२४ रोजी द्विपक्षीय वेतन समितीची मिटिंग बोलवली होती. या मिटींगला सर्व बंदरांचे चेअरमन व सहा फेडरेशनचे कामगार नेते यांना अंतिम वेतन करारासाठी मुंबईत निमंत्रित केले होते. दिल्लीत झालेल्या समझोता वेतन करारानुसार मुंबईत द्विपक्षीय वेतन समितीचे अध्यक्ष श्री. राजीव जलोटा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मिटिंगमध्ये प्रदीर्घ चर्चेनंतर बंदर व गोदी कामगारांना १ जानेवारी २०२२ ते ३१ डिसेंबर २०२६ असा ५ वर्षाचा भरघोस पगारवाढीचा वेतन करार संपन्न झाला. या वेतन करारानुसार ३१ डिसेंबर २०२१ च्या मूळ पगारात १ जानेवारी २०२२ चा ३०% महागाई भत्ता विलीन करून त्यावर ८.५० टक्के फिटमेंट दिले जाणार आहे. घरभाडे भत्ता ३० टक्के मिळेल. नोकरीत असलेल्या कामगारांना प्रति महिना ५००/ रुपये विशेष भत्ता मिळेल. वार्षिक पगारवाढ ३ टक्के मिळेल. १ जानेवारी २०२२ पासून सध्याच्या प्रथेनुसार प्रभावी वेतनश्रेणी तयार केल्या जातील. या वेतन करारानुसार पोर्ट वसाहतीमध्ये राहणाऱ्या कामगारांना कमीत कमी २८३०/ रूपये व जास्तीत जास्त १३५९०/ रूपये तर वसाहतीत न राहणाऱ्या कामगारांना कमीत कमी ५४१०/ रूपये व जास्तीत जास्त २५५००/ रुपये अशी भरघोस पगारवाढ मिळेल. निवृत्त झालेल्या कामगारांच्या निवृत्ती वेतनात ०१/०१/२०२२ पासून कमीत कमी ११६५/ रुपये तर जास्तीत जास्त ६५४५/ रुपये वाढ होणार आहे.

महासंघाच्या नेत्यांनी केंद्रीय नौकानयन मंत्री मा.श्री.सर्वानंद सोनोवाल, शिपिंग सचिव श्री. टी. के. रामचंद्रन,इंडियन पोर्ट असोसिएशनचे चेअरमन श्री. राजीव जलोटा, व्यवस्थापकीय सचिव श्री.विकास नरवाल यांना धन्यवाद दिले.

मुंबईत झालेल्या अंतिम वेतन करारावर व्यवस्थापनाच्या वतीने इंडियन पोर्ट असोसिएशनचे चेअरमन राजीव जलोटा, व्यवस्थापकीय सचिव विकास नरवाल, प्रादेशिक श्रम आयुक्त (केंद्रीय) श्री. सुनील माळी तर कामगारांच्या वतीने ऑल इंडिया पोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशन ( वर्कर्स ) चे (HMS) ॲड.एस. के. शेट्ये, सुधाकर अपराज,विद्याधर राणे, ऑल इंडिया पोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशनचे(HMS) मोहम्मद हनीफ, केरसी पारेख, डी. के. शर्मा, जी.एम.कृष्णमूर्ती, एल. सत्य नारायणन, वॉटर ट्रान्सपोर्ट वर्कर्स फेडरेशन ऑफ इंडियाचे( CITU) नरेंद्र राव, सी.डी. नंदकुमार, इंडियन नॅशनल पोर्ट अँड डॉक वर्कर्स फेडरेशनचे (INTUC) प्रभात सामंतराय, पोर्ट अँड डॉक वाटरफ्रंट वर्कर्स फेडरेशन ऑफ इंडिया (AITUC ) बी.सी. मासेन,भारतीय पोर्ट अँड डॉक मजदूर महासंघ( BMS) सुरेश पाटील यांनी सह्या केल्या आहेत.

# मुख्यमंत्री योजनादूत'; अर्ज करण्यास 30 सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ

मुंबई, दि. २९ : प्रतिनिधी

शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या योजनेला मिळणारा प्रतिसाद पाहता मुदतवाढ देण्यात आली असून आता इच्छुक उमेदवारांना ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. दि. ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनादूत पोर्टलवर ज्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे अशा उमेदवारांनी Apply बटन दाबून अर्ज Submit करायला विसरू नये. तरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

# रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष परशुराम वाडेकर यांना जीवे मारण्याची धमकी

पुणे, दि. २७ : प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले गट) शहराध्यक्ष परशुराम वाडेकर यांना जीवे मारण्याची धमकी देऊन जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी एका डॉक्टरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत परशुराम बाळकृष्ण वाडेकर (वय ५३, रा. कुंदन हेरिटेज, मुंबई-पुणे रस्ता, खडकी) यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. वाडेकर यांना जीवे मारण्याची धमकी आणि जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी डॉ. अमित कस्तुरीलाल लुथरा (रा. मार्बल प्लाझा, विमाननगर ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## वैज्ञानिक संशोधन आता अधिक वेगवान


# संशोधन संस्थांमध्ये स्वदेशी बनावटीचे महासंगणक

पुणे, दि. २९ : प्रतिनिधी

प्रगत संगणन विकास केंद्राने (सी-डॅक) विकसित केलेले भारतीय बनावटीचे 'परम रुद्रा' ही महासंगणन प्रणाली देशातील तीन संशोधन संस्थांना देण्यात आली आहे. या महासंगणन प्रणालीमुळे विविध प्रकारच्या वैज्ञानिक संशोधनाला गती मिळणे शक्य होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'परम रुद्रा या महासंगणन प्रणालीचे उद्धाटन करण्यात आले. ही महासंगणन प्रणाली अनुक्रमे नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्रोफिजिक्स (एनसीआरए) खोडद येथील जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप (जीएमआरटी), नवी दिल्लीतील इंटर युनिव्हर्सिटी ॲक्सिलरेटर सेंटर (आयुएसी) कोलकाता येथील एस. एन. बोस नॅशनल सेंटर फॉर बेसिक सायन्स या संस्थांमध्ये बसवण्यात येणार आहे. या तीनही संस्था विविध क्षेत्रात संशोधन करत असल्याने संशोधन वेगवान होण्यास चालना मिळणार आहे. नॅशनल सुपर कम्प्युटिंग मिशन अंतर्गत सी-डॅकने ही महासंगणन प्रणाली विकसित केली आहे.

महासंगणन प्रणालीच्या उपयोगाबाबत नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्रोफिजिक्सचे विज्ञान प्रसार अधिकारी डॉ. जे. के. सोळंकी म्हणाले, की महासंगणन प्रणालीमुळे एफआरबीसारखे (फर्स्ट रेडिओ बर्स्ट) खगोलीय घडामोडींचा सखोल अभ्यास करणे शक्य होणार आहे. खगोलीय घडामोडींचे अधिक सखोल आणि वेगवान पद्धतीने विश्लेषण करता येणार आहे. त्यामुळे खगोलीय संशोधनाला चालना मिळण्यास मदत होईल.



**हवामान संशोधनासाठी उच्च क्षमता संगणन प्रणाली**

पृथ्वीविज्ञान मंत्रालयाच्या वातावरण आणि हवामान संशोधनासाठी उच्च क्षमता संगणन प्रणालींचा (एचपीसी) वापर केला जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या प्रणालींचे उद्धाटन करण्यात आले. या प्रणालीसाठी ८५० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. या प्रणालीमुळे देशाच्या संगणन क्षमतमध्ये वाढ होऊन वातावरण आणि हवामानातील तीव्र घडामोडींचे अधिक विश्वासार्ह अंदाज वर्तवण्यासाठीचे पाऊल पुढे पडले आहे. ही उच्च क्षमता संगणन प्रणाली पुण्यातील इंडियन इस्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटिओरॉलॉजी (आयआयटीएम) आणि नोएडा येथील नॅशनल सेंटर फॉर मीडियम रेंज वेदर फोरकास्टिंग (एनसीएमआरडब्ल्यूएफ) येथे कार्यान्वित केली जाणार आहे. प्रणालींना अर्क आणि अरुणिका अशी नावे देण्यात आली आहेत. या आधीच्या प्रणालींना आदित्य, भास्कर, प्रत्युष आणि मिहिर अशी नावे होती. या प्रणालींमुळे पृथ्वीविज्ञान मंत्रालयाची संगणन क्षमता आधीच्या ६.८ पेटाफ्लॉप्सवरून २२ पेटाफ्लॉप्सपर्यंत वाढली आहे.

# नाशिकमधून मराठवाड्याकडे 48 टीएमसी पाणी, गंगापूरसह 12 धरणांमधून विसर्ग

नाशिक, दि. २९ : प्रतिनिधी

पावसाने नव्याने जोर धरल्याने नाशिक शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या गंगापूरमधून पुन्हा एकदा विसर्ग करण्यात आला आहे. जिल्ह्यातील एकूण १२ धरणांमधून पाणी सोडण्यात आले आहे. सर्वच धरणे तुडुंब असल्याने विसर्गाशिवाय कोणताही पर्याय नसल्याचे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. नांदूरमध्यमेश्वरमधून मराठवाड्यातील जायकवाडीकडे आतापर्यंत ४७ हजार ६२२ दशलक्ष घनफूट म्हणजे जवळपास ४८ टीएमसी इतक्या पाण्याचा विक्रमी विसर्ग झाला आहे.

चार, पाच दिवसांपासून जिल्ह्यात पावसाने मुक्काम ठोकला आहे. कधी विजांच्या कडकडाटात तर कधी संथपणे संततधार होत आहे. गुरुवारपासून त्याचा जोर वाढला. शहरातील रस्ते व चौकात अनेक ठिकाणी पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत होत आहे. तात्पुरत्या स्वरुपात बुजविलेले खड्डे पुन्हा उघडे पडल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. जिल्ह्यातील सर्वच धरणे तुडुंब भरली आहेत. लहान-मोठ्या २४ धरणांमध्ये सध्या ६४ हजार ३४० दशलक्ष घनफूट म्हणजे ९८ टक्के पाणीसाठा आहे. त्यामुळे पावसाचे येणारे पाणी साठविण्यास धरणात जागा शिल्लक नसल्याचे विसर्ग करावा लागत आहे. शुक्रवारी



सकाळी गंगापूर धरणातून ११६९ क्युसेकचा विसर्ग करण्यात आला. याशिवाय दारणा २००४, कडवा १६६०, भाम ११२०, वालदेवी ३०, आळंदी ३०, भावली १३५, वाघाड २२९, वाकी ११६, नांदूरमध्यमेश्वर बंधारा १५२४८, कश्यपी ३२०, करंजवण ६०२ क्युसेकचा विसर्ग करण्यात आल्याचे पाटबंधारे विभागाने म्हटले आहे.

**तीन समुहातील पाणी मराठवाड्याकडे**

गंगापूर, दारणा आणि पालखेड समुहातील धरणांचे पाणी नांदूरमध्यमेश्वरमार्गे गोदावरी नदीतून मराठवाड्यातील जायकवाडी धरणाकडे जाते. यंदा वरच्या भागात चांगला पाऊस झाल्यामुळे धरणे आधीच पूर्ण क्षमतेने भरली. खालील भागात मोठ्या प्रमाणात पाणी सोडले गेले. एकट्या नाशिक जिल्ह्यातून मराठवाड्याकडे ४७ हजार ६२२ दशलक्ष घनफूट म्हणजे जवळपास ४८ टीएमसी पाणी सोडल्याची आकडेवारी आहे. या पाण्यातच जायकवाडी धरण जवळपास निम्मे भरल्याचे पाटबंधारे विभागाचे निवृत्त कार्यकारी अभियंता उत्तम निर्मळ यांनी सांगितले.

### स्वच्छता ही सेवा' ला अनुसरून नागपूरकरांनी श्रमदानातून दिला स्वच्छतेचा संदेश

# मनपाच्या भव्य स्वच्छता मोहिमेला नागरिकांचा प्रतिसाद






■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

स्वच्छ, सुंदर, स्वस्थ आणि हरित नागपूर शहर साकारण्यासाठी शेकडो हात सरसावले, स्वच्छता ही सेवा या अभियानास अनुसरून नागपूरकरांनी श्रमदानाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश दिला. नागपूर महानगरपालिकेने रविवारी (ता.29) सकाळी राबविलेल्या भव्य स्वच्छता मोहिमेला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला. मनपाच्या दहाही झोन मधील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने श्रमदान केले.

स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता' या संकल्पनेस अनुसरून केंद्र सरकारच्या स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल व श्री. अजय चारठाणकर यांच्या नेतृत्वात भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मोहिमेत सहभाग नोंदवीत मनपा अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांनी सतरंजीपुरा झोन अंतर्गत येणाऱ्या शांतीनगर म्हाडा कॉलनी परिसरात श्रमदान केले. मनपा अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांनी स्वतः परिसर झाडूने स्वच्छ केला. तसेच स्थानिक नागरिकांशी संवाद साधला.

यावेळी मनपाच्या सर्व वरिष्ठ अधिकारी, सर्व सहायक आयुक्त, कार्यकारी अभियंता, झोनल स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक यांनी संबंधित झोन मध्ये श्रमदान करीत मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला. यात प्लॉगर्स ग्रुप, ग्रीन व्हिजील फाउंडेशन, तेजस्विनी लिडर्स क्लब, सेव्हिंग ड्रिम्ज फाउंडेशन, किंग कोब्रा ऑर्गनॉयजेशन, वार्ड समस्या निवारण समिती, जनसेवा स्वयंसेवा महिला बचत गट, तेजस्विनी मंच, फिल गुड फाउंडेशन,वेद फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने श्रमदान करण्यात आले.

मनपाद्वारे लक्ष्मीनगर झोन अंतर्गत जेल परिसर, रहाटे चौक ते दीक्षाभूमी येथे स्वच्छता करण्यात आली यात प्लॉगर्स ग्रुप या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य मिळाले. तर धरमपेठ झोन अंतर्गत महाराजबाग चौक ते लायब्ररी सिमेंट रोड येथे स्वच्छता करण्यात आली यात ग्रीन व्हिजील फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य मिळाले. हनुमान नगर झोन अंतर्गत जुनी शुक्रवारी येथे स्वच्छता करण्यात आली.

यात तेजस्विनी लिडर्स क्लब या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य मिळाले, धंतोली झोन अंतर्गत चनाटोली ते मैत्री विहार रामबाग येथे स्वच्छता करण्यात आली यात सेव्हिंग ड्रिम्ज फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य लाभले, नेहरूनगर झोन अंतर्गत छोटा ताजबाग येथे स्वच्छता करण्यात आली यात किंग कोब्रा ऑर्गनॉयजेशन या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य मिळाले. गांधीबाग झोन अंतर्गत राका चौक ते बडकस चौक येथे स्वच्छता करण्यात आली. यात वार्ड समस्या निवारण समिती या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य मिळाले. सतरंजीपुरा झोन अंतर्गत म्हाडा कॉलनी येथे स्वच्छता करण्यात आली यात जनसेवा स्वयंसेवा महिला बचत गट या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य मिळाले. लकडगंज झोन अंतर्गत अनिल बार समोर शास्त्री नगर चौक, भंडारा रोड येथे स्वच्छता करण्यात आली यात तेजस्विनी मंच या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य लाभले, आशीनगर झोन अंतर्गत टिपू सुलतान चौक येथे स्वच्छता करण्यात आली यात फिल गुड फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य मिळाले. तर मंगळवारी झोन अंतर्गत जरीपटका जिंजर मॉल चौक येथे स्वच्छता करण्यात आली यात वेद फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य लाभले.

रस्त्यावरील पालापाचोळा, झाडाच्या फांद्या आदी उचलून कचरा गाडीत टाकण्यात आले. तसेच स्वच्छ करण्यात आलेला परिसर पुन्हा अस्वच्छ होवू नये, लोक तिथे पुन्हा कचरा टाकू नये म्हणून त्या ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख तथा उपायुक्त डॉ. गजेंद्र महल्ले यांच्यासह संबंधित झोनचे सहायक आयुक्त सर्वश्री मिलिंद मेश्राम, प्रकाश वराडे, नरेंद्र बावनकर,हरीश राउत, घनशाम पंधरे, गणेश राठोड, विकास रायबोले अशोक घरोटे, प्रमोद वानखेडे, विजय थूल यांच्यासह स्वच्छता ब्रँड अँबेसिडर कौस्तुभ चॅटर्जी, किरण मुंदडा, अरविंद रतुडी यांच्या मार्फत जनजागृती करण्यात आली.

यावेळी मनपाचे कार्यकारी अभियंता रवींद्र बुंडादे, विजय गुरुबक्षांनी, विभागीय अधिकारी डॉ. राजीव राजुरकर, सर्व स्वच्छता निरीक्षक रविकांत डेलिकर, अर्जुन दखा, इशांत हथिबेड लंगोटे अजय मलिक,विनय पाटिल, मनोज खरे, लखनजी अंकित पाल, विद्यार्थी या सर्वांनी स्वच्छतेसाठी श्रमदानात सक्रियपणे सहभाग नोंदविला.

# इग्नू प्रादेशिक केंद्राने पटकावला वैखरी करंडक



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

निकालस महिला महाविद्यालय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, 'आधार' आणि 'वनराई' यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचा 'वैखरी 2024' करंडक इग्नू-प्रादेशिक केंद्र, नागपूरच्या आशुतोष तिवारी आणि रितेश कुमार यांनी पटकावला. इंडियाज डेव्हलपमेंट इज मुव्हिंग इन द राईट डायरे?शन या विषयावर ही वादविवाद स्पर्धा घेण्यात आली होती.

निकालस महिला महाविद्यालय, खामला नागपूर येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन सोमलवार अकादमी एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष रामदास सोमलवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोसायटीचे सहसचिव डॉ. डी. आर. पांडे, सदस्य महेश सोमलवार, आधार संस्थेचे अध्यक्ष डॉ. अविनाश रोडे, आधारचे हेमंत काळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. पाहुण्यांचे स्वागत निकालस महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सीमा सोमलवार यांनी केले. समन्वयक स्वाती रामटेके यांनी सूत्रसंचालन केले. वादविवाद स्पर्धेचे परीक्षण अस्मिता आठवले व डॉ. अंजली अनसिंगकर यांनी केले. या स्पर्धेत विदभार्तील 15 महाविद्यालयांच्या संघांनी भाग घेतला. सूत्रसंचालन रवी दत्ता यांनी केले.

समारोपीय समारंभात वनराईचे सचिव नीलेश खांडेकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तर शुभदा फडणवीस यांनी विजेत्यांची घोषणा केली. वैखरी येथील समन्वयक डॉ. श्रद्धा पाटील यांनी या कार्यक्रमाचे संचालन केले. या कार्यक्रमाच्या समन्वयक अस्मिता दुरगकर होत्या.

**वैखरीचे विजेते व विजेता संघ :**

इग्नू-प्रादेशिक केंद्राचे आशुतोष तिवारी आणि रितेश कुमार प्रथम उपविजेता संघ : सिंधू महाविद्यालयाचे तुषार बनकर आणि सतीश शुक्ला द्वितीय उपविजेता संघ : जी.एस. कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्सचे लवेश राऊळकर आणि प्रथमेश लांजेवार सर्वोत्कृष्ट वक्तेः जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे., नागपूर ओम ढोके विरुद्ध- हिस्लॉप कॉलेज, नागपूरची मेहेंदी खातून शेख उत्तेजनार्थ पुरस्कारः डॉ.बाबासाहेब आंबेडकर संस्था, नागपूरचे रुद्राणी परसोडकर

## गुंतवणुकीच्या नावावर ३६.२० लाखांचा गंडा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

गुंतवणुकीवर भरघोष नफ्याचे आमिष दाखवून दाम्पत्याने एका व्यक्तीला 36 लाख 20 हजार रुपयांचा गंडा घातला. या प्रकरणी मानकापूर पोलिसांनी पीडित विनोदसिंग ठाकूर (35) रा. अनंतनगर, काटोल रोडच्या तक्रारीवरून आरोपी दाम्पत्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदविला आहे. तुषार शरद बोंदरे आणि नलिनी तुषार बोंदरे रा. मनीषनगर, असे आरोपी दाम्पत्याचे नाव आहे.

नलिनी आणि तुषार यांची लिब्रल सिस्टम प्रा. लि. नावाने कंपनी आहे. कंपनीकडून एलईडीचे उत्पादन, इंस्टॉलेशन आणि ग्राहकांना सेवा दिली जाते. मे 2022 मध्ये आशिष पांडे नावाच्या मित्राच्या माध्यमातून विनोदची आरोपी बोंदरे दाम्पत्याशी ओळख झाली. त्यावेळी व्यवसाय सुरळीत चालत नसल्याने विनोद दुसरे काहीतरी करण्याच्या तयारीत होता. तुषार आणि नलिनीने त्याला त्यांच्या व्यवसायात पैसे गुंतवून दरमाह ९ टक्के लाभ कमावण्याचे आमिष दाखविले. विनोदने सुरुवातीला 8 लाख रुपये त्यांच्या व्यवसायात गुंतविले. दोन महिन्यातच आरोपी दाम्पत्याने नफ्यासह रक्कम परत केली.

त्यामुळे विनोदचा विश्वास वाढला. याचा फायदा घेत बोंदरे दाम्पत्याने विनोदला अधिक पैसे गुंतवून अधिक नफा कमावण्याचे आणि कंपनीत भागीदारी देण्याचे आमिष दाखविले. विनोद आरोपींच्या जाळ्यात अडकला. आरोपींनी सांगितल्यानुसार, विनोदने स्वतःची बचत केलेली रक्कम आणि वडिलांची सेवानिवृत्तीची संपूर्ण रक्कम असे 70 लाख रुपये गुंतविले. आरोपींनी त्याला 2023 च्या शेवटपर्यंत 33.90 लाख रुपये परत केले. मात्र जानेवारी 2024 नंतर पैसे देणे बंद केले. विनोदने याबाबत विचारपूस केली असता आरोपी टाळाटाळ करीत होते.

## बोगस कागदपत्रांद्वारे भूखंडाची विक्री

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

बोगस कागदपत्र तयार करून भूखंडाची विक्री करणाऱ्या 9 जणांविरुद्ध सदर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदविला आहे. आरोपींमध्ये रमेश वंजारी (48) रा. शताब्दी चौक, दिनेश ठाकूर (45) रा. निळकंठनगर, आरिफ खान (50) रा. ताजनगर, मनीष गवई (45) रा. मानेवाडा, राजा ठाकूर (50) रा. मानकापूर, मीराबाई बागडे (60) द्वारका सुनील साखरे (58) दोन्ही रा. इंदोरा, संगीता खोब्रागडे रा. बेझनबाग आणि मेश्राम नावाच्या व्यक्तीचा समावेश आहे. याच वर्षी जानेवारी महिन्यात आरोपींनी शाहू यांना मौजा दाभा येथील 20.55 वर्ग मीटरचा भूखंड दाखवला. 16 लाख रुपयांत या भूखंडाचा सौदा झाला.

आरोपींनी सिव्हील लाईन्स येथील दुय्यम निबंधक कार्यालयात विक्रीपत्र करून देत पैसे घेतले. नंतर शाहू यांना समजले की, आरोपींनी जो प्लॉट दाखवून सौदा केला होता तो दुसऱ्याचा आहे. आरोपींनी बनावट कागदपत्र बनवून त्यांना तो प्लॉट विकला. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. पोलिसांनी तपासानंतर आरोपींवर विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

## सीमेंट मिक्सरमुळे मजुराचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

सीमेंट मिक्सरखाली पाय दबल्याने गंभीर जखमी होऊन मजुराचा मृत्यू झाला. ही घटना एमआयडीसी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. शाहिद गेंदलाल परस्ते (23) असे मृताचे नाव आहे. शाहिद हा नीलडोह परिसरातील गोल्डकिट इंफ्रा कंपनीत काम करीत होता आणि तेथेच रहात होता.

शुक्रवारी सकाळी सीमेंट मिक्सर मशीनची साफ-सफाई करताना तो मिक्सर खाली दबला. यात गंभीर जखमी झाल्याने त्याला उपचारार्थ जवळच्या रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

## बेलतरोडी ठाण्यांतर्गत चोरांचा सुळसुळाट

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

बेलतरोडी ठाण्यांतर्गत चोरांनी दहशत पसरवून ठेवली आहे. दररोजच चोरी, घरफोडीच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शुक्रवारी चोरांनी प्रभूनगर परिसरात दोन घरांचे कुलूप तोडून रोकड आणि दागिन्यांवर हातसाफ केला. या प्रकरणी पोलिसांनी संतोष बृजलाल साकल्ले (59) रा. सुप्रतिक अपार्टमेंटच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. संतोष आणि त्यांची पत्नी दीप्ती शिक्षक आहेत. शुक्रवारी सकाळी दोघेही घराला कुलूप लावून शाळेत गेले होते. या दरम्यान चोरांनी दिवसाढवळ्याच त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपाटातील रोख 10 हजार रुपये आणि सोन्याचांदीचे दागिने असा एकूण 1.60 लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी करून पसार झाले. सायंकाळी 5 वाजताच्या सुमारास संतोष घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची तक्रार पोलिसात केली. घरफोडीची दुसरी घटना परिसरातच राहणाऱ्या मिलिंद शंकर घनोटे (62) यांच्याकडे घडली. मिलिंद महावितरण कंपनीतून सेवानिवृत्त आहेत. गुरूवारी रात्री 3 वाजताच्या सुमारास चेहरा कापडाने बांधून असलेले दोन चोर त्यांच्या घरात घुसले. मिलिंद पहिल्या माळ्यावर झोपलेले होते, तर त्यांची पत्नी खालच्या खोलीत झोपलेली होती. एका आरोपीने मिलिंदच्या खोलीचे दार बाहेरून बंद केले. त्यानंतर त्यांच्या पत्नीच्या खोलीत गेले. पत्नीची झोप उघडली असता आरोपींनी त्यांना धमकावले. 41 हजारांचे दागिने घेऊन पसार झाले.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MEGHNA PRAMOD ADHAOO.** NOW MY NEW NAME IS **MEGHNA PRAMODRAOJI ADHAU.**
**ADD** : WARD NO. 1 KALMESHWAR NAGPUR RURAL 441501

MY OLD NAME WAS **KHAN BILQUIS JAHAN.** NOW MY NEW NAME IS **BILQUIS TARIQUE AHMED KHAN.**
**ADD** : PLOT NO. 36 UMAR FARUQUE SCHOOL MARG DUDHE LAYOUT PUSAD.

MY OLD NAME WAS **MOIN AHMAD FASIHUDDIN SHAIKH.** NOW MY NEW NAME IS **MOIN FASIHUDDIN SHAIKH.**
**ADD** : FLAT NO.203, QUDRAT APPARTMENT, BESIDE AXIS BANK ATM, MANSHA CHOWK, JAFAR NAGAR, NAGPUR 440013

MY OLD NAME WAS **SHEHNAZ BEGUM IQBAL USMAN.** NOW MY NEW NAME IS **SHEHNAZ IQBAL USMAN.**
**ADD** : FLAT NO.101, P.NO.47, PRESTIGE ELIGHT, NEAR BALAJI CABLE, RATHOR LAYOUT, ANANT NAGAR, NAGPUR 440013.

MY OLD NAME WAS **MUDASSIR HUSHAIN.** NOW MY NEW NAME IS **MUDASSIR HUSAIN SHAH MOHAMMAD MALIK.**
**ADD** : NEAR TAJ SPORTING CLUB, TAJ NAGAR TEKA, PANCHASHEEL ROAD, NAGPUR 440017.

MY OLD NAME WAS **MOHAMMAD FIROZ.** NOW MY NEW NAME IS **FIROZ DIWAN.**
**ADD** : PLOT NO. 10, BUS STOP BADA TAJBAG UMRED ROAD, NAGPUR 440024.

MY OLD NAME WAS **MUZAMMIL AHMED SIDDIQUI.** NOW MY NEW NAME IS **MUZAMMIL AHMAD SIDDIQUI.**
**ADD** : S/O MUSHTQUE AHMAD, CHOUDHARI MASJID DOMAJI KIRANA KE PAASBHAJI MANDI VTC. KAMPTEE DIST. NAGPUR 441002.


## आज महाराष्ट्र विधानसभा २०२४ विजय संकल्प संमेलन

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चा, महाराष्ट्र प्रदेश च्या वतीने प्रदेशाध्यक्ष श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनात सोमवारी ३० सप्टेंबर २०२४ रोजी 'महाराष्ट्र विधानसभा - २०२४ विजय संकल्प संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. मुंबईतील दादर मधील वसंत स्मृती येथे सकाळी १० वाजता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होईल.

देवेंद्र फडणवीस यांच्या उद्घाटकीय भाषणानंतर संमेलनात प्रामुख्याने केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव व किरण रिजुजू, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश व व्ही. सतीश जी हे मार्गदर्शन करतील, अशी माहिती भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी दिली.

'महाराष्ट्र विधानसभा - २०२४ विजय संकल्प संमेलन' मध्ये नागपुरातून देखील अनेक पदाधिकारी सहभागी होणार आहेत. नागपूरमधून मोर्चा चे राष्ट्रीय उपाध्यक्ष अशोक मेंढे, सुभाष पारधी, संदीप जाधव, संदीप गवई, अनुसूचित जाती मोर्चा शहराध्यक्ष सतीश शिरस्वान, ॲड. राहूल झांबरे, शंकर मेश्राम, महेंद्र प्रधान यांच्यासह प्रदेश मोर्चा पदाधिकारी, विधानसभा समन्वयक, सहसमन्वयक सहभागी होणार आहेत.

'महाराष्ट्र विधानसभा - २०२४ विजय संकल्प संमेलन' मध्ये मोठ्या संख्येत राज्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी केले आहे.

## ३० पासून बसपाची संविधान जागरण रॅली

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने भारतीय संविधानावर व आरक्षणावर देशभर उलट सुलट चर्चा होत आहेत अशा वेळी बहुजन समाजाला खऱ्या अर्थाने संविधान व आरक्षण मागील भूमिका तसेच शत्रुपक्ष व मित्रपक्ष समजून सांगण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश बसपाच्या वतीने 30 सप्टेंबर ते 9 ऑक्टोंबर पर्यंत "दीक्षाभूमी ते चैत्यभूमी" राज्यस्तरीय संविधान जागरण रॅलीचे आयोजन करण्यात आलेले आहे. अशा प्रकारची माहिती बसपाचे नागपूर जिल्हाध्यक्ष योगेश लांजेवार यांनी टिळक पत्रकार भवनातील पत्र परिषदेत दिली.




संविधान रॅली सोमवार दिनांक 30 सप्टेंबर रोजी सकाळी 9.30 वाजता नागपूरच्या दीक्षाभूमी ला अभिवादन करून राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात जनजागृती करत करत कांशीरामजी यांच्या स्मृती दिनी 9 आक्टोंबर ला मुंबई च्या चैत्यभूमीवर पोहोचून बाबासाहेबांच्या चैत्याला अभिवादन केल्यावर धारावी परिसरात या रॅलीचा समारोप होईल. या रॅलीचे नेतृत्व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ॲड सुनील डोंगरे करणार असून मुख्य मार्गदर्शक बसपाचे केंद्रीय नेते व महाराष्ट्राचे मुख्य प्रभारी माजी खासदार डॉक्टर अशोक सिद्धार्थ हे आहेत. दीक्षाभूमीवरून या रॅलीची सुरुवात झाल्यावर लोकमत चौक, पंचशील चौक, सविधान चौक, कडबी चौक, इंदोरा चौक, आवळेबाबू चौक, टेकानाका, कपिल नगर, कळमना, पारडी चौक, भंडारा रोड मार्गे भंडाऱ्याकडे रवाना होईल. या रॅली पन्नासावर चार चाकी व शेकडो दुचाकी सहभागी होतील अशा प्रकारची माहिती पत्र परिषदेत देण्यात आली. पत्र परीषदेला प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, जिल्हा प्रभारी रंजनाताई ढोरे, महिला आघाडी प्रमुख सुनंदाताई नितनवरे, जिल्हा महासचिव चंद्रशेखर कांबळे, जिल्हा सचिव अभिलेश वाहाने आदि प्रामुख्याने उपस्थित होते.


**Citation Notice**

Process No.: 281/24
Date: 26/09/24

IN THE COURT OF CJJD & JMFC PARSEONI, DIST. NAGPUR (M.s.)

Civil M.A. No. 5/2024 Fixed For: 23/10/2024

**Applicants:-** Smt. Rukhabai Wd/o Manikrao Kadu, Aged about 90 Years, Occu-Household, **R/o Bakhari, Post: Nayakund, Tahsil Parseoni, District Nagpur.**

**VERSUS**

**NON-APPLICANT: - NIL**

**Name of Deceased: Late Shri. Manikrao S/o Marotrao Kadu, R/o Bakhari, Post: Nayakund, Tahsil Parseoni, District Nagpur who died on 03/09/2005**

Whereas **Late Shri. Manikrao S/o Marotrao Kadu, R/o Bakhari, Post: Nayakund, Tahsil Parseoni, District Nagpur who died on 03/09/2005** and whereas **Smt. Rukhabai Wd/o Manikrao Kadu** has presented an application to this court for grant of **LEGAL HEIRS CERTIFICATE UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT (8) 1827.**

This is to give notice to all persons who may dispute the right of the said Applicant **Smt. Rukhabai Wd/o Manikrao Kadu,** as Legal Heir of the deceased to appear in the court of CJJD & **JMFC PARSEONI on 23rd day of Octomber 2024 at 10.30 a.m.** There to enter their objections and is here by declared that if no suffcient objections are offered on or before the date mentioned above, the court will forth with porceed to receive proof of the said Applicants right and to grant them, provide they shall appear entitled there to a certificate of Legal Heirs of the said deceased. Given under my hand and the seal of the court this day of 26th day of September 2024

**By the order of the Court**
**Asstt. Supdt.**
**Court of CJJD & JMFC, Parseoni**

**Citation Notice**

Process No.: 280/24
Date: 26/09/24

IN THE COURT OF CJJD & JMFC PARSEONI, DIST. NAGPUR (M.s.)

Civil M.A. No. 4/2024 Fixed For: 23/10/2024

**Applicants:-** Smt. Vimal W/o Bhaurao Thakre, Aged about 61 Years, Occu-Household, R/o Kandari, Tahsil Parseoni, Distirct Nagpur. 2. Smt. Narmada W/o Namdev Gher, Aged about 56 Years, Occu-Household, R/o Ward No.1, Karambhad, Tahsil Parseoni, District Nagpur. 3.Shri. Krushna S/o Bapurao @ Baburao Kadu, Aged about 51 Years, Occu-Labour. 4. Shri Bhagwan S/o Bapurao Kadu, Aged about 49 Years, Occu-Labour.5. Shri Bhaskar S/o Bapurao Kadu, Aged about 47 Years, Occu-Labour All R/o **Bakhari, Post: Nayakund, Tahsil Parseoni, District Nagpur**

**VERSUS**

**NON-APPLICANT: - NIL**

**Name of Deceased: Late Shri. Bapurao S/o Marotrao Kadu, R/o Bakhari, Post: Nayakund, Tahsil Parseoni, District Nagpur who died on 01/07/2014**

Whereas **Late Shri. Bapurao S/o Marotrao Kadu, R/o Bakhari, Post: Nayakund, Tahsil Parseoni, District Nagpur who died on 01/07/2014** and whereas 1.Vimal W/o Bhaurao Thakre, 2.Smt. Narmada W/o Namdev Gher, 3.Shri. Krushna S/o Bapurao @ Baburao Kadu, 4.Shri Bhagwan S/o Bapurao Kadu, 5. Shri Bhaskar S/o Bapurao Kadu has presented an application to this court for grant of **LEGAL HEIRS CERTIFICATE UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT (8) 1827.**

This is to give notice to all persons who may dispute the right of the said Applicant 1.Vimal W/o Bhaurao Thakre, 2.Smt. Narmada W/o Namdev Gher, 3.Shri. Krushna S/o Bapurao @ Baburao Kadu, 4.Shri Bhagwan S/o Bapurao Kadu, 5. Shri Bhaskar S/o Bapurao Kadu, as Legal Heir of the deceased to appear in the court of CJJD & **JMFC PARSEONI on 23rd day of Octomber 2024 at 10.30 a.m.** There to enter their objections and is here by declared that if no suffcient objections are offered on or before the date mentioned above, the court will forth with porceed to receive proof of the said Applicants right and to grant them, provide they shall appear entitled there to a certificate of Legal Heirs of the said deceased. Given under my hand and the seal of the court this day of 26th day of September 2024

**By the order of the Court**
**Asstt. Supdt.**
**Court of CJJD & JMFC, Parseoni**


## संस्कृत बाल नाट्य स्पर्धेत भवंस श्रीकृष्ण नगर प्रथम तर सरस्वती द्वितीय

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :




कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्व विद्यालय, (विस्तार सेवा मंडल ) रामटेक आणि बालरंगभूमी परिषद नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संस्कृत बाल नाट्याची अंतिम फेरी मोठ्या अटीतटीच्या स्पर्धेत पार पडली.

यात नागपूर आणि विदभार्तील बाल नाटकांचा समावेश होता, त्यात प्रथम क्रमांक भवन्स बी.पी. विद्या मंदिर, श्रीकृष्णनगर, नागपुर शाळेने सादर केलेल्या मनसुखायनम् बाल नाटकास तर द्वितीय क्रमांक सरस्वती-विद्यालय, शंकरनगर, नागपुर शाळेने सादर केलेल्या श्रीहर्षः बाल नाटकास मिळाला तृतीय क्रमांकसंस्कृत-प्रचारिणी-सभा, नागपुरे शाळेच्या मनोहरा वसुन्धरा नाटकास तर उत्तेजनार्थ स्कूल ऑफ स्कॉलर्स, अमरावती, भवन्स बी.पी.विद्या मंदिर, आष्टी, नागपुरे गौरवः, या दोन नाटकास मिळाला इतर पारितोषिक पुढील प्रमाणे, दिग्दर्शन :प्रथम श्रीमती कल्याणी देशपांडे -मनसुखायनम, द्वितीयसौ आसावरी मास्टे - श्रीहर्षः, तृतीय- कु. आसावरी डांगे झ मनोहरावसुन्धरा लेखन :- प्रथम झडॉ. लीना रस्तोगी, द्वितीय - श्रीमती दुर्गा पारखी, तृतीय - रोहिणी नांदे प्रकाश योजना :- प्रथम पूर्णब्रह्मः, द्वितीय वेदांत मांडवगणे - मनसुखायनम्, तृतीय पार्थ धोटे - श्रीहर्षः संगीतः- प्रथम मनसुखायनम्- प्रवेश मेश्राम , द्वितीय 'यज्ञकुंड' - नंदकिशोर डम्बाले, तृतीय गौरवः प्रथमेश आष्टणकर नेपथ्य :- प्रथमपूर्णब्रह्मः, कुणाल राजानेकर, द्वितीय भस्मात उत्थितः मयूरः - शरद मेश्राम , तृतीय - मनोहरा वसुन्धरा - मनीष चौधरी रंगभूषाः- प्रथम -मनोहरावसुन्धरा - प्रीती हिंगणकर, द्वितीय श्रीहर्षः - अनघा पेंडके, तृतीय मनसुखायनम - विशाखा जोशी वेषभूषाः- प्रथम विश्वासः - वृषाली पुरोहित, द्वितीय देहि लक्षं ततो मे - अर्चना मेश्राम, तृतीयमनसुखायनम - विशाखा जोशी अभिनय मुलं :- प्रथम - कैवल्य देशमुख, द्वितीय- सच्चित दीवान, तृतीय-मानव श्रीरामे अभिनयमुली :- प्रथम - अनाहिता कपूर, द्वितीय- गार्गी गोंध्लेकर, तृतीय-वल्लरी रेलकर अंतिम स्पर्धेत सहभागी झालेल्या नाटकांच्या १८ शाळांना खासदार सांस्कृतिक महोत्सव आयोजन समिती तर्फे स्मृती चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.


ते या स्पर्धेचे सहप्रायोजक आहेत हे विशेष. सर्व विजयी चमुंना आणि बाल कलाकारांना कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलसचिव आचार्य कृष्णकुमार पांडे, महाराष्ट्र टाइम्सचे निवासी संपादक श्रीपाद अपराजित, बाल रंगभूमी परिषद अध्यक्षा आभा मेघे, लीना रस्तोगी, जहागीरदार बंधू यांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. अंतिम स्पर्धेचें परीक्षण डॉ विभा क्षीरसागर, रमेश लखमापूरे, डॉ पराग जोशी यांनी केले, स्पर्धेचा निकाल डॉ विभा क्षीरसागर, डॉ पराग जोशी यांनी घोषित केला, कार्यक्रमाचे संचालन आणि आभार अनिल देव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रहाटे, अनिल देव, प्रशांत मंगदे विलास कुबडे, रोशन नंदवंशी, योगेश राऊत, नितीन पात्रीकर यांनी परिश्रम घेतले.

# एकत्रित निवडणुकीचे शिवधनुष्य...

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या समितीने १४ मार्च २०२४ रोजी एक देश, एक निवडणुकीच्या संदर्भात तयार केलेला १८ हजार ६२६ पानांचा अहवाल सादर केला आणि केंद्रीय मंत्रिमंडळाने तो स्वीकारला. सन २०२९ मध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेता येणे शक्य आहे का, या मुद्द्यावर देशात चर्चा सुरू झाली. वन नेशन वन इलेक्शन याचा उल्लेख भाजपाच्या २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणूक जाहीरनाम्यात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाले आणि त्यांनी भाजपा व संघ परिवाराचा अजेंडा काटेकोरपणे राबवायला सुरुवात केली. केंद्रात सत्ता असेल, तर पक्षाचा अजेंडा राबविणे शक्य होते हेच मोदी सरकारने देशाला दाखवून दिले. मोदी यांनी अयोध्येत भव्य राम मंदिर उभारून दाखवले. गेली सात दशके जम्मू-काश्मीरला घटनात्मक संरक्षक कवच देणारे ३७० वे कलम कायमचे रद्द केले, एक देश, एक कर या सूत्राने देशभर जीएसटी लागू केला, तलाक पद्धत कायद्याने रद्द करून लाखो मुस्लीम महिलांना दिलासा दिला. जे सांगितले ते त्यांनी करून दाखवले.

एक देश, एक निवडणूक आणि समान नागरी कायदा हा महत्त्वाचा अजेंडा अमलात आणण्यासाठीच मोदी सरकार कटिबद्ध आहे. सन २०२९ पासून देशात पहिल्या टप्प्यात लोकसभा व राज्यांच्या विधानसभा निवडणुका घ्याव्यात व नंतर १०० दिवसांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात याव्यात, अशी शिफारस रामनाथ कोविंद समितीने केली आहे. कोविंद समितीचा अहवाल संसदेच्या हिवाळी अधिवेशनात मांडला जाईल व त्यावर सविस्तर चर्चा होणे अपेक्षित आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर १९५१-५२ ते १९६७ या काळात लोकसभा व विधानसभांच्या एकत्रित निवडणुका होत होत्या. नंतर विविध कारणांमुळे हे वेळापत्रक विस्कटले. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या अहवालानुसार २०२४ च्या निवडणुकीत देशात १२ लाख मतदान केंद्रे होती, २०२९ ला एकत्रित निवडणुकीसाठी ही संख्या १३ लाख ५७ हजार असेल. एकाच वेळी लोकसभा व विधानसभा निवडणुका घेण्याचे ठरले, तर ईव्हीएमचे २६ लाख ५५ हजार युनिट्स लागतील तसेच १७ लाख ७८ हजार कंट्रोल युनिट्स व १७ लाख ७९ हजार व्हीव्हीपॅट्स लागतील. एकत्रित निवडणुकीसाठी ७९५१ कोटी रुपये अतिरिक्त खर्च येईल. तसेच ईव्हीएम युनिट्स ठेवण्यासाठी गोदामे व बंदिस्त जागा मोठी लागेल. त्यासाठी शाळा-कॉलेजच्या जागा घ्याव्या लागतील. यावर्षी २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीसाठी ७० लाख कर्मचारी लागले होते, दर पाच वर्षांनी १५ टक्के कर्मचारी जास्त लागतात. सध्या जम्मू-काश्मीर व हरियाणात निवडणुकीचा कार्यक्रम राबवला जातो आहे. नोव्हेंबर महिन्यात महाराष्ट्र व झारखंड या दोन राज्यांच्या निवडणुका आहेत, या चारही राज्यांवर २०२९ मध्ये होणाऱ्या एकत्रित निवडणुकीचा काहीही परिणाम होणार नाही. एक देश, एक निवडणूक यासाठी घटनेच्या कलम ८३ व १७२ मध्ये दुरुस्ती करावी लागेल. लोकसभेत भाजपाकडे २४० खासदार आहेत. भाजपाकडे लोकसभेत स्वतःकडे बहुमत नाही. म्हणूनच मित्रपक्षांची मदत घेऊन हे मिशन पार पाडावे लागणार आहे. एनडीएकडे जनता दल यु व तेलुगू देशमसह लोकसभेत खासदारांची संख्या २९३ आहे. घटना दुरुस्तीसाठी राज्यांच्या समर्थनाची गरज पडणार नाही, असेही सांगण्यात येत आहे. इंदिरा गांधी पंतप्रधान असतानाच एक देश, एक निवडणूक हा मुद्दा पुढे आला होता. तेव्हा इंदिराजींनी त्यात फारसा रस दाखवला नव्हता. १९९९ मध्ये विधी आयोगाने एकत्रित निवडणुकीची शिफारस केली. तेव्हा वाजपेयी सरकारने फार रस दाखवला नव्हता. २०१४ मध्ये भाजपाने निवडणूक जाहीरनाम्यातच एक देश, एक निवडणूक हा विषय समावेश केला. २०१५ मध्ये विधी आयोगाने या विषयावर विस्तृत अहवाल सादर केला. २०१९ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या मुद्द्यावर सर्वपक्षीय बैठक बोलावून चर्चा केली. १ सप्टेंबर २०२३ रोजी सरकारने माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. या वर्षी स्वातंत्र्य दिनाला पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लाल किल्ल्यावरून भाषण करताना एक देश, एक निवडणूक या मुद्द्याचा पुनरुच्चार केला. त्यानंतर या विषयाला गती लाभली. मोदी सरकारला व भाजपाला एकत्रित निवडणुकीविषयी एवढी कळकळ व तळमळ आहे मग महाराष्ट्र, झारखंड, जम्मू-काश्मीरसह हरियाणामध्ये एकाच वेळी विधानसभा निवडणुका होणे अपेक्षित असताना का नाही घेतल्या? पाच वर्षांपूर्वीही सणवार होतेच, मग याच वर्षी गणपती, दसरा, दिवाळी अशी कारणे सांगून महाराष्ट्राच्या निवडणुका हरियाणा व जम्मू-काश्मीरबरोबर का घेतल्या नाहीत? जर चार राज्यांच्या निवडणुका एकाच वेळी घेणे सरकारला व निवडणूक आयोगाला शक्य होत नाही मग लोकसभेबरोबर देशातील अडीच डझन राज्यातील विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेणे हे जमू शकेल का? देशात सतत कुठल्या ना कुठल्या निवडणुका होतच असतात. सतत निवडणूक खर्च, काळ्या पैशांचा वारेमाप वापर, सतत कुठली ना कुठली आचारसंहिता यात प्रशासन वेढलेले असते. मग विकासकामांकडे दुर्लक्ष होते, विकासाची गती मंदावते. सारे राजकीय पक्ष निवडणुका कशा जिंकता येतील व सत्ता कशी काबीज करता येईल यातच गुंतून राहतात. म्हणून एकत्रित निवडणुका हा पर्याय उत्तम आहे. एकत्रित निवडणुकीसाठी निधी, मनुष्यबळ, साधनसामग्री, उपकरणे, सुरक्षा व्यवस्था, नियोजन सर्व काही प्रचंड व तेही एकाच वेळी लागेल. एकत्रित निवडणुका घेणे म्हणजे शिवधनुष्य पेलवण्यासारखे आहे. ते सरकारला व निवडणूक आयोगाला पेलवेल का हा खरा प्रश्न आहे. एकत्रित निवडणुकांमुळे अनेक विधानसभांचा कार्यकाल संपण्यापूर्वीच त्या बरखास्त कराव्या लागतील हा मोठा धोका आहे. स्वातंत्र्यानंतर देशात झालेल्या पहिल्या निवडणुकीत १७ कोटी मतदार होते, आता मतदारांची संख्या १०० कोटींच्या वर गेली आहे. देशातील निवडणुकांचा सरकारी खर्च ५ हजार कोटींवर गेला आहे. निवडणुकीसाठी राजकीय पक्ष व त्यांच्या उमेदवारांचा खर्च ६० हजार कोटींपेक्षा जास्त असावा असा अंदाज आहे. आता केवळ पोस्टर्स, बॅनर्स, होर्डिंग दिसत नाहीत, तर रॅली, रोड शो, जाहीर सभा, नाका (नुक्कड) सभा, सोशल मीडिया, यूट्यूब, आदी साधने प्रचारात अधिक प्रभावीपणे राबवली जात आहेत.

महाराष्ट्रनामा



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com

देशातील विधानसभांचा कार्यकाल जून २०२९ पर्यंत संपवायचा असेल, तर मिझोराम, छत्तीसगड, मध्य प्रदेश, राजस्थान, तेलंगणा या राज्यांच्या विधानसभांना ६ महिने मुदत वाढ द्यावी लागेल. गुजरात, हिमाचल प्रदेश, मेघालय, नागालँड, त्रिपुरा, कर्नाटक या विधानसभांचा कार्यकाळ १ वर्षे १ महिना ते १ वर्षे ७ महिना इतकाच राहील. मणिपूर, पंजाब, उत्तर प्रदेश, गोवा, उत्तराखंड, यांचा कार्यकाळ २ वर्षे १ महिना तर २ वर्षे ३ महिने राहू शकेल. पुडुचेरी, पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, आसाम, बिहार, यांचा कालावधी ३ ते साडेतीन वर्षे राहील. हे सर्व प्रत्यक्षात साध्य होईल का? हे राजकीय व व्यावहारिक दृष्ट्या परवडणारे आहे का? भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशात केंद्र व राज्यांच्या एकत्रित निवडणुकीची गरज तरी आहे का? लोकशाही मजबूत करण्यासाठी एकत्रित निवडणूक हे महत्त्वाचे पाऊल आहे असे स्वतः पंतप्रधानांनी म्हटले आहे. निवडणुकीचा खेळखंडोबा होणार नाही, याची फार मोठी दक्षता घ्यावी लागणार आहे. सन २०२६ मध्ये पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम, केरळमध्ये निवडणुका होतील, त्या विधानसभांना तीनच वर्षे मिळतील. बिहारमध्ये नोव्हेंबर २०२५ मध्ये निवडणूक आहे, तेथे विधानसभा ४ वर्षे कार्यरत राहील. १९५२ मध्ये झालेल्या निवडणुकीसाठी केवळ १० कोटी ५० लाख रु. खर्च झाला होता, २००९ मध्ये १ हजार ११९५ कोटी, २०१४ मध्ये ३९०० कोटी आणि २०२४ मध्ये १ लाख ३५ हजार कोटी खर्च झाला. निवडणुकी पूर्वी जातीगणना मागणीला जोर चढलेला आहे, त्यातून सरकार कसा मार्ग काढणार? माजी राष्ट्रपतींनी सरकारच्या एका समितीचे अध्यक्षपद स्वीकारणे कितपत योग्य आहे, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. संसदेत एकूण ४७ राजकीय पक्ष आहेत, पैकी ३२ पक्षांनी एकत्रित निवडणुकीचे समर्थन केले आहे. पंधरा पक्षांनी विरोध केलाय. कॉंग्रेस, आप, बसप, सीपीआय, सीपीआयएम, सपा, तृणमूल कॉंग्रेस, द्रमुक, एआयएमआयएम, एमडीएमके, आदी पक्षांनी एकत्रित निवडणूक प्रस्तावाला विरोध केला आहे. एकत्रित निवडणुकांचे समर्थन भाजपा, शिवसेना, लोकजनशक्ती, आसाम गण परिषद, जनता दल यु, बीजू जनता दल, अण्णाद्रमुक, झारखंड स्टुडंट्स असो, अपना दल सोनेवाल, नॅशनल डेमॉक्रॅटिक पीपल्स पार्टी नागालँड, सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा, मिझो नॅशनल फ्रंट, आदी एनडीएमधील मित्रपक्षांनी केले आहे. एकत्रित निवडणुका झाल्या तर संघराज्य पद्धतीवर प्रहार होईल व प्रादेशिक पक्षांचा संकोच होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. तसेच राज्यांच्या स्वायत्तेवर घाला घातला जाईल असेही विरोधी पक्षांनी म्हटले आहे. एकत्रित निवडणुका घेतल्याने मूलभूत हक्कांवर गदा येणार नाही, महासंघराज्य रचनेला तडा जाणार नाही, कायद्याचे कुठेही उल्लंघन होणार नाही, लोकशाही मूल्यांशी कुठेही तडजोड केली जाणार नाही, असे भाजपाने म्हटले आहे. एक देश, एक निवडणूक म्हणजे [illegible] पाऊल आहे. संसदेत सविस्तर चर्चा करून सर्व सहमतीने निर्णय घेणे म्हणजे शिवधनुष्य उचलण्यासारखे आहे.

# बेरोजगारीचे भीषण वास्तव

भारत हा तरुणांचा देश आहे. जगातील सर्वाधिक तरुण भारतात आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४० टक्के लोकसंख्या ही तरुणांची आहे. आज आपण याच तरुणांच्या जोरावर महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. तरुणांच्या या ऊर्जेचा योग्य वापर झाल्यास भारताला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही असा ठाम विश्वास डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांना होता. डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांच्यासारख्या द्रष्ट्या व्यक्तीने जे ओळखले ते आजच्या राज्यकर्त्यांना मात्र ओळखता आले नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल कारण आजच्या तरुणांच्या ऊर्जेचा, त्यांच्या गुणवत्तेचा उपयोग सरकारला करून घेता येता नाही किंवा सरकार जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करत आहे याचा पुरावाच स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२३ च्या अहवालातून पाहायला मिळतो. या अहवालातून देशातील बेरोजगारीच्या समस्येचे भीषण वास्तव समोर आणले आहे. या अहवालानुसार देशात तरुण पदवीधर बेरोजगाराईचा दर ४२.३ टक्क्यांच्या उच्च स्तरावर आहे, तर कमी शिकलेल्या लोकांच्या बेरोजगारीचा दर ८ टक्के आहे. २५ ते ३० वर्ष वयोगटातील पदवीधर किंवा उच्च पात्रता धारक तरुणांचा बेरोजगरीचा दर २२.८ आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील पात्रता असलेल्या आणि २५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील तरुणांमध्ये बेरोजगारीचा दर २१.४ टक्के इतका आहे. याचाच अर्थ कमी शिकलेल्या पासून पदवीधर असलेल्या तरुणांपर्यंत सर्वांनाच बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत आहे. ही आकडेवारी चिंताजनक आहे. देशातील ४० टक्क्यांहून अधिक तरुण जर बेरोजगार असतील तर त्या तरुणांच्या मानसिकता काय असेल याचा विचार न केलेलाच बरा. शिक्षण आहे, पदवी आहे, काम करण्याची उर्मी आहे, कुटुंबासाठी, देशासाठी काही तरी करुन दाखवण्याची इच्छा आहे मात्र नोकरी नाही अशी अवस्था तरुणांची आहे. नोकरी नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड नैराश्य आले आहे. आपण इतके शिकूनही आपल्या शिक्षणाचा उपयोग होत नाही त्यामुळे तरुण प्रचंड अस्वस्थ आहेत. शासन रोज नवे परिपत्रक काढून तरुणांचा रोजगार हिरावून घेत आहे. सध्या तर खाजगीकरणाचे पेव फुटले आहे त्यामुळे सरकारी नोकरी मिळवण्याचे तरुणांचे स्वप्न स्वप्नच राहणार आहे. वास्तविक गेल्या अनेक वर्षांपासून सरकारी नोकर भरती झालेली नाही. नोकर भरतीसाठी सरकार जाहिरात काढते. हजारो रुपये परीक्षा फी घेऊन तरुणांची परीक्षा घेते मात्र प्रत्यक्ष नोकरी काही देत नाही. कधी पेपर फुटीचे तर आणखी काही कारण देऊन भरती पुढे ढकलली जाते. शिक्षक भरती हे त्याचे उत्तम उदाहरण. आज सरकारच्या सर्वच खात्यात कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. एक लिपिक चार चार टेबल सांभाळीत आहे, एक शिक्षक चार चार वर्ग शिकवत आहे, गेली अनेक वर्षे पदोन्नती झालेली नाही जर सरकारने सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय रद्द करून भरती केली तर देशातील बेरोजगारी काही प्रमाणात का होईना कमी होईल मात्र सरकारला तरुणांच्या रोजगाराचे काहीही देणे घेणे नाही. नोकरी मागायला गेलेल्या तरुणांना राजकीय नेते पकोडे तळा म्हणत त्यांची कुचेष्टा करत आहेत. शिक्षण असून नोकरी नाही, शेती असून शेतात काही पिकत नाही. नोकरी नाही, शेतीही बेभरावशाची झाली आहे, स्वतःचा व्यवसाय करावा म्हटलं तर भांडवल नाही त्यामुळे आजचा तरुण प्रचंड अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेचा उद्रेक केंव्हाही होऊ शकतो. जर तरुणांच्या अस्वस्थतेचा उद्रेक झाला तर भल्या भल्यांना पळता भुई थोडी होईल म्हणूनच सरकारने तरुणांच्या हाती रोजगार द्यावा. त्यांच्यात असलेल्या ऊर्जेचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करून घ्यावा. देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने ठोस प्रयत्न करावेत.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# कटीबध्दतेचा विश्वासघात...

आपण भारतीय संविधानाचा विचार केला असता देशतील प्रत्येक व्यक्ती सुखी राहणे अत्यंत महत्वाचे आहे. त्याप्रमाणे सरकारला सुखी राहण्यासाठी काही गोष्टी आधुनिक तंत्रज्ञानाचा विचार केला असता सुखसोयी करणे अत्यंत आवष्यक वाटते तरच देश बळकटीकडे जावुन जागतिक महासत्तेच्या दिषेने आपण प्रस्थान करू शकतो पण देषातील जनतेचे प्रष्न / सेवानिवृत्त पेंशन धारक सुखी नसेल तर आपण राज्यकर्त्यांच्या हाती सत्ता असेल व त्याचा काहीही उपयोग जनतेसाठी होत नसेल तर आपण सर्वस्वी निरर्थक आहात असे म्हणणे स्वाभावित आहे याकरीता आपण सर्व राज्यकर्ते मग ते कोणत्याही पक्षाचा का असेना, त्यासाठी पेंशन धारकांना सुखी ठेवण्यासाठी आपल्याकडून वाढीव पेंशन करीता यथाषिघ्र अंमलबजावणी करणे महत्वाचे ठरते आहे. आपण नेहमी म्हणत असता की, आम्ही पेंषन देण्यासाठी नेहमी कटिबध्द असु परंतु यावर पेंषन धारकाचा विष्वास सातत्याने उडत आहे असे वेळोवेळी निर्दषनास येत आहे म्हणुन आपण कटीबध्द राहता यावे यासाठी वाढीव पेंषनचा प्रष्न आता लवकरच निकाली काढण्यासाठी योग्य अंमलबजावणी करण्यात यावी.

किंबहुना, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी होत नसेल, जास्त उशीर होत असेल तर भारतीय लोकशाही पंगु होते. ईपीएस ९५ पेंशन धारकांसाठी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल ४/११/२०२२ रोजी लागला. त्यांना पूर्ण वेतनावर निवृत्ती वेतन मिळावे या बाबत ईपीएफओ नवी दिल्ली कडून २९/१२/२०२२ ला परिपत्र तसेच अंमलबजावणीसाठी पत्रही निर्गमित केले. न्यायालयाचा निकालाची कारवाई लवकरच व्हावी असेही न्यायालयानी आदेशात नमूद केलेले आहे. पण, अजून वर्तमान केंद्र सरकारला जाग आलेली दिसत नाही. वर्तमानपावेतो अनेक मोर्चे, आंदोलने, निदर्शने, वार्तालाप, घेराव असे उपक्रम झालेत. १० ते १५ वेळा संबंधित मंत्र्यासोबत बैठका झाल्या. वर्तमानात आम्हाला रू. ७०० ते रू. २५०० इतके कमी निवृत्त पेंशन मिळते. या समवेत २८, २९ आणि ३१ ऑगस्ट २०२४ तसेच १३/९/२४ ला संबंधित मंत्र्यासोबत तातडीची बैठक झाली याषिवाय आतापर्यंत बैठकाच होत असुन ईपीएस ९५ पेंषन धारकाचा वाढीव पेंशन चा मामला केंद्रसरकारजवळ अजूनही प्रलंबित असल्याचे निर्दषनास येत आहे. याबाबतीत चैकषी केली असता असे समजले की या विषयामध्ये काही तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे निर्णयापर्यंत सरकार पोहचत नाही पण लोकप्रतिनिधीला किंवा नेत्यांना भरघोष पेंशन देतेवेळी आपणाला / सरकारला तांत्रिक बाबीबाबत अडचणी येत नाही काय? हा प्रष्न नाईलाजाने उपस्थित होतो. याला तरी काय म्हणावे. या सर्वांना पेंशनधारकांच्या विषयावर तोडगा काढण्याची इच्छा होत नाही काय?

केंद्र सरकारकडून लाखो रुपये खर्च करून दर ३ महिन्याला सीबीटी ची मिटींग होत असते आणि हा विषय बहुतेक मिटींगमध्ये चर्चेला येत असते पण, गेल्या १० वर्षापासुन वरील विषयावर तोडगा निघत नसेल तर त्या समितीचा काय उपयोग? यावर लवकरच तोडगा काढण्यासाठी सरकारने लवकरच पाउले उचलणे महत्वाचे आहे कारण येत्या महिन्यात आगामी २०२४ च्या चार राज्यांच्या निवडणुकीत या पेन्शनधारकांकडे एवढी मोठी ताकद आहे की त्यांना अनेक आमदारांना विजयी करण्यात मदत मिळू शकते. हे महत्त्वाचे लक्षात घेवुन आम्ही अपेक्षा करतो की तुम्ही EPS 95 पेन्शन वाढवण्यासंबंधी कारवाई कराल. तरच आपल्याला अपेक्षित यश पदरी पडेल हे मात्र खरे. एका दिवसात नोटबंदीचा फसवा प्रयोगांना निर्णय घेतो. मग सर्वोच्च न्यायालयाची अंमलबजावणी निर्णय मान्य करायला एवढा उशीर का? हा प्रश्न सामान्य लोकांना/पेंषनधारकाला भेडसावत आहे. भारत सरकार मधील सर्व राज्यकर्त्यांना/नेत्यांना या निमित्ताने सांगावेसे वाटते की, सामान्य लोकांचे पेंडिंग कामे त्वरेने करावे. एकीकडे आपण महासत्ता होण्याच्या गोष्टी करतो, तर दुसरीकडे संविधानाने दिलेले हक्क नाकारतो. यावर लक्ष केंद्रित करून अंमलबजावणी करिता सार्थ प्रयत्न, कारवाई व्हावी. सरकारने फुटकळ बाबीमध्येच गुंतून न राहता सकारात्मकतेने व्यापक दृष्टीकोन हे सामान्य लोकांसाठी योग्य निर्णय घेतल्यास आनंद निर्माण होईल आणि सामान्य लोक भविष्यात सुखी होईल.

वरील नमूद केलेल्या विषयांतर्गत, मी तुम्हाला कळवू इच्छितो की EPS 95 पेन्शन वाढण्याच्या मुद्द्यावर लोकसभा/राज्यसभेत अनेक वेळा तपशीलवार चर्चा झाली. याचा परिणाम म्हणून, EPS 95 च्या संदर्भात निवृत्ती वेतनासाठी सकारात्मक दृष्टीकोन पूर्णपणे महत्त्वाचा मानून, सर्वोच्च न्यायालयाने आदेश दि. ४/११/२०२२ अंतर्गत, अंमलबजावणी/अनुपालन अनिवार्य मानले गेले आहे. ज्यामध्ये हे महत्त्वाचे प्रश्न आणि उत्तरे दोन्ही सभागृहात महिलांनी (लोकसभा/राज्यसभा सदस्य) सविस्तरपणे मांडली आहेत. जेणेकरून ९५ पेन्शन धारकांना योग्य न्याय मिळू शकेल. हा माझा पूर्ण विश्वास आहे. या संदर्भात, EPS 95 प्रकरणाबाबत विविध १०-१५ समितीचे अनेक अहवाल सध्याच्या सरकारकडे उपलब्ध आहेत. हा सकारात्मक दृष्टीकोन लक्षात घेऊन ९५ पेन्शनमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो असे मला वाटते. त्यामुळे, ७५ ते ८० लाख EPS 95 पेन्शनधारकांच्या वतीने मी आपणाला/पक्षाला नम्र विनंती करतो की, EPS 95 पेन्शन धारकांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. कारण ईपीएस ९५ पेन्शन धारक सध्या संघर्षमय जीवन जगत आहेत. नुकतेच जंतर मंतर मैदान नवि दिल्ली येथे दि. ३१/७/२४ ते ४/८/२४ आणि ६/८/२४ ते ७/८/२४ पर्यंत काही समितीच्या माध्यमातुन धरणा आंदोलने/धनाकर्षन प्रदर्षन करण्यात आले होते या समितीच्या पेंशन धारकांना संबंधित मंत्र्याकडून आश्वासन मिळाले आणि ८० ते १०० लोकसभा सदस्याकडून वरील विषयाबाबत समर्थन प्राप्त झालेले आहे पण वर्तमान पर्यंत भारत सरकार कडून वाढीव पेंषनची घोषणा झालेली नाही म्हणुन आम्ही भविष्यात कोणाला मतदान करावे हा प्रष्न आमच्यासमोर आवासुन उभा आहे. वरील बाबीबाबत आगामी ४ राज्याच्या निवडणुक २०२४ च्या अगोदर योग्य वाढीव पेंषनची कारवाई करून लवकरात लवकर सकारात्मक निर्णयाकडे आमचे डोळे लागलेले असुन चातकासारखी सर्व ईपीएस ९५ पेंशन धारक वाट पाहत आहे.

या व्यतिरिक्त संयोग कितीही दिर्घकालीन असो त्याची परिणती एक दिवस वियोगात होणार असते. आपल्याकडून पेंषन धारकासाठी कर्तव्यपालनासाठी कोणतीही वेळ चुकीची नसते त्यामुळे आपले श्रेष्ठत्व शब्दापलीकडेच राहील. वर्तमान केंद्र सरकार पेन्शन धारकाच्या अतिव दुःखाचे कारण ठरू नका त्याकरीता आपल्याला सकारात्मतेचा पाझर फुटने महत्वाचे आहे. आपण हा विषय पुर्णत्वाला नेला नाही, तर सरकारचे अवगुण दिसल्याषिवाय राहणार नाही? विकासासाठी परिवर्तन अपरिहार्य असते त्याचा त्याग न करता स्वच्छ मनाने पेंषन धारकाचे कामे केल्यास आपल्या चांगल्या विचारांचा/कामाचा सर्वांगीण सार्थ सुर्योदय होणार आहे हे मात्र खरे. या समवेत आपल्या चांगल्या कार्याला श्रमाची निष्चित गोड फळे येतीलच असे मी ठाम मताने सांगतो अन्यथः निराष मनाने ईच्छा नसतांना भविष्यात आपण निष्चित रूपाने दुःख व्यक्त करीत पायउतार झाल्याषिवाय राहणार नाही असे म्हणणे रास्त ठरावे. पेंषन धारकाचा सकारात्मकतेने / समर्पित स्नेहभावनांचा योग्य विचार करून ताठ मानेने हे वाढीव पेंषनचे कार्य समाप्तीकडे नेल्यास आपला उदो उदो होईल अर्थातच परतीची वाट पुढे ढकलल्याषिवाय राहणार नाही यावर आपण/केंद्र सरकार गांभीर्याने विचार करावा आणि ईपीएस ९५ पेंषन धारकाला वेळीच दिलासा दयावा हिच कळकळीची विनंती करीत आहो. आपण कटीबध्दतेचा विचार करणे महत्वाचे आहे. अन्यथा आपल्याकडून कटीबध्दतेचा विष्वासच राहणार नाही.

**विजय सरस्वती सीताराम सोनारघरे**
**स्नेहविजय, २४, उदयनगर,**
**गल्ली नं. ४, नागपूर मो. नं. ९३२५७३३८३६**

# कला, संस्कृती आणि परंपरेचा आविष्कार !







■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८: मानवी जीवनातील विविध भावछटा, प्राणी जीवनातील वात्सल्य आणि निसर्गाच्या अनुभूतीची अभिव्यक्ती साकार करण्याचं सामर्थ्य इतरांच्या तुलनेत चित्रकारांमध्ये अधिक असतं. चित्रकार सभोवतालच्या समाजजीवनाशी एकरूप होतो आणि त्यातूनच त्याला कलाकृती निर्मितीची बिजं सापडतात. अशाच काही आत्मदर्शी जाणिवेने सर्जनशील निर्मिती करणाऱ्या २०० चित्रकारांचे समूह चित्रप्रदर्शन नागपूरात भरविण्यात आले आहे.



बसोली ग्रुप, बालजगत आणि शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर यांच्या सयुक्त विद्यमाने ह्यमिडनाईट ड्रीम फेस्टिवलह्न हे प्रदर्शन चित्रकला महाविद्यालयाच्या कला दालनात मांडण्यात आले आहे. या प्रदर्शनात पेंटिंग्स, दगडी शिल्प, धातु शिल्प, इंस्टॉलेशन, पोट्रेट आणि अर्कचित्र आहेत. चित्रकलेच्या क्षेत्रातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मानित केले गेलेले व्यावसायिक चित्रकार, शिल्पकार तसेच विविध चित्रकला महाविद्यालयातील अधिव्याख्याता, कला शिक्षक, सेवानिवृत शिक्षक, हौशी चित्रकार, मुक्त चित्रकार आणि बसोलीचे बालचित्रकार सहभागी झाले आहेत. हे प्रदर्शन रविवार २९ सप्टेंबर २०२४ पर्यंत सुरु राहणार असून; सायंकाळी ४ ते रात्री ८ पर्यंत खुले राहणार आहे

भारत हा देश विविध संस्कृती आणि परंपरेने नटलेला आहे. भारतीय संस्कृतीमध्ये अतीप्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत सण-उत्सव साजरे करण्याची परंपरा चालत आलेली आहे. प्रत्येक सण-उत्सवाच्या मागे धार्मिक महत्व आहे. सण-उत्सव सकारात्मक उर्जा घेऊन येतात. परंपरा आणि मुल्यांची जपणूक करण्यासाठी एक दिशा देतात. संदेश देतात. सणांचा निसर्गाशी देखील खूप जवळचा संबंध आहे.

सण-उत्सव काळामध्ये सर्वत्र रेलचेल असते. यादरम्यान कलावंतांना आपली कला सादर करण्यासाठी मोठी संधी असते. 'मिडनाईट ड्रीम फेस्टीवल'मध्ये सहभागी झालेल्या चित्रकारांनी सण-उत्सव काळातील नवचैतण्य, विविध रंगीबेरंगी क्षण, सार्वजनिक उपक्रम, मानवी भावभावना, जीवनजाणिवा, कुंचल्याच्या माध्यमातून चित्रबद्ध केल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्रासह अन्य प्रादेशिक भागातील संस्कृती, चालीरीती, सांस्कृतिक वारसा दर्शविणारी दृष्यचित्रे आहेत.

बसोलीची निळाई या संकल्पनेवर आधारित बाल अभिव्यक्तीचा सुवर्ण महोत्सव साजरा करत असतांना; तीन तीनच्या गटातील बालचित्रकारांनी एका व्यावसायिक कलाकारासोबत संयुक्तरित्या 'भारतीय सण' या संकल्पनेवर आधारित चित्र साकारली. त्या कलाकृती साकारतांना अधिकाधिक प्रतिमात निळा रंग मुख्य ठेवून त्यात काळ्या व पांढऱ्या रंगाच्या मिश्रणातून तयार होणाऱ्या रंगसंगतीच्या सहाय्याने सुंदर चित्रनिर्मिती केली. ती सर्व चित्रे या प्रदर्शनात बघायला मिळतात.

प्रत्येक प्रदेशाच्या तेथील धर्माच्या संस्कृती, परंपरा, सण-उत्सव यामध्ये वैविध्य आहे. महाराष्ट्रातील सण-उत्सवांना अनन्यसाधारण महत्व आहे. या चित्र प्रदर्शनात रक्षा बंधन, दिवाळी, मकर संक्रांत, तान्हा पोळा, राम नवमी, बुद्ध पौर्णिमा, हनुमान जयंती, पोळा, नाताळ, दही हंडी, लक्ष्मी पूजन, दुर्गा पूजा, भाऊबिज, वटसावित्री, नागपंचमी, आषाढी एकादशी, अक्षय तृतीया, नारळी पौर्णिमा, श्री दत्त जयंती, महाशिवरात्री, बलिप्रतिपदा, होळी, गणेश विसर्जन, कोजागिरी पौर्णिमा, त्रिपुरी पौर्णिमा, दसरा, गुड फ्रायडे, ईद, मारबत, कार्तिकी पौर्णिमा, फेस्टिवल ऑफ डेमॉक्रसी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, शिव जयंती, रावन दहन, गरभा, शंकरपट, गुरुनानक जयंती, गुरु पोर्णिमा, गुढी पाडवा, तटीय नरक, लोहरी, ओणम, बैसाखी, जागरण, म्हशींची शर्यंत, स्वातंत्र्य दिन, गणतंत्र दिन या पारंपारिक सण-उत्सवांच्या कलाकृती आहेत. तसेच अनोखे पोट्रेट पेंटिंग्स आणि आकर्षक अर्कचित्रे आहेत. आयरोनी ऑफ लाईफ, विदाऊट ट्री, मेडीटेशन आणि क्रीडा ही शिल्पे लक्ष वेधून घेतात. म्युरल माध्यमातील पोट्रेट डेमॉन्स्ट्रेशन अतिशय सुंदर आहे.

बसोलीच्या बाल चित्रकारांनी सण-उत्सवाचे महत्व आणि वैशिष्ट्य जाणून घेऊन त्यातील बारकावे आपल्या खास सौंदर्यदृष्टीने टिपले आहेत. कला, संस्कृती आणि परंपरेचा अविष्कार चित्रित करतांना विषयाची निवड, त्यातील आकृत्या, भौमितिक चिन्हांचा वापर, मांडणीची मोहकता, उष्ण रंगाला शीत रंगाची पार्श्वभूमी व ॲक्रेलिक माध्यमातील पारदर्शकता सहज साधली आहे.

बालकांची कल्पनाशक्ती, व्यापक दृष्टीकोन, आवश्यक प्रतिमा, प्रतीकांचा सूचक वापर आणि कुंचल्याच्या वैशिष्ट्यपूर्ण हाताळणीमुळे त्यांच्या चित्रात भावोत्कटता निर्माण झाली आहे. ऑईलकलर, ॲक्रेलिक या रंगमाध्यमांना अनुरूप चित्र रचनेतील चौकट, घटकांची मांडणी, मिश्र रंगाची आकर्षक तंत्रशैली, अवकाश विभाजन त्यात दडलेले सौंदर्य आणि चित्रकाराच्या मनातील भाव अधिक प्रभावी भासतात.

या बालचित्रकारांच्या प्रत्येक चित्रात सहजता, उत्कटता, उत्स्फूर्तता आणि प्रामाणिकपणा आहे. त्यामुळे ती चित्रे अंतःकरणाला भिडतात. अनन्यसाधारण कलात्मक क्षमता आणि आत्मदर्शी जाणिवेने सर्जनशील निर्मिती करणाऱ्या या चित्रकारांनी समकालीन कलाजगतावर आपला विशेष ठसा उमटविला आहे हे विशेषत्वाने नमूद करावसे वाटते.

व्यावसायिक चित्रकारांनी मुक्त चैतन्यशील वृत्तीचा अविष्कार आपल्या कलाकृतीतून घडविला आहे. 'भारतीय सण' या विषयाशी निगडीत हिंदु देवी-देवतांच्या आकृत्या, सामाजिक जिवनाचे चित्रण साकारतांना अमूर्त कला प्रकाराचा वापर करुन कँनव्हाँसवर रेखा आणि रंग यांच्यातील संतूलन साधण्याचा प्रयत्न केला आहे.

रचनेच्या बाबतीत आकृत्यांना मध्यवर्ती रचना करुन इतर घटकांना धक्का न लावता चित्रे उभी केली आहेत. त्यांच्या अनुभवविश्वातून गवसलेल्या संकल्पना, विषयाची निवड, विविध प्रसंग, चित्रसंयोजनातील समतोल व प्रमाणबद्धता आणि रंग कौशल्यावर भर दिला आहे. बऱ्याच चित्रातील पोतजन्य पूर्वभूमी, मध्यम भूमी व पार्श्वभूमी यातून डोकावणारे दुरुस्त आकाश असा काहीसा प्रवास चित्रकारांनी रंगवलेला आहे. नागपूरातील उद्योन्मुख व्यंगचित्रकार संजय मोरे व उमेश चारोळे यांनी काढलेली अर्कचित्रे अद्वितीय आहे. त्रिमितीय आणि रचनात्मक आकृतीबंध स्वरुपात घडवलेली शिल्पे वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

'मिडनाईट ड्रीम फेस्टिवल' प्रदर्शनीच्या निमित्ताने कलावंतांसाठी समृद्ध दालन निर्माण करुन; कलाविश्व प्रेरित व प्रभावित केले आहे. मुक्त कुंचलांकनातून साकारलेल्या भावविश्वातील हे तरंग अनुभवताना आपणही अधिक समृद्ध होत जातो. रविवार हा प्रदर्शनीचा अखेरचा दिवस असून, नागपूरकरांनी प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन आशिष यावले यांनी केले आहे .

# स्त्रियांनो, दुर्गादेवीच्या प्रत्येक शस्त्रांची पूजा करून देवीतत्व जागृत करूया !

आजच्या युगात स्त्री ही जेवढी कर्तुत्ववान बनली, तेवढीच ती असुरक्षित सुद्धा आहे, हे सत्य नाकारता येत नाही. २/३ वर्षांच्या मुलीपासून ते ८५ वर्षांच्या आजीपर्यंत विविध ठिकाणी नराधमांनी त्यांचे लचके तोडले आहेत. विविध सरकारी शासन यंत्रणा कार्यरत असल्या तरी महिलांवरील अत्याचाराच्या घटना सुरूच आहेत. हे सर्व थांबविणे आणि स्त्रिया मुली याना सुरक्षित वातावरण देणे हे सरकारबरोबर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. त्याचबरोबर प्रत्येक स्त्रीने सुद्धा स्वसंरक्षणासाठी कटीबद्ध होणे निकडीचे बनले आहे. येणाऱ्या नवरात्रात दुर्गादेवीची नुसती मूर्तीपूजा न करता तिच्या हातातील प्रत्येक शस्त्राची भक्ती वाढविणे आवश्यक आहे. श्री दुर्गादेवीच्या हातात असलेल्या शस्त्राने असुरांचा वध केला आहे. स्त्रीने तिच्यातील देवीतत्व वाढविण्यासाठी धर्मशिक्षण घेण्याबरोबर स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. ही काळजी गरज ओळखून अनेक हिंदुत्ववादी संघटनांचे स्वरक्षा प्रशिक्षणवर्ग सुरू आहेत. याचा लाभ घ्या आणि स्वतःतील देवीतत्व वाढवून खरी नवरात्री साजरी करूया !

**आल्हाद माळगांवकर, पनवेल**

## अशोकायन...

### वृध्दाश्रम ...?

श्राद्ध पक्षात श्रध्देने व्हावे
नतमस्तक पुर्वजांपुढे
त्यांच्यामुळेच आपणा दुनिया
पहावयास मिळाली गडे ..
शरीराची ठेवण अनुवंशिकता
संपत्तीचा ही वारसा
त्यांच्याकडूनच मिळाला
याला कशाला हवा आरसा
भारतीय संस्कृती पुर्वजांना
एवढा देते सन्मान, त्या देशात
वृध्दाश्रमांची वाढती संख्या
हा संस्कृतीचा नव्हे का अवमान ?



**प्रा.अशोक सारडा मेहकर**
**(९४२२३९४३३९)**

# कार्डिओमायोपॅथीच्या रुग्णांसाठी नवा आशावाद: डॉ. विद्यासागर ऊमाळकरांची होमिओपॅथिक व्ही-थेरपी

**नागपूर, ता. २९ :** सुप्रसिद्ध होमिओपॅथिक हृदयरोग तज्ज्ञ डॉ. विद्यासागर उमाळकर हे त्यांच्या चैतन्य होमिओ हार्टकेअर क्लिनिक आणि रिसर्च सेंटरमध्ये वर्षांपासून विविध हृदयरोगांवर यशस्वी रित्या उपचार करत आहेत.



डॉ.उमाळकरांनी संशोधित केलेल्या व्ही-थेरपीने हजारो रुग्णांना शस्त्रक्रिया न करता पूर्णतः हृदयरोगमुक्त केले आहे. जागतीक स्तरांवर होणा-याएकुण मृत्यूंपैकी % मृत्यू केवळ हृदयरोगांमुळेआणि यात भारताचा वाटाच अत्याधिक आहे.

अनेक हृदयरुग्ण शस्त्रक्रिया करूनही रक्तवाहिन्यांमध्ये पुनः ब्लॉकेजेस निर्माण अनुभव घेत आहेत. यावर पर्याय म्हणून डॉ. ऊमाळकरांनी सुरक्षितआणि अत्यंत प्रभावी होमिओपॅथिक व्ही-थेरपी अविरत संशोधनांती विकसित केली आहे व , पेक्षाही अधिक रुग्णांना त्याचा लाभ झाला आहे. हृदयरोगांमधे अनेक प्रकार आहेत.त्यापैकी

कार्डिओमायोपॅथी हा अत्यंत क्लिष्ट व गंभीर असा हृदयाच्या स्नायुंचा आजार आहे.जो नकळतपणे उत्तरोत्तर वाढत जातो . याचे अनेक प्रकार आहेत पण प्रामुख्याने तीन प्रकार आढळतात.

१.डायलेटेड कार्डिओमायोपॅथी- हा मुख्यतः आढळणारा प्रकार आहे ज्यामध्ये डाव्या वेंट्रिकलचा विस्तार होतो आणि पुरेसे रक्त पंप करण्याची त्याची क्षमता कमी होते. हा योग सामान्यतः मध्यमवयीन पुरुषांमध्ये दिसून येतो.

२. हायपरट्रॉफिक कार्डिओमायोपॅथी- या मधे हृदयाच्या डाव्या वेंट्रिकलचे स्नायू अनैसर्गीकरित्या जाड होतात.त्यामुळे रक्त पंप करण्याची त्याची क्षमता कमी होते. हा आजार कोणत्याही वयात होऊ शकतो. लहान मुलांमधे यांचे प्रमाण जास्त असते.

३.रिस्ट्रीक्टीव्ह कार्डिओमायोपॅथी हा सर्वात कमी आढळणारा प्रकार आहे .यामधे हृदयाचे स्नायू अधिक कडक होतात ज्यामुळे हृदय योग्यरित्या पंप करू शकत नाही. हा ब-याचवृद्ध लोकांमध्ये दिसून येतो.

कार्डिओमायोपॅथीची कारणे : अनुवांशिकता, तीव्र जलद हृदय गती, दीर्घकालीन उच्च रक्तदाब, हृदयाच्या झडपांच्या समस्या, हृदयविकाराच्या झटक्याने हृदयाच्या स्नायुंचे झालेले नुकसान, मद्यपान, लठ्ठपणा, थायरॉईड, मधुमेह, मादक पदार्थांचे सेवन. डॉ. ऊमाळकर यांनी व्ही थेरपी द्वारे विविध प्रकारच्या कार्डिओमायोपॅथीवर यशस्वी उपचार करुन अनेक रुग्णांच्या हृदयाची कार्यक्षमता वाढवली आहे. डॉ. ऊमाळकर यांना लायन्स क्लबचा हृदयमित्र पुरस्कार आणि महाराष्ट्र शासनाच्या होमिओपॅथिक कौन्सिलचा चा जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

# हीरो मेव्हरिक 440 थंडरव्हील्स एडिशन रिव्हील

हीरो मोटोकॉर्पने त्यांच्या सर्वात शक्तिशाली बाईक CB350 चे थंडरव्हील्स स्पेशल एडिशन रिव्हील केले आहे. कंपनीने ही बाइक कॉस्मेटिक अपडेटसह सादर केली आहे. याशिवाय बाइकच्या फीचर्समध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. हिरोने सॉफ्ट ड्रिंक ब्रँड थम्प्सअप सह भागीदारीत मेव्हरिकची विशेष आवृत्ती सादर केली आहे. यामध्ये ग्राहक थम्सअप बाटलीवर दिलेला कोड स्कॅन करून हीरो मेव्हरिक थंडरव्हील एडिशन जिंकू शकतात. Hero Maverick 440 स्पेशल एडिशनची किंमत जाहीर केलेली नाही. रोडस्टर बाईक ३५ कनेक्टिव्हिटी वैशिष्ट्यांसह येते आणि तिच्या नियमित मॉडेलची किंमत



१.९९ लाख ते २.२४ लाख रुपये आहे. Royal Enfield Classic 350, Harley Davidson आणि Honda CB350 यांसारख्या बाइक्सशी होईल. Hero Maverick 440 ची स्पर्धा Hero Maverick Thunderwheels Edition मध्ये नवीन काय आहे? सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये रोडस्टर बाईक लाल आणि गडद निळ्या रंगाच्या मिश्रणासह ड्युअल टोन शेडमध्ये दिसत आहे. हे रंग संयोजन थम्सअपच्या लोगो आणि ब्रँडिंगमध्ये वापरल्या जाणाऱ्या रंगांसारखे आहे. यामध्ये समोरच्या फेंडरला निळ्या रंगाची फिनिश देण्यात आली असून समोरचा भाग लाल रंगाचा आहे. हेडलाइट सेक्शनमध्येही थोडा बदल करण्यात आला आहे, आता त्यात फ्लायस्क्रीन देण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, स्टॉक रियर व्ह्यू मिरर बार-एंडमिररने बदलला आहे.

बाईकची टाकीदेखील गडद निळ्या रंगात देण्यात आली आहे.

# OPPO ने सादर केला Reno12 Pro Manish Malhotra लिमिटेड एडिशन या सणासुदीला खास बनवण्यासाठी

अमरावती, सप्टेंबर २०२४: या सणासुदीच्या मोसमात OPPO इंडिया घेऊन येत आहे OPPO Reno12 Pro Manish Malhotra मर्यादित आवृत्ती. भारताच्या चमकदार संस्कृतीचा आणि परंपरेचा गौरव करण्यासाठी हा अगदी सही स्मार्टफोन आहे. मनीष मल्होत्राच्या प्रसिद्ध वर्ल्ड कलेक्शनने प्रेरित असलेल्या या खास आवृत्तीत काळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या बारीक सोनेरी नक्षीकामातून आणि फुलाफुलांच्या वेलबुट्टीतून भारताच्या नक्षीकाम वारशाची संपन्नता प्रतिबिंबित होते. OPPO ची नावीन्यपूर्ण मटेरियल डिझाईन आणि मनीष मल्होत्राच्या विशिष्ट नक्षीकामाच्या मिलाफातून भारतीय सणासुदीच्या उत्साहाला साजेशी कारागिरी आणि चैन सादर होते. या स्मार्टफोनच्या बॉडी ग्राफिक्समध्ये भारताची समृद्ध कलात्मक परंपरा, खास करून मोगल कलेतील फुलफुलांची नक्षी आणि राजस्थान व उत्तर प्रदेशासारख्या प्रांतातील कलाकुसरीने केलेल्या नक्षीकामाचा प्रभाव दिसतो. यातील डिझाईन काळ्या आणि सोनेरी रंगात केलेल्या जरदोसी आणि पारशी गारा नक्षीकामाने प्रेरित आहे, जे अत्यंत शालीन, आधुनिक आणि समृद्ध दिसते, जो भारतीय परंपरेचा गाभा आहे. काळा रंग हे कालातीत सौंदर्याचे आणि अष्टपैलुत्वाचे प्रतीक आहे, सोनेरी रंग चैन आणि भव्यता दर्शवतो व त्यामुळे त्यांच्या संयोगातून भारतीय उत्सवांना साजेशी संपन्नता आणि उल्हास अनुभवास येतो. या संयोगामुळे OPPO Reno12 Pro Manish Malhotra चा आकर्षकपणा तर वाढतोच, शिवाय त्यातून पारंपरिक भारतीय पोशाखातील राजेशाही थाट प्रतिबिंबित होतो त्यामुळे सणासुदीच्या मोसमात त्याची साथ साजेशी दिसेल.




OPPO Reno12 Pro 5G कार्यक्षमता आणि कलात्मकता यांचा मिलाफ करणारीOPPO Reno12 Pro 5G मनीष मल्होत्रा मर्यादित आवृत्ती सादर करताना आम्हाला आनंद होत आहे. मनीष मल्होत्राची कलाकुसर आणि OPPO चे प्रगत तंत्रज्ञान यांच्या सहयोगाने बनलेले हे उत्पादन स्टाइलिश, सुंदर तर आहेच आणि लक्षित ग्राहकांना चटकन आवडेल असेही आहे. १२ मर्यादित आवृत्ती बनवण्यासाठी ने मटेरियल सायन्समधले आपले आधुनिक तंत्रज्ञान आणि नाजुक कलाकुसर यांचा संयोग केला आहे. ने प्रगत अशा डबल एचिंग आणि एनिलिंग या अत्यंत नेमक्या अशा हीट ट्रीटमेंट प्रक्रियेचा उपयोग केला आहे. ज्यामुळे काळ्या रंगाची पार्श्वभूमी आणि सोनेरी नक्षीकाम यांच्यातील आकर्षक विरोधाभास साध्य झाला आहे. या प्रक्रियेमुळे चमकदार रंग, बारीक नक्षीकाम आणि फुलाफुलांची वेलबुट्टी असलेली एक गुळगुळीत सपाटी बनवणे शक्य झाले आहे. गुंतगुंतीची आणि महागड्या तंत्राच्या अत्यंत नाजुक पॅटर्नच्या एनिलिंग प्रक्रियेमुळे याच्या डिझाईनमधल्या रेषा निरंतर आणि अखंड राहिल्या आहेत. अनेक वेळा ऑप्टिमायझेशन केल्याने हे शक्य होऊ शकले आहे. त्यात स्क्रीन मटेरियल, शाईची स्निग्धता आणि स्क्रीन प्रिंटिंग निकषांत अचूकता आणली आहे. सदर भागीदारीविषयीचा उत्साह व्यक्त करत Manish Malhotra म्हणाला, परंपरा आणि संपन्नता यांचा मिलाफ करण्याचा माझा नेहमीच प्रयत्न असतो आणि इंडियासोबतच्या या भागीदारीत ते व्हिजन उत्तम प्रकारे साध्य झाले आहे. १२ मर्यादित आवृत्ती बारीक कलाकुसर करण्याचा माझा कल आणि उत्तम कारागिरी यांचे मिश्रण छान जमून आले आहे आणि ने ग्राहकांसाठी सादर केले आहे. त्याच्यावरील राजेशाही डिझाईनमुळे हा फोन सणासुदीसाठीचा सुयोग्य सोबती बनला आहे, ज्यामध्ये सौंदर्य, शालीनता आणि उत्सवाचा उल्हास आहे. आम्ही एकत्र मिळून एक असे उत्पादन सादर करत आहोत, जे दिसायला सुंदर आहे आणि सोबत घेऊन मिरवण्यासाठी शाही दिसणारे आहे. ही आवृत्ती मानक डिझाईनच्या पलीकडे जाते; त्यामध्ये आठ-स्तरीय प्रक्रियेचा उपयोग केला आहे बॅकसाठी एरवी सहा-स्तरीयप्रक्रिया केली जाते आणि त्यात टेक्श्चरिंग, काऊंटरपॉइंट स्क्रीन प्रिंटिंगसहित दोन थरांचा मुलामा (सोन्यासाठी एक आणि काळ्या रंगांसाठी दुसरा) आणि स्टिरिओ एच्ड ग्लास बारीक कलाकुसरीवर लक्ष दिल्यामुळे त्याचे डिझाईन उठून येते आणि मर्यादित आवृत्ती ला एक मास्टरपीस बनवते. एक असा मास्टरपीस ज्यात सणासुदीचा आनंद थाटात साजरा करण्यासाठी कारागिरी आणि शाही शैली यांचा सुमेळ साधला आहे.

## ऊर्जा पुरवठा करणारी लॉजिस्टिक कंपनी

# ग्लॉटिस लिमिटेडने सेबीकडे केली आयपीओ कागदपत्रे सादर

**मुंबई, ता. २९ :** एनर्जी सप्लाय चेन लॉजिस्टिक कंपनी, ग्लॉटिस लिमिटेडने ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केला आहे, ज्यामध्ये २,००० दशलक्ष (रु. २०० कोटी) पर्यंतच्या ताज्या इश्यूचा समावेश आहे आणि रामकुमार सेंथिलवेल व कुट्टप्पन मणिकंदन या प्रमोटर्सनी संयुक्तपणे २ एवढ्या दर्शनी मूल्याच्या १४,५७१,००० च्या इक्विटी शेअर्सच्या विक्रीची ऑफर आहे. ग्लॉटिस ही एक आघाडीची मल्टी-मॉडल, एकात्मिक लॉजिस्टिक सेवा प्रदाता आहे, ज्याचे ऊर्जा पुरवठा साखळी उपायांवर विशेष लक्ष आहे. महासागरातील मालवाहतुकीसह संपूर्ण भौगोलिक क्षेत्रामध्ये मालाची हालचाल अनुकूल करण्यासाठी उभ्या भागांमध्ये मल्टीमॉडल क्षमता, हवाई मालवाहतूक अग्रेषण; रस्ते वाहतूक, गोदाम, स्टोरेज, कार्गो हाताळणी, थर्ड-पार्टीलॉजिस्टिक (३) सेवा आणि कस्टम क्लीअरन्स यांसह इतर सहायक सेवांसह एंड-टू-एंड लॉजिस्टिक सोल्युशन्स वितरित करते. कंपनीने आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ९५,००० हाताळले. ग्लॉटिसने रु. ५३० दशलक्ष किमतीच्या व्यावसायिक वाहनांच्या खरेदीसाठी भांडवली खर्चाच्या आवश्यकतांसाठी फ्रेश इश्यूमधून मिळालेल्या निव्वळ उत्पन्नाचा वापर करण्याचा प्रस्ताव दिला आहे. यात कंपनीने घेतलेल्या रु. ३८० दशलक्ष ठरावीक कर्जाची परतफेड आणि/किंवा पूर्व-पेमेंट, अंशतः किंवा पूर्ण, अज्ञात अधिग्रहण व सामान्य कॉर्पोरेट उद्देशांद्वारे अजैविक वाढीसाठी निधी देणे याचा समावेश आहे. क्लिष्ट पुरवठा शृंखला हाताळण्यात जागतिक पाऊलखुणा आणि कौशल्यासह, ग्लॉटिस नवीकरणीय ऊर्जा उद्योग, अभियांत्रिकी उत्पादने, गृहोपयोगी उपकरणे, बांधकाम साहित्य आणि कृषी, ऑटोमोबाइल रसायने, कापड, यंत्रसामग्री यांसह अनेक उद्योगांमध्ये ग्राहकांना सेवा देते. याशिवाय ऊर्जा पायाभूत सुविधा व अक्षय ऊर्जा प्रकल्प यावर विशेष भर दिला जातो. कंपनीच्या भारतभरात ८ शाखा आहेत, परंतु इतकेच मर्यादित न राहता गेल्या काही वर्षांमध्ये युरोप, उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, आफ्रिका, मध्य पूर्व आणि आशियाई देशांसह, सर्व देशांमध्ये आमचे कार्य पसरविले आहे. आजपर्यंत कंपनीने ११० देशांना सेवा दिली आहे. कंपनीने आर्थिक वर्ष २०२४ साठी छ ४,९७४.०९ दशलक्ष (रु. ४९७.४ कोटी) महसूल जमा केला आहे. गेल्या तीन आर्थिक वर्षांमध्ये, कंपनीने केलेल्या सागरी मालवाहतुकीचे प्रमाण ६१.८०% ने वाढले आहे. आर्थिक वर्ष २०२२ मधील ५८,७६० वरून २०२४ मध्ये ९५,०७२ वर पोहोचले आहे. ऑपरेशन्समधील महसुलाच्या % म्हणून त्याचे नफा मार्जिन आर्थिक २०२२ मध्ये ३.७०% वरून २०२४मध्ये ६.३४% पर्यंत वाढले आहे.

# एअरटेलची स्पॅमवर कार्यवाही

## स्पॅम शोधण्यासाठी भारतातील पहिले एआय संचालित नेटवर्क सोल्यूशन सादर केले

नवी दिल्ली, सप्टेंबर २९, २०२४: देशातील स्पॅमच्या समस्येला आळा घालण्यासाठी भारती एअरटेलने (एअरटेल) आज भारतातील पहिले नेटवर्क आधारित, एआय संचालित स्पॅम शोधण्यासाठी समाधान सादर केले जे आपल्या ग्राहकांसाठी स्पॅम कॉल आणि संदेशांच्या समस्येचे लक्षणीय निराकरण करेल. टेलिकॉम सर्व्हिस प्रोव्हायडरने देशातील अशा प्रकारचे पहिलेच समाधान सादर केले आहे, हे टूल ग्राहकांना सर्व संशयित स्पॅम कॉल आणि एसएमएसला रिअल टाइममध्ये सतर्क करेल. हे समाधान विनामूल्य आहे आणि सर्व एअरटेल ग्राहकांसाठी सेवा विनंती न करता किंवा ॲप डाउनलोड न करता आपोआप सक्रिय होईल. भारती एअरटेलचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गोपाल विठ्ठल म्हणाले, 'स्पॅम ग्राहकांसाठी धोकादायक बनले आहेत. हे सर्वोतपरी सोडविण्यासाठी आम्ही गेले बारा महिने यावर संशोधन केले आहे. आज आम्ही देशातील पहिले एआय संचालित स्पॅम मुक्त नेटवर्क सादर करत आहोत जे आमच्या ग्राहकांना घुसखोर आणि अवांछित संप्रेषणांच्या सतत आक्रमणापासून वाचवेल. विठ्ठल यांनी असेही सांगितले कीड्युअल-लेयर प्रोटेक्शन म्हणून डिझाइन केलेल्या या समाधानामध्ये दोन फिल्टर आहेत -एक नेटवर्क लेअरवर आणि दुसरा आयटी सिस्टम लेअरवर. प्रत्येक कॉल आणि एसएमएस या ड्युअल लेयर्ड एआय शील्डमधून जातो. २ मिलीसेकंदात आमचे समाधान दररोज १.५ अब्ज संदेश आणि २.५ अब्ज कॉलवर प्रक्रिया करते. हे एआयच्या शक्तीचा वापर करून रिअल टाइम आधारावर १ ट्रिलियन रेकॉर्डवर प्रक्रिया करण्यासारखे आहे. आमचे समाधान दररोज उद्भवणाऱ्या १०० दशलक्ष संभाव्य स्पॅम कॉल आणि ३ दशलक्ष




स्पॅम एसएमएस यशस्वीरित्या ओळखण्यास सक्षम आहे. आमच्यासाठी ग्राहकांना सुरक्षित ठेवणे हे ज्वलंत प्राधान्य आहे. एअरटेलच्या डेटा शास्त्रज्ञांनी विकसित केलेल्या एआय संचालित समाधानामध्ये कॉल आणि एसएमएसला संशयित स्पॅम म्हणून ओळखण्यासाठी आणि वर्गीकृत करण्यासाठी प्रोप्रायटरी अल्गोरिदमचा वापर केला जातो. अत्याधुनिक एआय अल्गोरिदमद्वारे संचालित नेटवर्क कॉलर किंवा पाठवणाऱ्याच्या वापर करण्याची पद्धती, कॉल / एसएमएस फ्रिक्वेन्सी, कॉल कालावधी अशा विविध मापदंडांचे रिअल टाइम आधारावर विश्लेषण करते. ज्ञात स्पॅम पॅटर्नविरूद्ध या माहितीचा क्रॉस-संदर्भ देऊन, सिस्टम संशयित स्पॅम कॉल आणि एसएमएस अचूकपणे चिन्हांकित करते. याव्यतिरिक्त, हे समाधान ग्राहकांना एसएमएसद्वारे प्राप्त दुर्भावनापूर्ण लिंकबद्दल देखील सतर्क करते. यासाठी एअरटेलने ब्लॅकलिस्टेड यूआरएलचा सेंट्रलाइज्ड डेटाबेस तयार केला असून संशयास्पद लिंकवर क्लिक करण्यापासून युजर्सना सावध करण्यासाठी अत्याधुनिक एआय अल्गोरिदमद्वारे प्रत्येक एसएमएस रिअल टाइममध्ये स्कॅन केला जातो. हा उपाय वारंवार आयएमईआय बदलांसारख्या विसंगती देखील शोधू शकतो जे फसवणुकीच्या वर्तनाचा एक सामान्य सूचक म्हणून धरले जाते.

# आईडीएफसी फर्स्ट बँकेची आईडीएफसी लिमिटेडमध्ये विलीनीकरण यशस्वीपणे पूर्ण केल्याची घोषणा!

**मुंबई, २९ सप्टेंबर, २०२४:** आईडीएफसी फर्स्ट बँकेने आज झालेल्या त्यांच्या बोर्डाच्या बैठकीत, सर्व आवश्यक भागधारक आणि नियामक मंजूरी मिळाल्यानंतर आईडीएफसी लिमिटेडचे आईडीएफसी फर्स्ट बँकेत विलीनीकरण पूर्ण केल्याची घोषणा केली, जी ०१ ऑक्टोबर २०२४पासून प्रभावी होईल. विलीनीकरणाच्या परिणामी, आयडीएफसी लिमिटेडमधील अशा भागधारकाने १० ऑक्टोबर २०२४ रोजी रेकॉर्ड तारखेला ठेवलेल्या आईडीएफसी लिमिटेडच्या प्रत्येक १०० इक्विटी समभागांमागे बँकेचे १५५ इक्विटी शेअर्स वाटप केले जातील. शेअर्सचे वाटप अपेक्षित आहे आयडीएफसी लिमिटेडचे भागधारक ३१ ऑक्टोबर २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी नियामक प्रक्रिया आणि मंजुरींच्या अधीन आहेत. आईडीएफसी फर्स्ट बँकेच्या विलीनीकरणाचे खालील फायदे आहेत: १. सरलीकृत कॉर्पोरेट संरचना: विलीनीकरणानंतर, बँकेची एक सरलीकृत कॉर्पोरेट संरचना असेल आणि कोणतीही होल्डिंग कंपनी नसेल. २. सरलीकृत शेअरहोल्डिंग स्ट्रक्चर: शेअरहोल्डिंग संरचना इतर आघाडीच्या संस्थात्मक भारतीय खाजगी क्षेत्रातील बँकांसारखीच असेल, ज्यामध्ये प्रवर्तक नसतील. बँक ही व्यावसायिकरित्या व्यवस्थापित संस्था म्हणून कायम राहील.३. रोख आणि रोख समतुल्य: विलीनीकरणाचा भाग म्हणून, बँकेला अंदाजे छ६०० कोटी रोख आणि रोख समतुल्य प्राप्त होईल.

४. थकबाकीदार पेड-अप शेअर्समधील कपात: आईडीएफसी लिमिटेडचे आईडीएफसी फर्स्ट बँकेत असलेले २,६४,६४,३८,३४८ इक्विटी शेअर्स रद्द केले जातील आणि त्याऐवजी, आईडीएफसी फर्स्ट बँक मान्य स्वॅप रेशोनुसार आईडीएफसी लिमिटेड २,४७,९९,७५,८७६ नवीन इक्विटी शेअर जारी करेल. त्यामुळे बँकेचे पेड-अप शेअर कॅपिटल १६,६४,६२,४७२ इक्विटी शेअर्सने कमी होईल आणि व्यवहारानंतर बँकेचे पेड-अप कॅपिटल ७,४८,२७,३१,९९१ शेअर्सवरून कमी होऊन ७,३१,६२,६९,५१९ इक्विटी शेअर्स राहील.

५. लाभांश पेमेंटसाठी पात्र: बँकेने सुरुवातीच्या वर्षांमध्ये नोंदवलेल्या नुकसानीमुळे, जे प्रामुख्याने वारसा पायाभूत सुविधा आणि कॉर्पोरेट कर्ज खाती आणि गुडविल राइट-ऑफमुळे होते, बँकेला तोटा जमा झाला होता. यामुळे शेअरधारकांना लाभांश देण्याची बँकेची क्षमता मर्यादित होत होती. विलीनीकरण योजनेचा एक भाग म्हणून बँकेचे संचित तोटा बँकेच्या सिक्युरिटीज प्रीमियम खात्यावर जमा केला जाईल. यामुळे आता बँकेला भविष्यात लाभांश देण्याच्या संधी शोधता येतील.

६. एकीकरण आणि नियामक अनुपालन सुव्यवस्थित करणे.

७. भारत हा झपाट्याने विकसित होणारा देश आहे आणि अशा वाढीमुळे पुढील काही दशकांमध्ये मोठ्या संधी उपलब्ध होतील. बँकेतील सरलीकृत शेअरहोल्डिंग आणि कॉर्पोरेट संरचना, मजबूत क्षमता आणि ब्रँड बिल्डिंग आणि युनिव्हर्सल बँकेच्या सेवांच्या संपूर्ण श्रेणीसह, बँक भारताने ऑफर करत असलेल्या अफाट संधींसह प्रगती करण्यास सक्षम आहे.

विलीनीकरणाबद्दल बोलताना, वैद्यनाथन- एमडी व सीईओ, आईडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणाले, आयडीएफसी फर्स्ट बँक आणि आयडीएफसी लिमिटेड यांच्यातील विलीनीकरणाच्या घोषणेने गेल्या २ वर्षांपासून सुरू असलेल्या तीव्र कामाचा शेवट झाला आहे. मी आयडीएफसी लिमिटेडचा मनापासून आभारी आहे ज्या फलदायी चर्चेने रचना सुलभ करण्यात मदत केली आणि मार्ग मोकळा केला आणि विलीनीकरण एकत्र आणले. हे विलीनीकरण यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी सर्व नियामक प्राधिकरणांचे उत्कृष्ट मार्गदर्शन आणि समर्थन यासाठी मी त्यांचा आभारी आहे. आयडीएफसी फर्स्ट बँकेकडे आता कोणत्याही प्रवर्तक होल्डिंगशिवाय एक सरलीकृत कॉर्पोरेट संरचना असेल. बँक ऑफ अमेरिका, जेपी मॉर्गन, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक यासारख्या सर्व जागतिक कॉर्पोरेशन या व्यावसायिकरित्या व्यवस्थापित संस्था आहेत ज्यांचे कोणतेही प्रवर्तक नसतात. त्याचप्रमाणे आईडीएफसी फर्स्ट बँक देखील त्यांच्या सारखी बारमाही संस्था बनू शकते. या अर्थाने हे विलीनीकरण बँकेसाठी ऐतिहासिक क्षण आहे. भारतीय अर्थव्यवस्था २०४७ पर्यंत ३.५ ट्रिलियन वरून ३०-३५ट्रिलियन पर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे बँकिंगच्या सर्व क्षेत्रांमध्ये मोठ्या संधी निर्माण होतील. हे उल्लेखनीय आहे की पुढील २० वर्षांत भारतीय पत बाजार १५ पटीने वाढण्याची अपेक्षा आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक ही कमी बेस असलेली प्रारंभिक टप्प्यातील बँक असल्याने आता या वाढीमध्ये जलद गतीने सहभागी होऊ शकते. पत वाढीबरोबरच, भारतीय अर्थव्यवस्थेतील अशा वाढीमुळे व्यापार वित्त, विदेशी मुद्रा, व्यवहार बँकिंग, रोख व्यवस्थापन इ.च्या संधी देखील खुल्या होतात. पुढे, संपत्ती व्यवस्थापन उद्योगाची देखील भारताची भरभराट होत असताना झपाट्याने वाढ होण्याची अपेक्षा आहे, ज्यामध्ये व्यवसाय आईडीएफसी फर्स्ट बँकेने गेल्या अनेक वर्षांत १८,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त -सह मजबूत उपस्थिती निर्माण केली आहे, जी दरवर्षी ५०% पेक्षा जास्त दराने वाढत आहे. गेल्या ५ वर्षांमध्ये, आईडीएफसी फर्स्ट बँकेने एक मजबूत पाया, उत्कृष्ट कार्य संस्कृती, नैतिक बँकिंग दृष्टीकोन, डिजिटलायझेशन आणि तंत्रज्ञानावर उच्च लक्ष केंद्रित केले आहे आणि सामाजिक कल्याणावर लक्ष केंद्रित केले आहे. आम्हाला विश्वास आहे की हे आवश्यक पाया तयार केल्याने भविष्यात आईडीएफसी फर्स्ट बँक जागतिक दर्जाची बँक बनण्यास मदत होईल.

# ऑटोमॅटिक ट्रान्समिशनसह सिट्रोएन C3 हॅचबॅक कार लाँच




**१० लाख रुपयांपासून किंमत सुरू यात ६ एअर बॅग्जसारखी सुरक्षा वैशिष्ट्ये टाटा टियागोशी स्पर्धा**

**नवी दिल्ली, २९ सप्टेंबर :** सिट्रोएनने आज (२९ सप्टेंबर) आपल्या एंट्री लेव्हल हॅचबॅक कार सिट्रोएन C3च्या ऑटोमॅटिक ट्रान्समिशन मॉडेलची किंमत जाहीर केली आहे. फ्रेंच कार निर्माता कंपनीने ऑगस्ट २०२४ मध्ये - च्या लॉन्च इव्हेंटमध्ये Citroen C3 हॅचबॅक आणि Citroen C3 Aircross च्या अद्ययावत आवृत्त्या भारतीय बाजारपेठेत सादर केल्या.

हॅचबॅक आता ६ एअरबॅगसह येईल आणि त्यात नवीन वैशिष्ट्येदेखील जोडण्यात आली आहेत. सिट्रोएनने त्याच्या टॉप व्हेरियंट शाइन टर्बोमध्ये सिक्स-स्पीडटॉर्क कन्व्हर्टर ऑटोमॅटिक ट्रान्समिशनचा पर्याय दिला आहे, ज्याची सुरुवातीची एक्स-शोरूम किंमत ९.९९ लाख रुपये ठेवण्यात आली आहे. कारची स्पर्धा मारुती वॅगन आर, सेलेरियो आणि टाटा टियागोशी आहे.

## सोनी इंडियातर्फे व्यावसायिक क्रिएटर्स आणि ऑडिओ प्रेमींसाठी

# क्लोज्ड मॉनिटर स्टुडिओ हेडफोन्स, अल्ट्रा वाइडबँज फ्रीक्वेन्सी रेंज प्लेबॅक लाँच

**नवी दिल्ली, २९ सप्टेंबर :** सोनी इंडियाने आज एमडीआर-एम रेफरन्स क्लोज्ड मॉनिटर हेडफोन्स लाँच केले असून, ते म्युझिक क्रिएटर्स, साउंड इंजिनीयर्सना कोणत्याही वातावरण त्यांच्या आवडीप्रमाणे संगीताची निर्मिती करता यावी, या हेतूने खास तयार करण्यात आले आहे. हेडफोन्समध्ये क्लोज्ड अकॉस्टिक स्ट्रक्चर आणि हाय साउंड आयसोलेशन विशेषतः विकसित ड्रायव्हर देण्यात आला असून,हलक्या वजनाचे व आटोपशीर डिझाइन युजर्सना ते स्टुडिओमध्ये असल्याप्रमाणे इतर कोणत्याही वातावरण निर्मिती करण्याचा आनंद देतात. एमडीआर- एम हेडफोन्समध्ये स्टुडिओ साउंड क्वालिटी अतिरिक्त आरामदायीपणा व विश्वासार्हतेसह देण्यात आला आहे व तो वेगवेगळ्या प्रकारची संगीत निर्मिती व हाय-रिझोल्युशन ऑडिओच्यावापरासाठी योग्य आहे. एमडीआर-मध्ये स्टुडिओ साउंड दर्जा, काळजीपूर्वक ट्युन करण्यात आलेल्या अकॉस्टिक स्ट्रक्चरसह देण्यात आला असून,




वेगवेगळ्या प्रकारची संगीत निर्मिती त्यात शक्य होते. ध्वनी दर्जाच्या केंद्रस्थानी अनोख्या पद्धतीने विकसित करण्यात आलेले ड्रायव्हर युनिट आहे, जे अल्ट्रा-वाइडबँड प्लेबॅक (५ -८०) साध्य करते. त्याशिवाय यात सॉफ्ट एज शेपचे कॉम्बिनेशन देण्यात आले आहे, जे कमी फ्रीक्वेन्सीची पुरेसा आवाज आणि कमी बदलांसह पुनर्निमिती करते, त्याशिवाय यात अल्ट्रा-हायफ्रीक्वेन्सीजची पुनर्निर्मिती करण्यासाठी हार्ड डोम शेप देण्यात आला आहे. क्लोज्ड अकॉस्टिक स्ट्रक्चरमुळे वातावरणातील इतर आवाज, आवाज हेडफोन्समधून बाहेर जाणं, असे प्रकार होत नसल्यामुळे ते वेगवेगळ्या प्रकारच्या निर्मिती प्रक्रियांमध्ये योग्य आहेत. त्यामुळे प्रत्येक नोट काळजीपूर्वक ट्युन होते आणि क्रिएटरची अचूकता व अस्सलपणा जपला जातो.

# रोल्स -रॉयस कलिनन सिरीज भारतात लाँच

## मसाज, हीटिंग आणि कूलिंग फंक्शन्ससह लक्झरी मधील सर्व जागा

**नवी दिल्ली, २९ सप्टेंबर :** लक्झरी कार उत्पादक कंपनी रोल्स-रॉइसने Rolls-Royce Cullinan Series II भारतीय बाजारपेठेत लॉन्च केली आहे. कंपनीने ही कार दोन प्रकारात सादर केली आहे. त्याच्या स्टँडर्ड आवृत्तीची एक्स-शोरूम किंमत १०.५ कोटी रुपये ठेवण्यात आली आहे. त्याच वेळी, ब्लॅक बॅज कलिनन सीरीज ची एक्स-शोरूम किंमत १२.२५ कोटी रुपये आहे.

ही भारतातील सणासुदीतील सर्वात महागडी कार आहे. अद्यतनानंतर, सध्याच्या मॉडेलच्या तुलनेत स्टँडर्ड




कलिनन सुमारे ३.५५ कोटी रुपयांनी आणि ब्लॅक बॅज कुलिनन ४.०५ कोटी रुपयांनी महागली आहे. कारमधील सर्व प्रवाशांसाठी मसाज, हीटिंग आणि कूलिंग फंक्शन्ससह सीट्स प्रदान करण्यात आल्या आहेत. याशिवाय यात अनेक नवीन फीचर्स जोडण्यात आले आहेत.

ग्राहकांना Cullinan Series II आणि Black Badge Cullinan Series II मॉडेल्स सानुकूलित Rolls-Royce Motor Cars चेन्नई आणि Rolls-Royce Motor Cars नवी दिल्ली येथे मिळू शकतात. त्याची डिलिव्हरी २०२४ च्या चौथ्या तिमाहीत सुरू होईल. लक्झरी कार या वर्षी मे महिन्यात जागतिक बाजारपेठेत लॉन्च करण्यात आली होती.

# प्रियदर्शनी कर्मचारी सहकारी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २९ :

प्रियदर्शनी कर्मचारी सहकारी पतसंस्था ही शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहकार्याने अ श्रेणीत आहे. शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी पन्नास टक्के सेवानिवृत्त झाले तरीही लाभांश मात्र १० टक्के कायम आहे. असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष विलास मुसळे यांनी केले. प्रियदर्शनी कर्मचारी सहकारी पतसंस्था नागपूर येथील २६ वी वार्षिक सर्वसाधारण आमसभा लोकसेवा नगर रिंग रोड, नागपूर येथे पतसंस्थेचे अध्यक्ष विलास मुसळे यांच्या अध्यक्षतेखाली रविवार २९ सप्टेंबर रोजी पार पडली.



त्यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. व्यासपीठावर प्रियदर्शनी कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष गजानन काकड, मानद सचिव आरती भोरे, खजिनदार विजय कळसाईत, संचालक प्रशांत देशमुख, प्रगती पाचपोर, चेतन घोडे रमेश शेंडे वैजंती देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम डॉ.पंजाबराव देशमुख मेमोरिअल शिक्षण संस्थेचे संस्थापक कार्याध्यक्ष व प्रियदर्शनी कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक, आधारस्तंभ शिक्षणरत्न व शिक्षण शिरोमणी, माजी प्राचार्य स्व.मधुकरराव मुंदाफळे यांच्या प्रतिमेचे पुजन व दीपप्रज्वलन करून आमसभेला सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविकतेमधुन खजिनदार विजय कळसाईत यांनी संस्थेचा इतिहास, सभासदाचे हित हेच ब्रीद ठेऊन चाललेली वाटचाल, संस्थेची होत असलेली भरभराट यावर आपले विचार मांडले. उपाध्यक्ष गजानन काकड यांनी वित्तीय अहवाल सभेसमोर मांडला. सचिव आरती भोरे यांनी २०२३-२०२४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अहवालाचे वाचन करून लेखाजोखा सभासदापुढे मांडला.

संस्थेअंतर्गत असणाऱ्या शाळा महाविद्यालयातील प्रभु नागपूरे, अरुण कराळे, अनिल देशमुख, ब्रम्हानंद मेश्राम, दिपा पांचाळ या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेत गुणवंत पाल्यांचा सन्मान, चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. संचालन प्रा. प्रगती पाचपोहर यांनी तर आभार वैशाली लोही यांनी मानले.

आयोजनासाठी प्रा. अविनाश चौधरी, शुभम खडसे, बंडूभाऊ मोहोड यांचे सहकार्य मिळाले. यावेळी सर्व सदस्य व भागधारक उपस्थित होते.

# महिला सशक्तिकरण अभियान अंतर्गत रामधाम येथे मोहा कुकीज बनविण्याचे प्रशिक्षण संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २९ :

माँ पार्वती सभागृह रामधाम तीर्थ मनसर येथे महिला सशक्तिकरण अभियान अंतर्गत पर्यटक मित्र चंद्रपाल चौकसे रामटेक को -ऑपरेटिव्ह कृषी उद्योग रामटेक तर्फे महिला बचत गट सशक्तिकरण अभियान अंतर्गत आर्थिक विकासाकरिता तांत्रिक प्रशिक्षण शिबीर मार्फत माँ पार्वती सभागृह, रामधाम तीर्थ मनसर येथे मोहा कुकीज बनविण्याचे एक दिवशीय प्रशिक्षण घेण्यात आले.

या प्रशिक्षणाचे उदघाटन रामधामचे संस्थापक चंद्रपालजी चौकसे यांचा हस्ते करण्यात आले. या प्रशिक्षणात महिलांना मोहापासून कुकीज कसे बनवायचे व बनविण्यासाठी काय-काय लागणार अशी सविस्तर माहिती देवयानी उमाळे यांनी प्रशिक्षणात उपस्थित सर्व महिलांना दिली. या प्रशिक्षणात २२०० महिलांची उपस्थिती होती. बचत गटाच्या महिलांनी रोजगार प्राप्त होण्याकरिता उत्सुकतेणे प्रशिक्षणात सहभागी झाल्या.

रामटेक को ऑपरेटिव्ह कृषी उद्योग मार्फत महिलांना सशक्त बनविण्यासाठी महिला बचत गटांना व युवक व युवतीना कुटीर उद्योग स्थापित करून रोजगाराची संधी प्राप्त करून देऊन दैनंदिन उपयोगाचे पदार्थ बनविण्याकरिता मोफत प्रशिक्षण देऊन रोजगार निर्मित करण्यात येईल, कुटीर उद्योग सुरु करण्याकरिता आर्थिक सवलती बाबत मोफत मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात येईल.

इच्छुक बचत गटांना उद्योग सुरु करण्याकरिता उद्योग सामग्री संदर्भात मार्गदर्शन करण्यात येईल, महिला बचत गट द्वारा निर्मित वस्तुंना नागपूर, पुणे, मुंबई, नाशिक व इतर महानगर येथे विक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येईल असा विश्वास चंद्रपाल चौकसे यांनी दिला.

यावेळी उपस्थित (माविम) प्रशिक्षणात आलेल्या सर्व महिलांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. अतिशय आनंदमय वातावरणात कार्यक्रम संपन्न झाले. संचालन जयश्री खोब्रागडे यांनी केले. यावेळी ह.भ.प. सागर महाराज बोराटे, देवयानी उमाळे, सुजाता ठाकरे, रंजना लढारे, लता सरोदे, शिला उईके, कल्पना फुलबांधे, शारदा बर्वे, रत्नमाला घावडे, विजया भेलोडे, रंजिता उईके, रामचंद्र करनाके, कैलास निघोट, देविदास जामदार व बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या.

# एन. एन. मिश्रा यांची संघटनेच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष पदावर निवड

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २९ :

केंद्र आणि राज्य सरकारी अधिकारी, कर्मचारी आणि पेन्शनधारक राष्ट्रीय संघटना नवी दिल्ली या संघटनेचे महाराष्ट्र राज्य कमिटी अध्यक्ष आणि केंद्रीय इंटकचे राष्ट्रीय वरिष्ठ सचिव एन. एस. पिल्ले यांनी गवर्नमेंट पेंशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष एन.एन. मिश्रा यांची राष्ट्रीय संघटनेच्या उपाध्यक्ष पदावर निवड केली आहे. त्यांची राष्ट्रीय उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल गवर्नमेंट पेन्शनर्स असोसिएशनचे सचिव कमलाकर इंगळे तसेच पदाधिकारी, सी.जी.एच.एस सल्लागार समिती सदस्य एन. एम .लिमये, डी. डी. गजभिये, बी. आर. रीनके, श्रीधर गजभिये, बी. जी. बालपांडे यांनी



पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत केले व शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी त्यांच्या नियुक्तीचा संघटनेला कर्मचारी व पेन्शन धारकांना निश्चित फायदा होईल, असा विश्वास पदाधिकारी डी. डी. गजभिये यांनी व्यक्त केला.

# आत्मनिर्भर व स्वावलंबी करण्याचे शासनाचे ध्येय : आ. समीर मेघे

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. २९ :

शासनाच्या प्रत्येक योजना या आत्मनिर्भर व स्वावलंबी करण्याच्या आहे. फक्त शासनाच्या प्रत्येक योजना गरजवंतापर्यंत पोहचविण्याचे कार्य प्रत्येक कार्यकर्त्यांनी केले पाहीजे. असे प्रतिपादन आमदार समीर मेघे यांनी केले. दवलामेटी येथे शासकीय योजनेचा सेवा पंधरवाडा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी आमदार समीर मेघे अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.



या सेवा पंधरवाड्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, वयोश्री योजना, कामगार कल्याण योजना, युवा कार्य प्रशिक्षण योजनांचे नोंदणी शिबीर आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार समीर मेघे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार बाळासाहेब टेळे, नायब तहसीलदार हटवार, डॉ. प्राजक्ता उराडे, नरेश चरडे, दिनेश कोचे,आनंदबाबू कदम, कमलाकर इंगळे, सुजित नितनवरे, केशव बांदरे, कैलाश मंथापूरवार, सरपंच ज्योत्सना नितनवरे, सरपंच मंगला रागीट , उपसरपंच अर्चना चौधरी,संजय कंपनीचोर,नितीन अडसड,सरिता यादव, कल्पना सगदेव, रेखा कोडापे ,स्नेहा बडवाईक, विनोद चाफेकर, छाया खिल्लारे, साधना शेंद्रे, सतीश खोब्रागडे, छत्रपती शेंद्रे रश्मी पाटील, शीतल वानखडे, उज्वला गजभिये, शकुंतला अभ्यंकर, प्रशांत केवटे, रिता उमरेडकर, रक्षा सुखदेवे, शैलेश खोब्रागडे भीमराव मोटघरे, सुशीला बावणे, रोशन बिडवाईक, विजय पिसोडे,सुनील दुबे, विनोद शर्मा, सुनील आधोळकर, मयूर मानकर, आशा हिंगणेकर, रमेश गोमासे, कमल पेंदाम, प्रशांत श्रीवास्तव, ममता अजय जयस्वाल, भारत गजभिये, रोशन मेश्राम, सचिन खिल्लारे, धनराज दिघोरे उपस्थित होते.

प्रास्ताविक सरपंच गजानन रामेकर यांनी केले. संचालन ग्रामविकास अधिकारी शिवाजी नागरगोजे यांनी तर आभार उपसरपंच अर्चना चौधरी यांनी मानले.

# शिक्षकांसाठी आयोजित गृह प्रशिक्षण सत्र



■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. २९ :

साई इंटरनॅशनल स्कूल, रामटेक यांनी शिक्षकांसाठी गृह प्रशिक्षण सत्र यशस्वीरित्या आयोजित केले. शिक्षक प्रशिक्षणाच्या दोन्ही सत्रांचा शिक्षकांनी आनंद घेतला. प्राचार्य राजेंद्र मिश्रा यांनी हॅप्पी क्लासरूमचे महत्त्व विशद केले. त्यांनी शिक्षकांना वर्गात आनंदी कसे बनवायचे यासंबंधी काही टिप्स देऊन मार्गदर्शन केले.

सत्राचा दुसरा भाग:विद्यार्थ्यांना समजून घेणे या विषयाशी संबंधित होता. रिसोर्स पर्सन होते.

प्रा.एम.बक्सी.सकारात्मक संबंध निर्माण करण्यासाठी, शिकणे अधिक गुंतवून ठेवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना समजून घेणे महत्त्वाचे आहे. शिक्षणामध्ये, समजून घेण्याकडे एक प्रक्रिया म्हणून पाहिले जाऊ शकते ज्याद्वारे विद्यार्थी वैयक्तिक अर्थ किंवा जे अनुभवले जात आहे त्याचे प्रतिनिधित्व तयार करतात.

# अवैध कत्तलखाण्यावर पोलिसांची धाड

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २९ :

पोलीस स्टेशन अतंर्गत असणाऱ्या कोळसा टाळ येथील भाड्याने राहत असलेल्या इसमाच्या घरात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेले गोमांस असल्याची गुप्त माहीती मिळताच पोलिसांनी त्वरीत आरोपीच्या घरी धाड टाकुन एक टन गोमांस अंदाजे दोन लाख रुपये व सत्तुर असा एकूण २ लाख १५० रुपयांचा मुद्देमाल पकडला. जाकिर कुरैशी अन्दुल करीम कुरैशी रा. कोळसा टाळ कामठी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# विदर्भ साहित्य संघ शाखा काटोल द्वारा आयोजित "काव्य सम्मेलन" उत्साहात संपन्न



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २९ :

अरविंद सहकारी बँकेच्या सभागृहात काव्य सम्मेलन पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य तथा वि.सा.संघ, काटोलचे अध्यक्ष डॉ. विजय धोटे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गोविंद भूतडा व डॉ.प्रकाशजी पवार हे होते. यांप्रसंगी साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. गोविंद भूतडा यांचा सत्कार करण्यात आला.तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक संघाच्या काटोल तालूक्याच्या अध्यक्ष स्थानी निवड झाल्याबद्दल प्रा.संगीता काकपुरे यांचाही सत्कार करण्यात आला.

सुरुवातीला बनारसीदास रुईया कनिष्ठ महाविद्यालच्या विद्यार्थीनी कस्तुरी मोतीराम तागडे, अनुष्का प्रशांत बोंदरे, वेदांती विजय मोहोड यांनी प्रभावी कविता सादर केल्या.

वैशाली बोरकर, डॉ.अनिल गवळी, माजी प्राचार्य श्री मधूकरराव दुधकवरे, पंकज येवले, प्रा.मानसी जोशी, डॉ.देवेन्द्र तातोडे, प्रा. योगराज लखमापूरे, कवीरत्न सुरेश राठोड, भोजराज चंदन, अनंतराव भोयर यांनी विविधांगी कवितांनी रसिकांची मने जिंकली.या कार्यक्रमाला काटोलचे रसिक बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार संचालन प्रा. अजय खडसे तर डॉ. देवेन्द्र तातोडे यांनी आभार मानले.

# सायबर गुन्हातून वेळीच सावधान व्हा : सारंग मिरासी

## महात्मा गांधी इंग्लिश मिडीयम शाळेत सायबर गुन्हा व ट्रॅफिक नियमांवर कार्यशाळा





■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २९ :

महात्मा गांधी इंग्लिश मिडीयम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, वानाडोंगरी या शाळेत आज दि. 28 सप्टेंबर 2024 ला सायबर गुन्हा व ट्रफिक नियमांवर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून शाळेचे प्राचार्य धर्मेंद्र पारशिवनीकर उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून हिंगणा एम.आय.डी.सी. चे पोलीस निरीक्षक, ट्रफिक इंचार्ज सारंग मिरासी, पी.एस.आय. प्रवीण पोहनकर,पी.एस.आय. राजू बावणे, शाळेच्या उप मुख्याध्यापिका दिपाली कोठे उपस्थित होत्या.

प्रमुख अतिथी सारंग मिरासी यांनी विद्यार्थी व शिक्षकांना सायबर गुन्ह्यापासून सावध कसे राहावे याबाबत मार्गदर्शन केले. मुलांनी मोबाईलचा वापर करू नये तसेच पालक व शिक्षकांनी सुद्धा सोशल मिडिया वापरतांनी मोबाइल मध्ये सेटिंग मध्ये बदल करून घ्यावा. गरज असल्यावरच मोबाईलचा वापर करावा. कोणत्याही अनोळखी च्या लिंक ला उघडू नये याचे दुष्परिणाम नंतर भोगावे लागतील असे त्यांनी सांगितले तसेच विद्यार्थांनी शाळेत येता-जाता ट्रफिक नियमांचे पालन करणे गरजेचे असल्याचे सांगितले. नियम आपल्या वडीलधाऱ्यांना सुद्धा पाळण्यास प्रवृत्त करावे जेणे करून रस्त्यावरील होणारे अपघात टाळता येईल असे सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन रुपाली शिर्के यांनी केले कार्यक्रमाच्या आयोजनार्थ रामचंद्र वाणी, प्रिया डाखळे, माधवी हिवरे, निकिता खेरडे, सुजाता मेश्राम, संध्या चवरे, सविता टापरे, प्रीती धमगाये, मंगला कठाने, माधुरी पवार, श्रद्धा इरातवार, शालिनी सहारे, नाजुका मैसकर, श्वेता ठाकूर, रुची पांडे, सविता पाटील, शालींनी सहारे, दीपिका नाटके, सोमेंद्र गौतम, दिलेश पिचोरे, उमेश लोणारे आदींनी सहकार्य केले.

# रक्तदान शिबिरात २२ रक्तदात्यांनी केले रक्तदान



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २९ :

बोरडा (सराखा) येथे एकता युवा गणेश मंडळ यांच्यावतीने गट ग्रामपंचायत कार्यालयाच्या परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी अनेकांनी उत्स्फूर्तपणे या रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमाला सहकार्य केले.

दरवर्षी प्रमाने बोरडा येथे मस्कऱ्या गणपतीची स्थापना गावातील मुख्य चौकात करण्यात आली. मंडळातील सदस्य दरवर्षीच काहींना काही स्तुत्य उपक्रम या अनुषंगाने राबवित असतात. याच हेतूने एकता युवा गणेश मंडळाच्या वतीने दि.२८ सप्टेंबर रोजी ग्रामपंचायत परिसरात अमन ब्लड सेंटर, नागपूर यांच्या उपस्थितीत रक्तदान शिबिर पार पडले. या समाजसेवी कायार्ला गावातील सरपंचासहित इतरही अनेक युवकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत २२ रक्तदात्यांनी इच्छुक रक्तदान केले.या सर्व कायार्मुळे बोरडा येथील तरुण युवकांची चर्चा परिसरात होतांना दिसून येत आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुरेंद्र डडमल, पराग गजबे, प्रमोद गजबे, नरेश चौधरी, अतुल गजबे, तुळशीदास राऊत, धीरज सोनवाने, पंकज गजबे, निकेश ठाकूर, आकाश लांजेवार यांचे विशेष सहयोग लाभले.

# एसटीत महिलांसाठी राखीव असलेल्या सीटवर बसतात पुरुष

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. २९ :

प्रवाशांच्या सेवेचे बिरुद घेऊन राज्याच्या कानाकोपऱ्यात दुर्मिळ अति दुर्मिळ भागात धावणाऱ्या एसटी बसला सध्या सुगीचे दिवस आले आहे. प्रत्येक बसमध्ये प्रवासी खच्चून भरलेले दिसून येतात. महिलांना एसटीमध्ये पन्नास टक्के सवलत असल्याने त्यांची संख्या जरा जास्तच वाढली आहे. अशा स्थितीत एसटी बसमध्ये ज्या जागा राखीव असतात त्यावर दुसरेच व्यक्ती बसलेली दिसतात. अशावेळी महिलांसाठी राखीव असलेल्या सीटवर पुरुष बसलेले दिसले आणि महिलांनी त्यांना हरकत घेतली तर त्याला उठवण्याचा अधिकार कोणाला? असा प्रश्न उपस्थित होतो.



*प्रवासी गावचा असो वा शहराचा एसटी प्रवास करणारा प्रत्येक जण याबाबतीत कमालीचा संवेदनशील दिसतो ही सीटः आमच्यासाठी राखीव आहे तिथे दुसराच बसला त्याला उठवा आणि आम्हाला बसू द्या अशी तक्रार कोणी करत नाही, उलट ज्या सीट राखीव नाही अशा ठिकाणी पुरुष बसून असला आणि एखादी वृद्ध व्यक्ती रुग्ण किंवा गर्भवती महिला उभी दिसली तर लगेच ती व्यक्ती स्वीट वरून उठून आपल्या जागी त्या व्यक्तीला बसवतो त्यामुळे एस टी मधील राखीव जागा संदर्भात वाद निर्माण होत नाही सर्व सलोख्याने चालते.*

हा विषय वादाचा नाही सारे कसे सामंजस्या पोटी चालते आमच्यासाठी राखीव सीट आहे आणि त्यावर दुसराच प्रवासी बसला आहे अशी तक्रार कोणी करत नाही चार सहा महिन्यात एखाद्यावेळी दिव्यांग्याच्या संबंधाने हा मुद्दा उपस्थित झाला तरी तेथे बसलेला प्रवासी लगेच ती सीट दिव्यांग प्रवाशाला उपलब्ध करून देतो, असे वाहक म्हणतात एसटी कोणत्याही ठिकाणी धावणारी असू दे अन कोणतीही बस असू देत जागा राखीव असल्याचे त्या सीटच्या बाजूला स्पष्ट लिहून असते.

मात्र ज्या व्यक्तीसाठी किंवा घटकासाठी ती सीट राखीव असते त्या सीटवर तिच्या ऐवजी दुसरीच व्यक्ती बसून दिसते अर्थात ज्येष्ठ नागरिकांसाठी राखीव असलेल्या सीटवर एखादी युवती किंवा तरुण बसून दिसते तर महिलांसाठी राखीव असलेल्या सीटवर एखादा पुरुष बसलेला दिसतो. बस मध्ये महिलांची गर्दी वाढली. सरसकट अर्ध्या तिकीटची प्रवास सवलात मिळाल्याने एसटी बस मध्ये प्रवाशांची गर्दी मोठी वाढली आहे. एखाद्या कुटुंबातील महिला सवलत असल्याने बस मधून प्रवास करेल आणि सवलत नसले म्हणून तिच्या कुटुंबातील व्यक्ती दुसऱ्या साधनाने प्रवास करेल असे होत नाही. त्यामुळे महिला सोबतच्या तिच्या कुटुंबातील व्यक्ती ही तिच्या सोबतच प्रवास करतात परिणामी एसटी सध्या फुल्ल होऊन धावत असल्याचे दिसून येते.

एसटीत जी सीट महिलांसाठी अथवा दुसऱ्या व्यक्तीसाठी राखीव आहे त्या सीटवर दुसरा कोणी व्यक्ती बसला असेल तर त्याला उठविण्याचा अधिकार त्या बस मध्ये कर्तव्यावर असलेल्या वाहकाला आहे.

अर्थात अशी वेळ येत नाही हा प्रश्न वेगळा आमच्या सीटवर कोणी बसला म्हणून त्याला उठून देणे तेथे आपण बसणे हा प्रकार अशोभनीय वाटतो तशीही बसमध्ये भरपूर जागा असते त्यामुळे राखीव जागेचा मुद्दा कधी वादग्रस्त ठरत नाही, असा असा महिलांचा मतप्रवाह आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




# कॅलिडोस्कोप

## बॉसला जीवदान, काढले नोकरीवरून

चांगुलपणाला किंमत नसते, अशी एक म्हण आहे. एका महिलेने दयाळूपणा दाखवून आपल्या बॉसला मदत करण्याचा प्रयत्न केला; परंतु बॉसने तिची फसवणूक केली. महिलेने किडनी दान करून तिच्या बॉसचा जीव वाचवला होता; पण त्या बदल्यात बॉसने महिलेला दिलेली वागणूक खरंच धक्कादायक होती. किडनी घेतल्यानंतर बॉसने महिलेला नोकरीवरून काढले.

दोन मुलांची घटस्फोटित आई असलेल्या ४७ वर्षीय डेबी स्टीव्हन्सने न्यूयॉर्क राज्य मानवाधिकार आयोगाकडे औपचारिक तक्रार दाखल केली आणि आरोप केला, की तिच्या बॉसने तिचा तिचा वापर केला आणि नंतर तिला काढून टाकले. स्टीव्हन्सचे बॉस जॅकी ब्रुशिया अटलांटिक ऑटोमोटिव्ह ग्रुपच्या वेस्ट इस्लिप कंट्रोलर्सपैकी एक आहेत. ते अब्ज डॉलर्सचे डीलरशिप ऑपरेटर आहेत. ब्रुशियाने जानेवारी २००९ मध्ये स्टीव्हन्सला सहाय्यक म्हणून नियुक्त केले. स्टीव्हन्सने सांगितले, की किडनीच्या शस्त्रक्रियेनंतर त्याने माझ्याशी अत्यंत भयानक, क्रूर आणि अमानवीय पद्धतीने वागण्यास सुरुवात केली. असे वाटले, की त्याने मला फक्त माझी किडनी घेण्यासाठी कामावर ठेवले होते. स्टीव्हन्सची किडनी ब्रुशियासाठी योग्य नसली, तरी अवयव एका अनोळखी व्यक्तीला दान केले. जेणेकरून ती अवयव दात्यांच्या यादीत येऊ शकेल.



## जोडी जमली अनोखी!

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असं म्हणतात. म्हणूनच आपला जोडीदार कसा आणि कुठे सापडेल याचा नेम नसतो. इतकंच नाही, तर प्रत्येकासाठी सुयोग्य असा जोडीदार जगाच्या पाठीवर कुठे ना कुठे असतोच. गरज असते ती त्याची भेट होण्याची.

आता धनेश आणि चेतना यांचंच उदाहरण घ्या. हे दोघे उंचीने अगदी कमी. त्यांची उंची फक्त ३६ इंच. मध्य प्रदेशमधल्या पुनासामध्ये राहणाऱ्या धनेशचं लग्न चेतनासोबत झालं. त्यांच्या लग्नाची गोष्टही रंजक आहे. चेतना बडवानी जिल्ह्यातल्या मडवाणाची. मडवाणातून एक माणूस पुनासातल्या आपल्या मित्राला भेटायला आला होता. त्यावेळी त्याची नजर धनेशवर पडली. धनेशची उंची बघून त्याला आपल्या गावातल्या चेतनाची आठवण आली. या दोघांची जोडी शोभून दिसेल असं वाटल्याने त्याने याबाबत मित्राला सांगितलं. बोलणी झाली आणि अवघ्या काही दिवसातच त्यांचं लग्न उरकलं.

३६ वर्षांचा धनेश लग्नासाठी मुली शोधत होता. मात्र उंचीमुळे त्याला कोणीही पसंत करत नव्हतं. एवढी बुटकी मुलगीही त्याला मिळत नव्हती. धनेशने हिंदीमध्ये एमए केलं असून बीएड आणि पीजीडीसीएचा अभ्यासक्रमपूर्ण केला आहे. त्याला शिक्षण क्षेत्रात काम करायचं आहे. चेतनाने अर्थशास्त्रात एमए केलं असून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनमध्ये प्रशिक्षक म्हणून काम करते. या दोघांच्या बाबतीत 'रब ने बना दी जोडी' असंच म्हणावं लागेल.



## गरीब देश झाला जगातील श्रीमंत देश!

दरवर्षी लाखो पर्यटकांना परदेशात भेट द्यायला आवडते. यामध्ये सिंगापूरचे नाव आघाडीवर आहे. भारतीय केवळ प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी सिंगापूरला जात नाहीत, तर नोकरी आणि व्यवसायाच्या शोधातही जातात. संपूर्ण जगाला आकर्षित करणारा सिंगापूर एकेकाळी खूप गरीब देश होता. सध्या त्या देशाने विकासाच्या क्षेत्रात इतकी मोठी भरारी घेतली आहे, की श्रीमंतांच्या यादीतही तो देश आघाडीवर आहे. त्या देशात श्रीमंत नागरिकांची संख्याही भलीमोठी आहे.

१९६३ मध्ये सिंगापूर स्वतंत्र झाला, तेव्हा तेथे खूप गरिबी होती. इतर आशियाई देशांप्रमाणे सिंगापूरही दीर्घकाळ ब्रिटनची वसाहत होती; पण सिंगापूर हा स्वतंत्र देश झाल्यावर त्याने आपल्या देशाला विकासाकडे वेगाने नेले. सिंगापूरच्या उत्कर्षाचे श्रेय पहिले पंतप्रधान ली कुआन यू यांना दिले जाते. आता सिंगापूरची गणना श्रीमंत देशांमध्ये होत आहे. जिथे प्रत्येक सहावे कुटुंब करोडपती आहे. दरडोई जीडीपीच्या बाबतीत ब्रिटन, फ्रान्स आणि अगदी अमेरिकेसारख्या महासत्तांपेक्षाही पुढे आहे. २०३० पर्यंत या देशात जगातील सर्वाधिक करोडपती असतील असा अंदाज आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीसह सिंगापूरनेही विकासाच्या दिशेने वाटचाल केली आहे. पहिल्या दोन दशकांमध्ये सिंगापूरची अर्थव्यवस्था दरवर्षी सुमारे १० टक्के दराने वाढली. पूर्वी सिंगापूर मसाले, कथिल आणि रबरचा व्यापार करत असे. नंतर ते औषधी उत्पादनातही व्यवसाय करू लागले. १९७५ पर्यंत सिंगापूरने एक मोठा औद्योगिक तळ स्थापन केला होता. १९६५ मध्ये जीडीपीमध्ये उत्पादनाचा हिस्सा चौदा टक्क्यांवरून २२ टक्क्यांपर्यंत वाढला.

आज सिंगापूरमधील बहुतेक लोक श्रीमंत आहेत. सिंगापूर सरकारच्या मते, २०२३ पर्यंत सिंगापूरमध्ये स्वतःचे घर खरेदी करणाऱ्या लोकांची टक्केवारी १०० पैकी ८९.७ आहे. लवकरच हा आकडा १०० टक्क्यांपर्यंत पोहोचेल आणि काही वर्षांत येथे कोट्यधीशांची संख्याही इतर देशांच्या तुलनेत सर्वाधिक असेल.



## प्रेमाचा स्पॅनिश मार्ग!

स्पेनच्या लोकांनी त्यांचे प्रेम मिळवण्यासाठी एक वेगळा मार्ग शोधला आहे. त्यासाठी अननस त्यांना मदत करत आहे. लोकांच्या जिभेचे चोचले पुरवणारे हे फळ आता लोकांचे प्रेमही पूर्ण करू लागले आहे. स्पेनचे लोक अननसाच्या माध्यमातून आपल्या प्रेयसीचा शोध घेत आहेत. याचे कारण खूप मनोरंजक आहे. स्पेनमधील एका सुपरमार्केटमध्ये लोक अननस विकत घेत आहेत आणि ते त्यांच्या गाड्यांमध्ये उलटे ठेवत आहेत. अननस उलटे करून ठेवलेल्या गाडीचा मालक जीवनसाथी शोधत असल्याचे कळते. हा ट्रेंड पहिल्यांदा टिकटॉकवर व्हायरल झाला. त्याने अनेक तरुणांचे लक्ष वेधले. यामुळे स्पेनच्या मर्सिडोना सुपर मार्केटमध्ये अननसाची विक्री वाढली आहे. लोकांना या सुपरमार्केटमध्ये खरेदी केल्यानंतर दारूच्या दुकानात जाण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे, जेणेकरून सुपरमार्केटमध्ये भेटलेल्या जोडीदारांना एकमेकांना शोधण्यासाठी आजूबाजूला पहावे लागणार नाही. ट्रॉलीमध्ये सामान ठेवल्यानंतर, आपल्या प्रेयसीच्या शोधात असलेले लोक एकमेकांच्या ट्रॉलीची देवाणघेवाण करतात. टक्कर देणारे साथीदार म्हणून निवडले जातात. ट्रॉलीमध्ये गुसबंप चॉकलेट किंवा मिठाई असेल तर नाते दीर्घकाळ टिकते. सुपरमार्केटमध्ये येणारे लोक त्यांच्या ट्रॉलीमध्ये अननसाऐवजी गोड पदार्थ ठेवू शकतात. याचा अर्थ असा की, आपल्या ट्रॉलीमध्ये अननसाऐवजी मिठाई किंवा चॉकलेट ठेवणारे लोक दीर्घकालीन जीवनसाथी शोधत आहेत आणि त्यांना आयुष्यभर त्यांच्यासोबत राहायचे आहे.




## ७६ लाखांची नोकरी जाऊनही आनंदी!

डेलॉईट कंपनीने कर्मचाऱ्यांना मोठा दणका दिला आहे. अनेक कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्यात आले आहे. या कंपनीतून एका २४ वर्षीय तरुणीला काढून टाकण्यात आले. या तरुणीला वर्षाला ७६ लाखांचा पगार होता; मात्र एवढी मोठी नोकरी जाऊनदेखील ती तरुणी आनंदी आहे. सिएरा देसमराड्डी असे या तरुणीचे नाव आहे. एका मोठ्या बहुराष्ट्रीय कंपनीत महिन्याला लाखो पगाराची नोकरी मिळवणे हा बहुतेक लोकांसाठी 'ड्रीम जॉब' असतो. प्रत्येकाला अशी नोकरी मिळू शकत नाही. अशी नोकरी मिळणारे लोक आधी नोकरी ही सिएरासाठी स्वप्नवत नोकरी नव्हती. तिला त्या बदल्यात ९० हजार डॉलर्स म्हणजेच भारतीय चलनानुसार अंदाजे ७६ लाख रुपये मिळत होते. नोकरी गेल्यानंतर सिएरा खूप आनंदी आहे. कारण डेलॉइटची वेगवान कार्यपद्धतीमध्ये मला फारसा रस नव्हता. मला असे वाटायचे, की माझ्या सहकाऱ्यांशी जुळण्यासाठी मला व्यक्तिमत्वात बदल करावा लागेल. त्यामुळे या कामावरून मला कमी केले, ही चांगली गोष्ट असल्याचे तिने सांगितले.

सिएरा ही अल्प उत्पन्न कुटुंबातील आहे. डेलॉइटमधील सर्व सहकारी सूट, जॅकेट आणि



काम मिळवण्यासाठी आणि नंतर टिकवण्यासाठी मेहनत करतात. तुम्हाला अशी नोकरी मिळाली आणि नंतर कंपनीने तुम्हाला काढून टाकले तर तुम्हाला नक्कीच दुःख होईल. सिएरा देसमराड्डी नावाच्या २४ वर्षांच्या तरुणीला अशीच मोठ्या पगाराची नोकरी मिळाली होती. तिला वर्षाला ७६ लाख रुपये पगार मिळत होता; मात्र एके दिवशी अचानक 'एचआर'ने तिला सांगितले, की तिची नोकरी गेली आहे. ही गोष्ट एकूण सिएरा खूप आनंदी झाली. ती म्हणाली की, आयुष्यात यापेक्षा चांगले काहीच घडले नसते. सिएरा टॉप ग्लोबल कन्सल्टिंग फर्म 'डेलॉइट'मध्ये विश्लेषक म्हणून काम करत होती. तिचे कार्यालय अमेरिकेतील शिकागो शहरात होते. डेलॉइटमधील डिझायनर ड्रेसमध्ये यायचे. ही जागा आपल्यासाठी नाही असे तिला वाटत होते. तिथे ११-११ तास काम करावे लागत होते. कार्यसंस्कृती आणि दबावामुळे ती मानसिकरित्या आणि शारीरिकरित्या खचू लागली. दरम्यान, नोकरीतून काढून टाकल्यानंतर सिएराने सांगितले, की मला तणावपूर्ण कार्यसंस्कृतीपासून दिलासा मिळाला आहे. आता पुढे मला काही काळ संघर्ष करावा लागेल. नवीन नोकरी शोधण्यासाठी तिला दोन महिने लागले. आता ती अमेरिकेमध्ये क्युरियल विश्लेषक म्हणून काम करत आहे. ती घरातूनच काम करते. या काममुळे ती आता काम आणि आयुष्य यात समतोल साधत आहे.



## नकोत नुसत्या भिंती!

आपल्याकडे वाढत्या उन्हामुळे जीवाची काहिली होत असताना अशा निसर्गसुंदर ठिकाणी चार दिवस राहायला मिळालं तर किती मजा येईल नाही? एका बाजूला डोंगर, दुसऱ्या बाजूला अथांग पाणी आणि सर्वत्र डोळ्यांना सुखावणारी हिरवळ. मग निघताय ना पर्यटनाला?

## सामानाची घरवापसी

अमेरिकेतल्या 'न्यू ओरलेंस'मधल्या 'रुजवेल्ट हॉटेल'ला १२५ वर्षं पूर्ण झाल्यामुळे हॉटेल व्यवस्थापनाने हा क्षण अनोख्या पद्धतीने साजरा करण्याचे ठरवले. या हॉटेलमध्ये आलेल्या ग्राहकांनी चोरून नेलेले सामान परत आणून देण्याचा प्रस्ताव त्यांनी ठेवला. हे सामान परत आणून देणाऱ्या ग्राहकांना कोणताही जाब विचारला जाणार नाही की पोलिसात तक्रारही केली जाणार नाही. उलट, सर्वात महाग सामान परत देणाऱ्या व्यक्तीला हॉटेलच्या सर्वात महागड्या खोलीत राहण्याची संधी देण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. या खोलीचे एका दिवसाचे भाडे भारतीय चलनात तब्बल १५,००० डॉलर म्हणजे दीड लाख रुपयांपेक्षाही जास्त आहे.

गेल्या १२५ वर्षांमध्ये हॉटेलमध्ये लाखों लोक राहून गेले. काही लोकांना हॉटेलची सेवा आवडली तर काहींना इथलं सामान. हॉटेलमधलं बरंच सामान चोरीला गेलं. ते सामान परत मिळवण्यासाठी त्यांनी या संधीचा फायदा घेतला. या निमित्ताने जुन्या पाहुण्यांना भेटायची संधी मिळेल, असे हॉटेल व्यवस्थापनाला वाटले. हॉटेलच्या प्रस्तावाला ग्राहकांकडून खूप चांगला प्रतिसाद मिळताना दिसला. परिणामस्वरूप लोकांनी चमचे, प्लेट्स, बाथरूममधून चोरलेलं सामान परत आणून दिले.

आत्तापर्यंत बारमधले टेबल ही सर्वात महागडी वस्तू हॉटेलला परत मिळाली आहे. हॉटेलमधून टेबल गायब केलं जाऊ शकतं यावर हॉटेल व्यवस्थापनाचा अजूनही विश्वास बसलेला नाही. त्यातच एका ग्राहकाने हॉटेलसमोर बसवण्यात आलेला एक पुतळा परत दिला. त्यामुळे इथून कोणतीही वस्तू गायब होऊ शकते. यावर हॉटेल व्यवस्थापनाचा विश्वास बसला.




## रोमँटिक पर्यटनस्थळ

लंडनमधल्या 'डॉयडेन' किल्ल्यात एके काळी बरेच गैरप्रकार होत असत. इथे दारूड्यांचाही बराच राबता असायचा. एकोणिसाव्या शतकापर्यंत इथे अशीच परिस्थिती पहायला मिळत असे. पण हे स्थळ आता लंडनमधील सर्वात रोमँटिक पर्यटनस्थळ बनून गेलं आहे. विशेष म्हणजे इथे फोन आणि इंटरनेटची कोणतीही सुविधा नाही. असं असूनही लोक इथे मोठ्या संख्येने येतात. हा किल्ला लंडनच्या 'कॉर्नवॉल' भागात वसला आहे. १९६५ मध्ये 'नॅशनल ट्रस्ट'ने तो खरेदी केला. त्यानंतर याचं रुपांतर प्रेमी युगुलांसाठीच्या पर्यटनस्थळात करण्यात आलं. 'डॉयडेन' किल्ला ४० एकर परिसरात पसरला आहे. लपण्याचं गुप्त ठिकाण म्हणून याची निर्मिती करण्यात आली होती. त्यावेळी इथे वीज आणि स्वच्छतागृहासारख्या सोयीही नव्हत्या. या किल्ल्यात एका वेळी फक्त एकच जोडपं राहू शकतं. दोन रात्रींच्या मुक्कामासाठी तुम्हाला जवळपास ४३ हजार रुपये खर्च करावे लागतील तर आठवडाभर राहण्यासाठी तब्बल दीड लाख रुपये द्यावे लागतील. पर्यटनाच्या माध्यमातून मिळणारी रक्कम किल्ल्याच्या डागडुजीसाठी खर्च केली जाते. या परिसरातलं निसर्गसौंदर्य पर्यटकांना आकर्षित करतं. म्हणूनच प्रेमी युगुलं काही काळ एकत्र घालवण्यासाठी या ठिकाणाला पसंती देतात.



# मतदारसंघाचा सर्वांगीण विकास हाच केंद्रबिंदू: आ.राजेशजी एकडे

## नांदुरा तालुक्यात ११५ कोटी ६३ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नांदुरा, २९ :



गेल्या अनेक दशकांपासून मलकापूर विधानसभा मतदारसंघाला विकासाच्या मागासलेपणाचे गालबोट लागले होते,मात्र मतदारसंघाचा सर्वांगीण विकास हाच केंद्रबिंदू मी मानत असल्याने मतदारांच्या बुलंद हौसल्यातून विकासाची गंगा आज मतदारसंघात वाहत आहे, याचे सर्वाधिक समाधान मिळत असल्याचे प्रतिपादन आ.राजेश एकडे यांनी दि. सप्टेंबर रोजी नांदुरा तालुक्यातील चांदुरबिस्वा व निमगाव जिल्हा परिषद सर्कलमधील कोटी लाख रुपयांच्या विविध विकासकामांच्या भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्यानिमित्त केले.त्यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी,कार्यकर्ते व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मलकापूर विधानसभा मतदारसंघात गेल्या चार पाच वर्षांपासून विकासाचे मागासलेपण कुठेतरी दूर होत असल्याचे सामान्य नागरिकांना जाणवत आहे.या काळात जिगाव सिंचन प्रकल्पाला वेळोवेळी निधी खेचून आणण्यात आ.राजेश एकडे यशस्वी झाले असून त्यात अंतर्गत भूसंपादन,पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागला आहे,प्रकल्पग्रस्तांना मोबदला मिळण्याची अडचण दूर झाला आहे.ग्रामीण भागात नद्यांवर द्वारयुक्त बंधारे झाल्याने मतदारसंघाला सिंचनाची जोड मिळाल्याने शेतकरी समृद्ध झाला आहे,पिण्याचे पाणी,पांधन रस्ते,गावाला जोडणारे रस्ते,अंतर्गत गावातील रस्ते झाल्याने मतदारसंघाला विकासाची चालना मिळाली आहे,यासाठी नुकताच ११५ कोटी ६३ लाख रुपयाचा निधी आ.एकडे यांनी उपलब्ध केला असून त्या विकास कामांचे भूमिपूजन त्या त्या गावच्या सरपंच यांचे अध्यक्षतेखाली दि.२९ रोजी या सर्व कामांचे भूमिपूजन व लोकार्पण सोहळा संपन्न झाला.त्यावेळी मा.जि.प सदस्य संतोषराव पाटील, कृ उ.बा स.चे मा. मुख्य प्रशासक पदमराव पाटील,उबाठा शिवसेना जिल्हा प्रमुख वसंतराव भोजने, राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष मोहन पाटील, कृ.उ.बा.स.सभापती भगवान धांडे,निलेश पाऊलझगडे, रा कॉं तालुका अध्यक्ष संजय चोपडे,शिवसेना तालुका प्रमुख ईश्वर पांडव,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सर्वश्री विलासराव पाटील,पुरुषोत्तम झालटे,गौरव पाटील,भानुदास तीतरे,तालुका कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष आकाश वतपाळ, मा.पं.स.सदस्य प्रसाद पाटील, मा उपसभापती गजानन गव्हाळे,ओबीसी सेलचे शंकर बोदडे,नारायण कांडेलकर,नारायण झालटे व इतर अनेक महाविकास आघाडीचे पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भूमिपूजन व लोकार्पण झालेल्या एकूण ११५ कोटी ६३ लाख रुपयात या गावातील विकासकामांचा समावेश

चांदुरबिस्वा येथील पुल वजा सिमेंट बंधारा १ कोटी ८० लक्ष, मंडळ अधिकारी कार्यालय ३० लक्ष, खेर्डा पोच रस्ता हिंगणे गव्हाळ ते मोमिनाबाद जोडणाऱ्या रस्त्यावर मोरी बांधकाम लक्ष,तीन व्यायाम शाळांना जिमचे वाटप करणे २१ लक्ष रुपये,नाभिक समाज वस्तीमध्ये सभामंडप बांधकाम करणे १० लक्ष रुपये,सोनवणे यांच्या घरापासून आंबेडकर नगर पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे ५ लक्ष रुपये, अंतर्गत कॉंक्रिटकरण रस्ता करणे लक्ष रुपये,ग्रामपंचायत अंतर्गत रस्ता करणे लक्ष रुपये, चांदुरा विसावा अंतर्गत रस्ता बांधकाम करणे ५ लक्ष रुपये, हींगणे गव्हाळ पुनर्वसित गावठाण पुराव्यांच्या नागरी सुविधांचे काम ४४ कोटी रुपये,तेथेच धनगर वस्तीत सभा मंडपाचे काम करणे १५ लक्ष रुपये, हिंगणे गव्हाळ कॉंक्रिट रस्त्याचे बांधकाम १ कोटी १९ लक्ष रुपये, टाकळी वतपाळ गावाच्या नवीन गावठाणा करीता पोच रस्त्याचे बांधकाम करणे ५ कोटी ७६ लाख रुपये व नवीन गावठाण करीता पिण्याचे पाणी पुरवठा योजनेकरीता इंटेक वॉल काम करणे ६६ लक्ष रुपये,वडगाव दिघी वडोदा सावरगाव नेहू रस्त्याला जोडणारा रस्ता ४० लक्ष रुपये,सावरगाव नेहु अंतर्गत रस्ता बांधकाम करणे १० लक्ष रुपये, प्रजिमा सात,मोमिनाबाद,सावरगाव, इसरखेड,खेडगाव रस्त्याचे बांधकाम करणे ४ कोटी ३० लाख रुपये, मामुलवाडी नवीन गावठाण पाण्याचा निचरा करण्याकरिता गटार व अनुषक्ती काम करणे ७ कोटी ९२ लाख, मामुलवाडी, पातोडा कोदरखेड पूर्ण वस्ती गावामध्ये पाणीपुरवठ्याची कामे करणे ६८ लक्ष, पातोंडा, दहिगाव माटोडा पोच रस्ता व नाली बांधकाम १२ कोटी ५० लाख, पातोंडा अलमपूर येरळी ते इसबपुर रस्ता सुधारणा ५ लक्ष रुपये, कोदरखेड गावाच्या पुनर्वसन अंतर्गत नवीन गावठाण नागरी सुविधा २ कोटी ८२ लक्ष, पातोंडा मामुलवडी कोदरखेड गावाच्या सांडपाणी नाली काम २ कोटी ५ लक्ष रुपये, पलसोडा नवीन गावाच्या नवीन गावठाणाच्या पोच रस्त्याचे बांधकाम ३ कोटी लाख,पलसोडा नवीन गावठाण गटार व अनुषंगिक काम ३ कोटी ५० लाख, पलसोडा ते प्रजीमा ला जोडणारा रस्ता सुधारणा करणे ३ लक्ष, जीगाव नवीन गावठाण मुख्य पोच रस्ता डांबरीकरण ४ कोटी ४२ लाख, जिगाव पिण्याच्या पाण्याचा पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणे २ कोटी ४१ लाख,दिघी अंतर्गत रस्ता बांधकाम लाख, सिरसोडी वडोदा रस्त्यावर मोरी बांधकाम ३ लक्ष रुपये, विटाली येथे अंतर्गत रस्ता बांधकाम १० लक्ष, डॉ बाबासाहेब आंबेडकर सामजिक विकास योजनेअंतर्गत स्मशानभूमी बांधकाम १५ लक्ष रुपये,धानोरा काटी रस्ता ते परमेश्वर ठाकरे यांच्याशेतापर्यंत रस्ता २० लक्ष,धानोरा येथील गिरणी क्षेत्र रस्ता ५ लक्ष रुपये,धानोरा अंतर्गत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट करणे ५ लक्ष,धानोरा अंतर्गत रस्ता बांधकाम करणे जणसुविधा ८ लक्ष,धानोरा ग्रामपंचायत अतिक्रमण होऊ नये यासाठी संरक्षण भिंत ३० लक्ष,तलाठी कार्यालयाचे बांधकाम २४ लक्ष रुपये,काटी अंतर्गत रस्त्याचे बांधकाम १० लक्ष,भवानी माता मंदिरासमोर सभामंडप १० लक्ष,शाळा खोलीचे बांधकाम १० लक्ष,अंतर्गत रस्ता बांधकाम करणे जनसुविधा लक्ष रुपये,खातखेड द्वार युक्त सिमेंट बंधारा बांधकाम करणे ४ कोटी ५० लाख, भुई शिंगा येथे द्वार युक्त सिमेंट बंधारा बांधकाम करणे ४ कोटी ५० लाख, नारखेड येथे द्वार युक्त सिमेंट बंधारा बांधकाम करणे ४ कोटी ५० रुपये.

# ६१ रेल्वेगाड्या रद्द




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

तेलंगणामधील सिकंदराबाद विभागात काझीपेठ - बल्लारशाह दरम्यान रेल्वेमागार्चे काम करण्याकरिता हसनपर्थी स्थानकावर नॉन इंटरलॉकिंग करण्यात येत आहे. त्यामुळे बल्लारपूर, नागपूरमार्गे धावणाऱ्या ६१ रेल्वे रद्द करण्यात येणार असून आठ रेल्वेगाड्यांच्या मार्गात बदल करण्यात येत आहे.

भद्राचालम रोड ते बल्लारपूर एक्सप्रेस व बल्लारपूर ते भद्राचालम एक्सप्रेस (२६ सप्टेंबर ते ८ नोव्हेंबर), यशवंतपूर-जबलपूर एक्सप्रेस व जबलपूर-यशवंतपूर एक्सप्रेस (२९ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर), यशवंतपूर-कोरबा एक्सप्रेस (२७ सप्टेंबर, १ व ४ ऑक्टोबर), कोरबा-यशवंतपूर एक्सप्रेस (२९ सप्टेंबर, ३ व ६ ऑक्टोबर), गोरखपूर-कोचुवेली एक्सप्रेस (२२, २६, २७, २९ सप्टेंबर आणि ३ व ४ ऑक्टोबर), कोचुवेली-गोरखपूर एक्सप्रेस (२४, २५, २९ सप्टेंबर आणि १, २ व ६ ऑक्टोबर), सिकंदराबाद-रौक्सल एक्सप्रेस (२३ सप्टेंबर, ३० ऑक्टोबर), रौक्सेल- सिकंदराबाद एक्सप्रेस (२६ सप्टेंबर, ३ ऑक्टोबर), सिकंदराबाद-दानापूर (२६ सप्टेंबर, ३ ऑक्टोबर), दानापूर-सिकंदराबाद एक्सप्रेस (२७ सप्टेंबार,४ऑक्टोबार), सिकंदराबाद- हजरत निझामुद्दीन एक्सप्रेस (२९ सप्टेंबर), हजरत निझामुद्दीन एक्सप्रेस-सिकंदराबाद एक्सप्रेस (१ ऑक्टोबर), बरौनी जंक्शनएनार्कुलम जंक्शन एक्सप्रेस (३० सप्टेंबर), एनार्कुलम जंक्शन - बरौनी जंक्शन एक्सप्रेस (४ ऑक्टोंबर), त्रिवेंद्रम सेंट्रल - हजरत निजामुद्दीन एक्स्प्रेस (१ऑक्टोबर), हजरत निजामुद्दीन जंक्शन- त्रिवेंद्रम सेंट्रल एक्सप्रेस (४ ऑक्टोबर), एनार्कुलम जंक्शन--हजरत निजामुद्दीन एक्स्प्रेस (५ ऑक्टोबर), हजरत निजामुद्दीन-एनार्कुलम जंक्शन एक्सप्रेस (१ व १० ऑक्टोबर), कोईम्बतूर जंक्शन- हजरत निजामुद्दीन एक्स्प्रेस (२९ सप्टेंबर, ६ ऑक्टोबर), हजरत निजामुद्दीन - कोईम्बतूर जंक्शन एक्सप्रेस (२ व १० ऑक्टोबर), चेन्नई सेंट्रल - श्री माता वैष्णो देवी, कटरा एक्सप्रेस (२९ सप्टेंबर, २ ऑक्टोबर), श्री माता वैष्णो देवी, कटरा-चेन्नई सेंट्रल एक्सप्रेस (४ व ५ ऑक्टोबर), श्री माता वैष्णो देवी, कटरा - कन्निया कुमारी एक्सप्रेस (३० सप्टेंबर), पुणे - काझीपेठ जंक्शन एक्सप्रेस (४ ऑक्टोबर), काझीपेठ जंक्शन - पुणे एक्सप्रेस (६ ऑक्टोबर), इंदूर जंक्शन - कोचुवेली एक्सप्रेस (३० सप्टेंबर),कोरबा-कोचुवेली एक्सप्रेस (२,५ ऑक्टोंबर) कोचुवेली - कोरबा एक्सप्रेस (३० सप्टेंबर, ३ ऑक्टोबर), हजरत निजाम-उद्दीन जंक्शन-सिकंदराबाद एक्सप्रेस (२९ सप्टेंबर), सिकंदराबाद - हजरत निजामुद्दीनएक्स्प्रेस(२ ऑक्टोबर), मदुराई- जबलपूर एक्सप्रेस (५ ऑक्टोबर), जबलपूर - मदुराई एक्सप्रेस (३ ऑक्टोबर), दानापूर -बेंगळुरू (४ ऑक्टोबर), बेंगळुरू- दानापूर (२९ सप्टेंबर,६ ऑक्टोबर), मुझफ्फरपूर-सिकंदराबाद(१ऑक्टोबर), सिकंदराबाद -मुझफ्फरपूर (३ ऑक्टोबर), क्रांतीविरा सांगोली रायण्णा - दानापूर एक्सप्रेस (३० सप्टेंबर),दानापूर-क्रांतीविरा सांगोली रायण्णा एक्सप्रेस (३ऑक्टोबर) अशा ६१ रेल्वेगाड्या रद्द करण्यात येत आहेत.

# विधानसभा निवडणूक प्रक्रिया २६ नोव्हेंबरपूर्वी पूर्ण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :

एकाच ठिकाणी तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केलेल्या किंवा मूळ जिल्ह्यात निवडणूक कामाशी संबंधित पदावर असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्यांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारला सोमवारपर्यंत मुदत दिली आहे. निवडणूक आयोगाच्या कोणत्याही नियमाला बगल दिली जाणार नाही किंवा कोणाचाही अपवाद करता येणार नाही, असे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषदेत शनिवारी येथे सांगितले.

नियमानुसार आवश्यक असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असल्याबाबत मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांचा अहवाल अद्याप आयोगाकडे नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपत असून त्यापूर्वी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रत्येक मतदान केंद्रावर झालेल्या मतदानाची आकडेवारी उमेदवारांच्या निवडणूक प्रतिनिधींना दिली जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

राजीव कुमार, निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि सुखविंदरसिंग संधू यांनी दोन दिवसात राजकीय पक्ष, मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालक, विभागीय आयुक्त, महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि निवडणूक अधिकारी यांच्या बैठका घेऊन विधानसभा निवडणूक तयारीचा आढावा घेतला.

आयोगाच्या निकषांनुसार कार्यकाळ पूर्ण केलेल्या किंवा मूळ जिल्ह्यांमध्ये नियुक्ती असलेल्या निवडणूक कामांशी संबंधित अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे आदेश ऑगस्टमध्ये देवूनही आणि स्मरणपत्रे पाठवूनही त्याचे पालन न झाल्याबद्दल आयोगाने मुख्य सचिव, पोलीस महासंचालकांकडे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. यासंदर्भात पत्रकारपरिषदेत विचारले असता राजीव कुमार म्हणाले, एकाच पदावरील तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झालेले अधिकारी, सेवानिवृत्त अधिकाऱ्याला देण्यात आलेली मुदतवाढ किंवा कंत्राटी नियुक्ती, मूळ गाव असलेल्या जिल्ह्यात नियुक्त असलेले अधिकारी आदींबाबत निवडणूक आयोगाचे नियम स्वयंस्पष्ट आहेत. त्यांचे काटेकोरपणे पालन केले जाईल आणि कोणाचाही अपवाद केला जाणार नाही.

मतदान दिवाळी, देवदिवाळी, छटपूजा काळात आणि आठवड्याच्या शेवटी न घेता मंगळवार, बुधवार, गुरुवारी घ्यावे, अशी मागणी राजकीय पक्षांनी केली आहे. निवडणूक एकाच टप्प्यात घेण्याची मागणी काही राजकीय पक्षांनी केली असल्याबाबत आयोगाने दुजोरा दिला. लोकसभा निवडणुकीच्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रचारासाठी गेले असताना यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी करण्यात आली नाही व पैशांच्या बॅगा नेण्यात आल्याचा आरोप झाला होता. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या दोन्ही गटांना निवडणूक चिन्हे देण्यात आली असून आयोगाने आधीच आदेश जारी केले आहेत व हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. राज्याच्या सीमांवर तपासणी नाके उभारून दारू, अमली पदार्थ व पैशांची रोखण्यात यावी, असे आदेश सीमाशुल्क, अबकारी, पोलीस आणि अन्य यंत्रणांना देण्यात आले आहेत.

# वीज वाहक तारेचा धक्का लागून तिघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
सांगली, दि. २९ :

वैरण आणण्यासाठी शेतात गेलेल्या एकाच कुटुंबातील तिघांचा तुटून पडलेल्या वीज वाहक तारेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची घटना रविवारी सकाळी म्हैसाळ (ता. मिरज) येथे घडली. तर या दुर्घटनेत एका मुलाची प्रकृती अत्यवस्थ असून त्याच्यावर वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. मृत तिघांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाखांची मदत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन देण्यात येईल असे पालकमंत्री सुरेश खाडे यांनी जाहीर केले. म्हैसाळ येथील सुतारकी मळा भागात असलेल्या वनमोरे मळ्यात पारसनाथ वनमोरे (वय ४०) आणि मुलगा शाहीराज वनमोरे (वय १५) हे दोघेजण आज सकाळी जनावरांना वैरण काढण्यासाठी गेले होते. यावेळी रानात अतिउच्च दाब वाहिनीची तार तुटून पडली होती. त्याला दोघांचा स्पर्श झाल्याने ते तारेला चिकटून बसले. अपघात घडल्याचे लक्षात येताच प्रदीप श्रीकृष्ण वनमोरे (३५) व त्यांचा मुलगा हेमंत वनमोरे (१२) या दोघांनी धाव घेतली. बापलेक दोघेही तारेला चिकटले. या दुर्घटनेत पारसनाथ वनमोरे, साईराज वनमोरे व प्रदीप वनमोरे यांचा जागीच मृत्यू झाला.

तर हेमंत हा गंभीर जखमी झाला .ही बाब लक्षात येताच मुख्य वाहिनीवरील वीज पुरवठा खंडित करण्यात आला. यानंतर या चौघांनाही वीजेच्या तारेपासून दूर करण्यात आले. हेमंत वनमोरे याची प्रकृती चिंताजनक असल्याने त्याला मिरजेतील वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात हलविण्यात आले.

## काचेच्या कारखान्यात अपघात, चार कामगारांचा मृत्यू, दोन जखमी

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २९ :

येवलेवाडी भागातील काचेच्या कारखान्यात रविवारी भीषण अपघात घडला. या दुर्घटनेत चार मजुरांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. तर दोन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी कोंढवा पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. पवन रामचंद्र कुमार (वय ४०), धमेंद्र सत्यपाल कुमार (वय ४०), विकास प्रसाद गौतम (वय २३), अमित शिवशंकर कुमार (वय २७ सर्व रा. येवलेवाडी मूळ-उत्तरप्रदेश) अशी मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांची नावे आहेत.

तर जगतपाल संतराम सरोज (वय ४९ वर्षे, धंदा मजुरी, रा.धांडेकर नगर, येवलेवाडी) व मोनेश्वर (पूर्ण नाव माहित नाही) अशी जखमी झालेल्या दोघांची नावे आहेत. इंडिया ग्लास सोल्युशन या काचेच्या कारखान्यात हा गंभीर प्रकार घडला. संबंधित कारखाना हुसेन तय्यबअली मिठावाला यांच्या मालकीचा असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

# नागपूर विमानतळावर राडा

## नितेश राणेच्या विरोधात ठाकरे गटाचे शिवसैनिक आक्रमक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :



नागपूर दौऱ्यावर असलेल्या बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या स्वागतासाठी शेकडो शिवसैनिक विमानतळावर गोळा झाले असताना दुसरीकडे भारतीय जनता पक्षाचे आमदार नितेश राणे अमरावती जिल्ह्यात अचलपूरला जाण्यासाठी दुपारी नागपूरला विमानाने पोहचले.

राणे नागपूर विमानतळावर उतरल्यानंतर प्रवेशद्वाराच्या बाहेर उभे असलेल्या ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांना दिसताच शिवसैनिक संतप्त झाले व त्यांनी राणेंच्या विरोधात आक्रमक होत जोरदार घोषणाबाजी केली. दरम्यान गोंधळ टाळण्यासाठी पोलिसांनी राणे यांना मागच्या प्रवेशद्वारातून बाहेर काढले. व गाडीमध्ये बसवून रवाना केले. अचलपूरला आयोजित करण्यात आलेल्या हिंदू संमेलनाच्या निमित्ताने नितेश राणे रविवारी दुपारी नागपुरात पोहचले.

दरम्यान कळमेश्वर येथील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या उद्घाटनासाठी उद्धव ठाकरे नागपुरात येणार असल्यामुळे त्यांच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात शिवसैनिक विमातळावर गोळा झाले होते. गेल्या काही दिवसांपासून वादग्रस्त वक्तवत्यावरुन चर्चेत असलेले नितेश राणे विमानतळावरच्या बाहेर येत असल्याचे कळताच ठाकरे गटाचे कार्यकर्ते आक्रमक झाले आणि त्यांच्या विरोधात घोषणाबाजी सुरू केली. राणे यांच्या स्वागतासाठी केवळ दहा ते बारा कार्यकर्ते बाहेर उभे होते.

राणे बाहेर येत असताना पोलिसांनी त्यांना प्रारंभी आतमध्ये थांबण्यास सांगितले. परंतु शिवसेनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले असल्याने पोलिसांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता राणे यांना दुसऱ्या मार्गाने बाहेर काढण्यासाठी नियोजन केले. मात्र शिवसैनिकांना माहिती पडताच शेकडो शिवसैनिक त्या प्रवेशद्वाराकडे धावले आणि तिथे जाऊन त्यांनी घोषणाबाजी सुरू केली. पोलिसांनी कार्यकर्त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला मात्र ठाकरे गटाचे कार्यकर्ते काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. शेवटी मात्र पोलिसांच्या बंदोबस्तात राणे विमानतळाच्या बाहेर काढले गाणि गाडीमध्ये बसून त्यांना विमानतळावरुन रवाना केले.


# एफआयआयएस सेंट कॅपिटल फंड, एजी डायनॅमिक फंड, एमओएस युटीलिटीचे हिस्सेदार

एमओएस युटीलिटी लिमिटेड, ही आघाडीच्या फिनटेक कंपन्यांपैकी एक आहे.ही कंपनी व्यवसाय आणि व्यक्तींना विविध प्रकारच्या फिनटेक आणि युटिलिटी पेमेंट सोल्युशन्स सेवा देते. ग्राहक-केंद्रित दृष्टिकोनासह, एमओएस युटीलिटी सुलभता वाढवणारे आणि आर्थिक समावेशकता वाढवणारे अखंड आणि सुरक्षित फिनटेक सोल्यूशन्स देण्यासाठी वचनबद्ध आहे.

एनएसई वर उपलब्ध मोठ्या प्रमाणात डील डेटानुसार, एफआयआय एस सेंट कॅपिटल फंड, एजी डायनॅमिक फंड्स लि., मिनर्व्हा व्हेंचर्स फंड, नेक्सपॅक्ट लिमिटेड आणि ब्रिज इंडिया फंड यांनी 26 सप्टेंबर 2024 रोजी एमओएस युटिलिटी लिमिटेडमध्ये भाग घेतला. सेंट कॅपिटल फंडाने 40,000 शेअर्स उचलले तर, एजी डायनॅमिक फंड्सने 2,69,600 शेअर्स, तर ब्रिज इंडिया फंडने 5,49,600 शेअर्स उचलले.

एमओएस कडे भारतातील नामांकित जायंट कॉर्पोरेशन्सचा समृद्ध आणि वैविध्यपूर्ण अनुभव आहे, एमओएस हे वेब आणि ॲप आधारित बँकिंग,प्रवास,उपयुक्तता सेवा इत्यादी विविध व्यवसायांचे समूह आहे.

आर्थिक समावेशनाचे ध्येय वाढवण्यासाठी एमओएसने प्रसिद्ध अभिनेता श्री नवाजुद्दीन सिद्दीकी यांच्याशी संबंध जोडला आहे. या धोरणात्मक सहकार्याद्वारे, एमओएसचे उद्दिष्ट त्यांच्या वित्तीय सेवांच्या सोयी आणि प्रवेशयोग्यतेवर प्रकाश टाकणे आहे.

MOS
DIGITAL BANO, TARRAKI KARO

लोकार्थ

# सुदर्शन फार्मा इंडस्ट्रीज बोर्ड ३० सप्टेंबरला करणार स्टॉक स्प्लिटचा विचार

सुदर्शन फार्मा इंडस्ट्रीज लिमिटेड, रासायनिक आणि औषधी व्यवसायात गुंतलेले एक प्रमुख नाव असून 30 सप्टेंबर 2024 रोजी त्याचे बोर्ड इक्विटीच्या उप-विभाग, विभाजनाच्या प्रस्तावावर विचार करण्यासाठी बैठक घेणार असल्याचे कंपनीने जाहीर केले आहे. कंपनीचे सध्या दर्शनी मूल्य रु. प्रत्येकी 10/- अशा पद्धतीने कंपनीचे बोर्ड ठरवू शकेल.

अलीकडेच कंपनीने नवीन उपकंपनी सुदर्शन मावेन फार्मा प्रायव्हेट लिमिटेड समाविष्ट केली आहे. उपकंपनीचा मुख्य उद्देश सर्व प्रकारच्या औषधी, आरोग्यसेवा, आयुर्वेदिक आणि इतर उत्पादने तसेच आहारातील पूरक उत्पादने तयार करणे, प्रक्रिया करणे, विकसित करणे,आयात करणे, निर्यात करणे हे आहे.

यापूर्वी, जुलैमध्ये कंपनीने कंपनीच्या प्रवर्तकांना परिवर्तनीय वॉरंट जारी करून निधी उभारण्यास मान्यता दिली होती. सुदर्शन फार्मा इंडस्ट्रीज लिमिटेड रासायनिक आणि औषधी उद्योगांमध्ये एक प्रमुख नाव बनले आहे. त्याचे प्रवर्तक हेमल व्ही. मेहता आणि सचिन व्ही. मेहता यांच्या नेतृत्वाखाली, ज्यांना एकत्रितपणे 25 वर्षांपेक्षा जास्त उद्योगाचा अनुभव आहे.

सुदर्शनने विशेष रसायने आणि बल्क औषधांमध्ये मजबूत पाया स्थापित केला आहे. एकात्मिक केमिकल आणि फार्मास्युटिकल कंपनी तयार करण्याच्या त्यांच्या दृष्टीने कंपनीच्या वाढीला चालना दिली आहे आणि विश्वासार्हता आणि नाविन्यपूर्णतेसाठी प्रतिष्ठा निर्माण केली आहे.

Sudarshan Pharma

# इव्हेक्सिया लाइफकेअरची परिवर्तनीय वॉरंट्सच्या इश्यूद्वारे निधी उभारणीस मान्यता

इवेक्सिया लाईफ केअर लिमिटेड , रसायने, इंटरमीडिएट्सचे उत्पादन, कृषी उत्पादने आणि ग्राहकोपयोगी वस्तूंच्या इतर विविध उत्पादनांमध्ये गुंतलेली,कंपनी असून कंपनीने 24 कोटी पर्यंत परिवर्तनीय वॉरंट जारी करण्यास मान्यता दिल्याचे जाहीर केले आहे.

कंपनी,रु. ३.६०/- प्रति वॉरंट एकूण 86.40 कोटी रुपए प्राधान्य इश्यूच्या मार्गाने, कंपनीच्या सदस्यांच्या आणि इतर नियामक प्राधिकरणांच्या आवश्यक मान्यतेच्या अधीन ही मान्यता असेल. अलीकडेच, कंपनीने जाहीर केले की त्यांच्या सदस्यांनी 9 जुलै 2022 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत परकीय चलन परिवर्तनीय बॉंड्सच्या इश्यूला मान्यता दिली आहे. बोडार्ने 25 बॉंड्सचे इक्विटी शेअर्समध्ये रूपांतर करण्यास मान्यता दिली आहे.

अलीकडेच संचालक मंडळाने 17 जून 2024 रोजी झालेल्या बैठकीत FCCB च्या इश्यूच्या अटी व शर्तींनुसार 75 बॉंड्सचे इक्विटी शेअर्समध्ये रूपांतर करण्यावर विचार केला आणि मान्यता दिली.

यापूर्वी, इवेक्सिया लाईफकेर ने घोषणा केली की त्यांनी इवेकसिया लाईफ केअर आफ्रिका लिमिटेड नावाची एक उपकंपनी समाविष्ट केली आहे ,जी इंग्लंड आणि वेल्ससाठी कंपनीच्या रजिस्ट्रारकडे नोंदणीकृत आहे. इंग्लंड आणि वेल्सच्या रजिस्ट्रार ऑफ कंपनीने जारी केले आहे. इव्हेक्सिया लाइफकेअरने आफ्रिकेत पॅथॉलॉजी लॅबची स्थापना करण्यासाठी नवीन उपकंपनी स्थापन केली.

Evexia LIFECARE LIMITED

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com